# संवादिनी २००६



८९१.४६
SAM/2006

जगाच्या पाठीवर कुठेही असला
तरी महाराष्ट्राच्या मातीला
मराठी मायबोलीला जो विसरला नाही,
त्या मराठी माणसाच्या
'मम'त्वाचे हे सुचिन्ह!

**महाराष्ट्र फाउण्डेशन**
मराठी साहित्य पुरस्कार
चित्रकार षांताराम पवार यांनी तयार केलेले बोधचिन्ह

**संपादक**
सतीश काळसेकर

**संपादन साहाय्य**
गोपाळ आजगांवकर, नितीन रिंढे, सुधाकर बोरकर

**मुखपृष्ठ**
सुनील महाडिक

**छायाचित्रण**
सुनील महाडिक/शेखर पितळे

**अक्षररचना**
आदित्य जोशी

**डिजीटल प्रक्रिया**
चिरायु पालांडे / प्रवीण वर्मा

**आतील छायाचित्रे**
संदेश भंडारे

**प्रकाशक**
कृष्णनाथ नेवरेकर
केशव गोरे स्मारक ट्रस्ट
'स्मृती', आरे रोड
गोरेगाव (पश्चिम)
मुंबई, ४०० ०६२

**मुद्रक**
प्रकाश विश्वासराव
न्यू एज प्रिंटिंग प्रेस
भूपेश गुप्ता भवन
८५, सयानी रोड, प्रभादेवी
मुंबई, ४०० ०२५

# केशव गोरे स्मारक ट्रस्ट

*आयोजित*

महाराष्ट्र फाउण्डेशन (USA)
मराठी साहित्य पुरस्कार प्रदान समारंभ २००६

**अध्यक्ष**
रामदास भटकळ

**प्रमुख पाहुणे**
बाबा आढाव

**सूत्रसंचालन**
विजया पाटील

शनिवार दिनांक ३० डिसेंबर २००६
सायंकाळी ५ वाजता
अखिल भारतीय नाट्य परिषदेचे
यशवंतराव चव्हाण नाट्यसंकुल (यशवंत नाट्यगृह)
मनमाला टँक रोड, माटुंगा-माहीम, मुंबई - ४०० ०१६

८९१.४६
SAM/2006

समारंभाचे अध्यक्ष

# रामदास भटकळ



कार्य करण्याची प्रचंड ऊर्जा, तरुणपणात प्रौढांना लाजवेल अशी प्रगल्भता आणि आता सत्तरीतही तरुणाईला लाजवेल असा कामाचा उत्साह, भोवतालच्या जगाविषयीचे अपार कुतूहल आणि उत्सुकता या तीन वाक्यांत रामदास भटकळ यांचे यथार्थ वर्णन करता येईल. परंपरेने चालत आलेला प्रकाशन व्यवसाय, इंग्रजी-मराठी पुस्तकांचा व्यासंग, लेखन, शास्त्रीय संगीताचा रियाज आणि मैफली, पीएच.डी.चा अभ्यास आणि शोधप्रबंध, साने गुरुजी स्मारक ट्रस्टच्या वतीने अनुवाद सुविधा केंद्राची उभारणी अशा विविध आघाड्यांवर एकाच वेळी कार्यरत राहण्याची किमया भटकळांना साध्य झाली आहे ती त्यांच्या अंगच्या या गुणत्रयींमुळेच.

एल्फिन्स्टन महाविद्यालयात शिकत असतानाच त्यांना साहित्याची गोडी लागली ती घरच्या पुस्तकविक्रीच्या व्यवसायामुळे. १९२४ साली वडील गणेश रामराव भटकळ यांनी सुरू केलेल्या पॉप्युलर बुक डेपोचा वारसा त्यांना मिळाला तरी ते मनापासून रमले पुस्तकविक्रीपेक्षाही पुस्तकांच्या प्रकाशनांतच. इंग्रजी पुस्तकांचे प्रकाशन प्रथमपासूनच वडील बंधू सदानंद पाहत होते. रामदासांनी आपल्या अभिरुचीनुसार मराठी प्रकाशनाला आकार देण्यास सुरुवात केली. वयाच्या सतराव्या वर्षीच गंगाधर गाडगीळांच्या कथालेखनाचे सामर्थ्य ओळखून त्यातील कलामूल्यांना उठाव येईल अशा प्रकारचे संपादन करत त्यांनी 'कबुतरे' हे पहिले पुस्तक प्रकाशित केले. त्यातच पॉप्युलरच्या पुढील वाटचालीची बीजे स्पष्ट झाली. प्रयोगशील लेखनाचे स्वागत करण्याची वृत्ती आणि उत्तम ते निवडण्याची दृष्टी यामुळे भटकळांनी गेल्या पन्नास वर्षांत पॉप्युलर प्रकाशन या संस्थेला एका वेगळ्याच उंचीवर नेऊन ठेवले. सुमारे एक हजार मराठी आणि जवळपास तेवढीच इंग्रजी पुस्तके पॉप्युलरतर्फे प्रसिद्ध करताना त्यांनी लेखकाच्या नव्या-जुन्या पिढीचा फरक केला नाही. सकस आणि चिरकाल टिकणारे लेखन असावे हा एकमेव निकष लावून काम केल्यानेच आज पॉप्युलरच्या यादीत काका कालेलकर, मामा वरेरकर, मो. ग. रांगणेकर, विश्राम व मालतीबाई बेडेकर यांचाही समावेश नवसाहित्यिकांच्या बरोबरीने झालेला दिसतो.

मराठी साहित्याबरोबरच नाटकांचे वेड हाही भटकळांच्या स्वभावाचा एक पैलू. कॉलेजच्या काळात मामा पेंडसे यांच्याकडून अभिनय, दिग्दर्शन यांचे धडे गिरवण्यापर्यंत हे वेड होते. पुढे प्रकाशनाच्या व्यापात ही आवड फार प्रगती करू शकली नाही, तरी वृत्तपत्रांतून नाटकांचे परीक्षण करणे आणि मराठीतील उत्तमोत्तम नाटकांच्या संहितांचे प्रकाशन करणे, यासाठी या आवडीचा मोठा फायदा भटकळांना झाला. नाटकांच्या संहितांचा साहित्यकृती म्हणून विचार व्हावा या दृष्टिकोनातून त्यांनी नाट्यसंहितांचे प्रकाशन केले.

नाटकांप्रमाणेच विक्रीच्या दृष्टीने तोट्यात जाणारा म्हणून अनेक प्रकाशन संस्थांनी नाकारलेला कविता हा वाङ्मयप्रकार भटकळांनी अतिशय आत्मीयतेने जोपासला आणि थेट विंदा, कुसुमाग्रजांपासून अगदी अलीकडच्या प्रफुल्ल शिलेदारपर्यंतच्या बहुतेक महत्त्वाच्या कवींची कविता रसिकांना उपलब्ध करून दिली.

केवळ मराठीच नव्हे तर इंग्रजी प्रकाशनातही वेगळा ठसा उमटवेल असे काम पॉप्युलरने केले आहे ते भटकळांच्या संपादनकुशलतेमुळेच. त्यातही सामाजिक शास्त्रे, राजकीय प्रबोधनपर पुस्तके यामध्ये पॉप्युलरने

आंतरराष्ट्रीय दर्जाच्या पुस्तकांची निर्मिती केली.

एक प्रथितयश व्यावसायिक प्रकाशक म्हणून भटकळांना या क्षेत्रातले सर्व मानसन्मान त्यांच्या ऐन उमेदीतच प्राप्त झाले आहेत. सोविएत राष्ट्रसंघ आणि अमेरिका यांच्या निमंत्रणावरून भारतीय प्रकाशन व्यवसायाचे प्रतिनिधित्व करण्याचा मान त्यांना मिळाला. त्याचबरोबर मराठी प्रकाशक संमेलनाचे अध्यक्षपद तसेच बॉम्बे बुकसेलर्स ॲण्ड पब्लिशर्स असोसिएशन, फेडरेशन ऑफ इंडियन पब्लिशर्स, कॅपॉक्सिल या निर्यातविषयक संस्थेचा ग्रंथविभाग अशा महत्त्वाच्या संस्थांचे अध्यक्षपद त्यांना मिळाले ते त्यांच्या प्रकाशन कार्यातल्या नवीनतेमुळेच. याच कारणाने महाराष्ट्र फाउण्डेशनसह अनेक महत्त्वाचे पुरस्कार भटकळांना प्रकाशक म्हणून मिळाले आहेत.

गेले अर्धशतक उत्तरोत्तर पॉप्युलरचा व्याप वाढत असताना भटकळ या एकाच कार्यात गुंतून पडले नाहीत ते त्यांच्या बहुआयामी व्यक्तिमत्त्वामुळेच. पॉप्युलर प्रकाशन ही संस्था व्यक्तिकेंद्री न राहता तिला व्यावसायिक रूप देण्याचा निर्धार करून त्यांनी त्यानुसार नवीन पिढीला प्रशिक्षित केले आणि आजच्या कॉर्पोरेट जगात पाय रोवून उभे राहण्याची ताकद या संस्थेत निर्माण केली.

पॉप्युलरच्या व्यापातूनही सवड काढून त्यांनी आपले इतर छंद जोपासले. विविध नियतकालिकांतून लेखन चालू असतेच, त्याच्या जोडीने गायनाचा रियाजही चालू असतो. गाण्याची आवड त्यांना बालपणापासूनच होती. पं. चिदानंद नगरकर यांच्याशी असलेल्या नातेसंबंधामुळे ते संगीताकडे ओढले गेले. वयाच्या सातव्या-आठव्या वर्षापासून सुरू झालेल्या या आवडीत मधल्या काळात कामाच्या व्यापामुळे खंड पडला होता. पण या आवडीतूनच संगीतविषयक अनेक उत्तमोत्तम ग्रंथांचे प्रकाशन त्यांनी केले. गेल्या वीस-पंचवीस वर्षांपासून त्यांनी पं.एस.सी. आर. भट यांच्याकडे पुन्हा गाण्याची तालीम घेण्यास सुरुवात केली असून देशविदेशांत त्यांच्या गाण्याच्या मैफलीही झाल्या आहेत.

भटकळांच्या मनाला व्यापून राहिलेला आणखी एक विषय म्हणजे महात्मा गांधी. मात्र फुटकळ वाचनातून आपले मत बनविण्यापेक्षा गांधींच्या तत्त्वज्ञानाचा सर्वसमावेशक सखोल विचार करण्याच्या प्रेरणेतून त्यांनी सुप्रसिद्ध गांधीवादी विदुषी उषा मेहता यांच्या मार्गदर्शनाखाली 'गांधी ॲण्ड हिज ॲडव्हर्सरीज' या विषयाचा अभ्यास सुरु केला. गांधींचे दोन कट्टर विरोधक डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या दृष्टिकोनातून गांधींच्या तत्त्वांचा अभ्यास करणारा शोधप्रबंध त्यांनी मुंबई विद्यापीठाला सादर केला. तो मान्य होऊन भटकळांना २००६ साली पीएच.डी. पदवी प्राप्त झाली. हा अभ्यास करताना गांधीजींच्या अनेक लहान-मोठ्या सहकाऱ्यांची व्यक्तिचित्रे भटकळांनी 'साधना' साप्ताहिकातून 'मोहनमाया' या सदरातून रेखाटली. या व्यक्तिचित्रांचा 'मोहनमाया' नावाचा संग्रह लवकरच मौज प्रकाशनातर्फे प्रसिद्ध होत आहे.

माणसांशी संवाद साधण्याची आवड, इतरांना सोबत घेऊन काम करण्याची, इतरांच्या मतांचा आदर करण्याची आणि आपल्या सहकाऱ्यांना निर्णयस्वातंत्र्य देण्याची उदार मनोवृत्ती यांमुळे भटकळांचा मित्रपरिवार फार मोठा आहे. यात समाजातल्या सर्व स्तरांतल्या, विविध क्षेत्रांतल्या आणि वेगवेगळ्या वयोगटातल्या माणसांचा समावेश आहे. प्रसन्न व्यक्तिमत्त्व, चेहऱ्यावर कायम असलेले स्मित आणि सौम्यपणे संवाद साधण्याची हातोटी यामुळे ते सहजपणे समोरच्या व्यक्तीला जिंकू शकतात. त्यांच्या या स्वभावामुळे त्यांचे आपल्या लेखकांबरोबरचे संबंध केवळ व्यावसायिक पातळीवर न राहता त्याला जिव्हाळ्याचे रूप मिळाले. आयुष्याच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर भेटलेल्या व्यक्ती आणि त्यांच्याशी जडलेले विविध प्रकारचे नातेसंबंध यांचा शोध घेण्याचा प्रयत्न त्यांनी आपल्या 'जिगसॉ' या पुस्तकात केला आहे.

माणसे जोडण्याच्या या वृत्तीमुळे एरवी अवघड वाटणारे अनेक प्रकल्प त्यांनी लीलया पार पाडले. पॉप्युलर प्रकाशनाद्वारे प्रकाशनाचेच वेगळे अंकुर म्हणता येतील अशा अनेक गोष्टी केल्या. त्यात चित्रकार प्रभाकर गोरे यांच्या चित्रांचे प्रदर्शन होते. 'स्मृतिचित्रे'वर आधारित सुहास जोशींचे एकपात्री प्रयोग होते. त्यांनी विजय तेंडुलकरांच्या नाट्यवाचनाच्या कॅसेट्स काढल्या. मराठी कादंबऱ्यांवर आधारित दूरदर्शन मालिका निर्माण केली. सर्वसामान्य वाचकांसाठी कादंबरीवरचे आस्वाद शिबिर भरवले. या साऱ्या प्रयोगशील प्रकाशनांचे यश आणि झपाट्याने आकारास येत असलेले अनुवाद सुविधा केंद्र हे त्यांच्या याच स्वभावाचे द्योतक आहे.

उत्साहाने कामाची आखणी करून त्याच्या पूर्ततेसाठी अथक प्रयत्न करतानाच 'एकला चलो रे'पेक्षा 'साथी हाथ बढाना' ही वृत्ती ठेवून इतरानांही कामाला लावण्याची हातोटी त्यांना साध्य झाली आहे. त्यांची ही आणि एखाद्या गोष्टीचा ध्यास घेण्याची आज दुर्मीळ होत चाललेली वृत्ती त्यांच्या तरुण सहकाऱ्यांना प्रेरणादायी ठरत असते.

- *अस्मिता मोहिते*

प्रमुख पाहुणे

# बाबा आढाव



महाराष्ट्राच्या पातळीवर कष्टकरी-शोषितांच्या वतीने असा एक दूर पल्ल्याचा लढा उभारण्याचे प्रयत्न गेली चाळीस-पन्नास वर्षे बाबा आढाव आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी चालवले आहेत. गेली पन्नास वर्षे टिकून राहिलेली, वाढलेली आणि संघर्षशील राजकारणात आघाडीवर राहिलेली चळवळ म्हणून बाबा आढावांच्या नेतृत्वाखालील कष्टकऱ्यांच्या चळवळीचे मोठेपण निःसंशय मान्य करावे लागेल. बाबा आढाव यांच्या नेतृत्वाखालील हमाल पंचायत आणि इतर संलग्न संघटनांनी निरनिराळ्या कष्टकरी समूहांच्या संघटनाचे जे प्रयोग गेली अनेक वर्षे राबवले ते केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर भारतातील इतर ठिकाणीही विरळाच सापडतील.

गेली पन्नास वर्षे बाबा हमालांचे नेते आहेत. पण हमालांबरोबरच धरणग्रस्तांचे, देवदासींचे, रिक्षावाल्यांचे, पथारीवाल्यांचे, बांधकाम-मजुरांचे, टेम्पोचालकांचे, कागद-काच-पत्रा वेचणाऱ्या गरीब मजुरांचेही नेते आहेत. १९५५ साली सुरू झालेल्या हमाल पंचायतीचा पसारा महाराष्ट्रभर वाढत जाऊन बोजा उचलणाऱ्या हमाल कामगारांची ती एक प्रमुख संस्था बनली आहे हे तर खरेच, परंतु त्याचबरोबर शहरामधील असंघटित क्षेत्रातील, हातावर पोट असणाऱ्या, शारीरिक श्रम हीच एकमेव संपत्ती असणाऱ्या मजुरांचे संघटन करीत, त्यांना जोडून घेत बाबांच्या नेतृत्वाखालील 'हमाल पंचायत' ही आता कष्टकऱ्यांच्या चळवळीचे नेतृत्व करणारी एक मध्यवर्ती संघटना बनली आहे.

बाबा आढावांच्या नेतृत्वाखालील कष्टकऱ्यांच्या या संघटनेचा प्रवास अतिशय वैशिष्ट्यपूर्ण आहे. १९५३ सालापासून बाबा आढाव यांनी सामाजिक चळवळींमध्ये भाग घेतला. महात्मा फुले यांच्या विचारांचा प्रभावही त्यांच्यावर असल्याने जातिप्रश्नाविषयी त्यांचे आकलन काटेकोर बनले. १९५३ नंतर समाजवादी पक्षातर्फे गोवामुक्ती व संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत त्यांनी भाग घेतला. भाववाढीविरुद्धच्या आंदोलनात १९५३ सालीच त्यांना तुरुंगवास भोगावा लागला. १९५५ साली बाबांनी एकीकडे हमाल पंचायतीची उभारणी केली तर दुसरीकडे १९६२ पासून ते महाराष्ट्रातील धरणग्रस्तांच्या चळवळीचे नेतृत्व करू लागले. १९७३ साली बाबा आढावांच्या पुढाकाराने पुण्यात 'महात्मा फुले समता प्रतिष्ठान'ची स्थापना करण्यात आली. सत्तरच्या दशकातच त्यांनी सामाजिक विषमतेच्या विरोधातल्या संघर्षास सुरुवात केली होती. या काळात संघटित धर्मसत्तेचे आव्हान, जातिव्यवस्थेतून होणारे शोषण आणि स्त्रीपुरुष समानता या तीनही क्षेत्रांत समता प्रतिष्ठानने विविध पातळ्यांवर काम केले.

पंढरपूरच्या विठ्ठलाच्या देवळात अभिनव सत्याग्रह केला गेला. याच काळात प्रतिष्ठानच्या वतीने स्त्रियांच्या प्रश्नांवरही महत्त्वाचे काम उभारले गेले. त्यात प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल तो सौंदत्ती येथे देवदासी प्रथेविरुद्ध केल्या गेलेल्या संघर्षाचा. त्याला जोडूनच विडी कामगार स्त्रियांचे संघटन घडवण्याचे प्रयत्नही प्रतिष्ठानने इतर समाजवादी कार्यकर्त्यांच्या मदतीने केले. या दोन्ही आंदोलनांमध्ये समाजातील सर्वात कनिष्ठ गटातील स्त्रियांना संघटित केले गेले.

प्रतिष्ठानच्या वतीने, डॉ. आढावांच्या नेतृत्वाखाली घडलेले सर्वात महत्त्वाचे आंदोलन म्हणजे 'एक गाव एक पाणवठा' मोहीम. १९७१ नंतरच्या, प्रतिष्ठानच्या स्थापनेनंतरच्या दीड-दोन वर्षांच्या काळात सुमारे सत्तर-पंचाहत्तर मोठ्या गावांमध्ये आणि तीस तालुक्यांतील चारशेच्या आसपास खेड्यांमधून फिरून डॉ. आढाव यांनी या मोहिमेविषयी प्रबोधन केले. जातिव्यवस्थेच्या प्रश्नासंबंधी केवळ कर्मकांडात्मक उपाय न राबवता, प्रबोधनाच्या चळवळीने नवीन सामाजिक, सांस्कृतिक क्रांती स्वतंत्रपणे चालवायला हवी अशी भूमिका घेत बाबांनी या मोहिमेची आखणी केली होती. दलित चळवळीच्या त्या काळात साकारत असणाऱ्या संघर्षाच्या राजकारणाला प्रबोधनात्मक भूमिकेची जोड देण्याचे महत्त्वाचे काम या मोहिमेने केले आणि महात्मा फुल्यांचा सांस्कृतिक क्रांतीचा वारसा पुढे चालवला.

हमालांचे स्थानिक आणि राज्यव्यापी पातळीवर संघटन करीत असताना प्रबोधन आणि संघर्ष यांची सातत्याने सांधेजोड करण्याचे प्रयत्न बाबांनी सतत केलेले दिसतात. प्रतिष्ठानच्या वतीने राबवलेल्या निरनिराळ्या वंचित समूहांसाठीच्या आंदोलनात हमाल कष्टकऱ्यांचा सहभाग होता. संघर्षाचे व्यापक राजकारण करण्यासाठी आवश्यक असणारी कष्टकऱ्यांची व्यापक एकजूट घडवण्याचे प्रयत्न या आंदोलनांनी केले. त्याच वेळेस या समूहांना सामाजिक सुरक्षितता आणि आत्मसन्मान मिळावा म्हणून अनेक कल्याणकारी सहकारी संस्थांची उभारणी बाबांच्या नेतृत्वाखाली या काळात झाली. 'कष्टाची भाकर', 'पुस्तकपेढी', 'भाऊबीज' अशा अनेक अभिनव योजना हमाल पंचायतीने सत्तर व ऐंशीच्या दशकात राबवल्या.

व्यापाऱ्यांकडून वा स्वयंसेवी संस्थांकडून पैचीही मदत न घेता हमाल पंचायतीचा स्वस्त दवाखाना उपक्रम वर्षानुवर्षे अबाधित चालू राहिला, तोही त्यात सहभागी होणाऱ्या डॉक्टरांना पुरेसे मानधन देऊन. शासनाशी संघर्ष आणि स्वतंत्रपणे सुरक्षितता मिळवण्याचे प्रयत्न याबरोबरच व्यापक प्रबोधन मोहिमेचा भाग म्हणून बाबांनी समता प्रतिष्ठानमार्फत अनेक उपक्रम चालवले. १९७८ पासून संस्थेने 'पुरोगामी सत्यशोधक' हे नियतकालिक चालवले. तुटपुंज्या साधनसामग्रीसह स्वत:चा संशोधन विभाग उभारला. कृतज्ञता निधीची उभारणी केली. असे एक ना अनेक उपक्रम राबवले. प्रतिष्ठानच्या या सर्व उपक्रमांमागील बाबांची दृष्टी, राजकीय वास्तवाविषयीचे त्यांचे आकलन फार महत्त्वाचे आहे. नव्वदच्या दशकात जेव्हा सर्व सामाजिक चळवळी थंडावल्या, महाराष्ट्राचे राजकारण अतोनात बदलले व उदारीकरणाच्या झंझावतात पुरोगामी पक्ष हेलपाटले तेव्हाही वयाच्या सत्तरीत बाबांनी शहरी क्षेत्रात ह्या विखुरलेल्या, असंघटित कष्टकऱ्यांचे संघटन उभारण्याचे जोमाने प्रयत्न केले.

बाबा आढावांनी हमालांचे राजकारण घडवायला सुरुवात केली तेव्हा 'कष्टकरी अंगमेहनती' कामगारांची व त्यांच्या राजकारणाची संकल्पनात्मक चौकट स्पष्टपणे साकार झालेली नव्हती, परंतु नव्वदीच्या दशकात या कष्टकऱ्यांच्या त्यांनी घडवलेल्या संघटनानंतर बाबांनी स्वीकारलेली 'कष्टकरी अंगमेहनती' कामगारांची संकल्पना भारतातील वर्गीय विश्लेषणाच्या चौकटीत एक वैध व उपयुक्त संकल्पना बनली आहे. काटेकोर वर्गीय आकलनाच्या दृष्टीने फुटकळ स्वयंरोजगारी किंवा सेवा क्षेत्रातील अंगमेहनती हे अर्थव्यवस्थेत उपरे असल्याने क्रांतिकारी राजकारण करू शकत नाहीत असे मानले गेले. परंतु भारतातील राजकीय व्यवहाराच्या दृष्टीने या समूहांचे संघटन ही एक आवश्यक बाब बनली आहे. इथल्या भांडवलशाहीचा विकास आडवळणांनी झालेला असल्यामुळे उत्पादन व्यवस्थेत सेवा क्षेत्राचा विस्तार प्रमाणाबाहेर वाढत गेलेला दिसतो. परिणामी कष्टकऱ्यांचे अधिकाधिक समूह सेवा क्षेत्रात दाखल होताना दिसतात. पुरोगामी राजकारणाला शहरी केंद्रामध्ये आपल्या राजकारणाची सुरुवात याच समूहांपासून करणे भाग आहे. म्हणून, विशेषत: उदारीकरणाच्या पर्वातील अर्थराजकीय चौकटीत बाबा आढाव यांनी विकसित केलेली 'कष्टकरी अंगमेहनती' कामगारांची संकल्पना म्हणजे वर्गीय विश्लेषणास केलेले महत्त्वाचे योगदान आहे हे नोंदवायला हवे.

*- राजेश्वरी देशपांडे*

# संवादिनी
# २००६

'महाराष्ट्र फाउण्डेशन'च्या साहित्य पुरस्कारांचे हे तेरावे वर्ष आहे. आजवरच्या साहित्य पुरस्कारांचे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जगतात स्वागत होत आले आहे. पुरस्कारांची दिसामाजी वाढत जाणारी संख्या आणि पुरस्कार देण्यामागची बदलत चाललेली सांस्कृतिक क्षेत्रातली मन:स्थिती या पार्श्वभूमीवर 'महाराष्ट्र फाउण्डेशन'च्या पुरस्कारांचे होणारे स्वागत हे आनंददायी आहे. दिल्या जाणाऱ्या पुरस्कारांवर मतभेद संभवणारच नाहीत असा मात्र याचा अर्थ घेता येणार नाही. पुरस्कार निवडप्रक्रियेमागची 'फाउण्डेशन'ची भूमिका आम्ही आरंभापासूनच सुस्पष्ट ठेवली आहे आणि तिचे जाहीर वाचनही केले आहे. निवडीला या भूमिकेची चौकट जरूर आहे आणि ती पुरेशी लवचीक आहे. या भूमिकेच्या आधारेच आमची शिफारस करणारी भारतातील समिती आणि अमेरिकास्थित अंतिम निवड समिती काम करीत आहे. हे काम करत असताना दोन्ही समित्या निर्णयाच्या संदर्भात लोकशाही पद्धतीच आचरणात आणतात. निवडीचे काम करीत असताना मान्यवर साहित्यिकांच्या तसेच आधीच्या गौरवप्राप्त साहित्यिकांच्या शिफारशी आम्हाला मार्गदर्शक असतातच. याही वर्षीच्या पुरस्कार निवडीमागे ही पार्श्वभूमी आहे. पुरस्कार जाहीर झाल्यावर विविध वर्तमानपत्रांनी, आकाशवाणी आणि दूरदर्शन वाहिन्यांनी पुरस्कारांविषयीच्या बातम्या तर दिल्याच, शिवाय काहींनी पुरस्कारांविषयी आनंद आणि समाधान व्यक्त केले. आम्ही या सगळ्या प्रसिद्धीमाध्यमांचे आभारी आहोत.

पुरस्कार दोन कारणांसाठी दिले जातात. प्रथमत: ज्यांनी साहित्य-संस्कृतीच्या क्षेत्रात मोलाची आणि भरीव कामगिरी केली आहे, त्यांच्याविषयीची कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आणि नंतर, ज्यांनी आजवरच्या लेखनात महत्त्वाची कामगिरी केली आहे आणि येत्या काळात ज्यांच्या हातून काही महत्त्वाचे लेखन होण्याच्या शक्यता त्यांच्या आजवरच्या लेखनातून दिसताहेत, त्यांना पुढल्या कामासाठी प्रोत्साहन द्यावे यासाठी. यावर्षी ज्येष्ठ साहित्यिक प्रा. रा. ग. जाधव यांना या वर्षीच्या गौरव पुरस्काराने सन्मानित करून आम्ही त्यांच्याविषयीचा कृतज्ञताभाव व्यक्त करीत आहोत. शिवाय ज्येष्ठ साहित्यिक रत्नाकर मतकरी यांना विशेष पुरस्काराने सन्मानित करून त्यांच्या साहित्यिक कार्याला उजाळा देत आहोत आणि त्यांच्याविषयीची कृतज्ञता व्यक्त करीत आहोत. अन्य पुरस्कार त्या त्या लेखकाच्या अभ्यासाच्या, संशोधनाच्या, साहित्यनिर्मितीच्या कार्याला दाद मिळावी आणि पर्यायाने त्या त्या लेखकाच्या लेखनसामर्थ्याला उभारी यावी व नव्या कामासाठी प्रोत्साहन मिळावे या भावनेतून आले आहेत.

नियतकालिक/अनियतकालिकासाठीचा या वर्षीचा पुरस्कार 'परिवर्तनाचा वाटसरू' या पाक्षिकासाठी संपादक अभय कांता यांना मिळाला आहे. गेली पाच वर्षे हे पाक्षिक समाजाच्या सर्व थरांत प्रबोधन, प्रागतिक विचारांचा संवाद साधत आणि चळवळीचा मागोवा घेत आपले काम सातत्याने करत आहे. वाङ्मयीन आणि सांस्कृतिक क्षेत्रात 'प.वा.' या नावाने कार्यरत असलेल्या या नियतकालिकाचे संपादन ही सामूहिक जबाबदारी आहे याची सुस्पष्ट जाणीव संपादक अभय कांता यांना आहे. या सामुहिक जबाबदारीच्या सूत्राचा उच्चार करतच त्यांनी अन्य सहकाऱ्यांच्या वतीने हा सन्मान स्वीकारल्याचे सांगितले आहे. हे आम्हाला विशेष महत्त्वाचे वाटते. महाराष्ट्राच्या वैचारिक क्षेत्रातली या घडीची घुसळण पहाता 'प.वा.'चा सगळ्या समाजथरातल्या पुरोगामी चळवळींना मोठा आधार वाटणे हे आशादायक आणि उमेद वाढविणारे

चित्र आहे. बंधुभाव, बिरादरीभाव आणि संपादनातली त्यांची सहिष्णू भूमिका येत्या काळात अधिकाधिक वृद्धिंगत होवो आणि या सन्मानाने त्यांचे बळ वाढो आणि आमचा सन्मानही सार्थ होवो अशी शुभेच्छा या प्रसंगी व्यक्त करतो.

या वर्षी आमच्या अमेरिकेतील समितीने आणखी एका विशेष पुरस्काराची घोषणा केली आहे. नाट्यक्षेत्रात सामाजिक जबाबदारीचे भान कृतिशील आणि गतिमान ठेवणाऱ्या अतुल पेठे या आमच्या-म्हटले तर-तरुण सहकाऱ्याचा सन्मान या निमित्ताने करण्यात आला आहे. अतुल पेठेची आजवरची कामगिरी ही भांडवली बाजारपेठेपासून दूर राहिलेली आहे. आणि त्यामुळेच आर्थिक झळ सोसत त्याला त्याच्या नाट्यनिर्मितीला, वृत्तपटनिर्मितीला भिडावे लागले आहे. त्याच्या या कामाचा गौरव होताना आम्हाला त्याच्या भविष्यकाळातील वाटचालीत काही एक उमेद वाढविणारा सहभाग देता आला याचा आनंद आपणापर्यंत पोचवतो.

आम्ही या सर्व सन्मानितांचे अभिनंदन करतो आणि त्यांना येत्या काळात अधिक मोलाच्या कामासाठी शुभेच्छा देतो. ज्येष्ठांना आणि विशेषतः नव्यांनाही चांगल्या आरोग्यासाठी आणि समाधानी (निर्मितीचे 'सातत्याचे असमाधान' निराळे मानून) आयुष्यासाठीही शुभेच्छा देतो.

गेली दोन वर्षे पुरस्काराने सन्मानित झालेल्या साहित्यिकांचे आणि सन्मानित ग्रंथांचे संच आम्ही काही ग्रंथालयांना 'महाराष्ट्र फाउण्डेशन'तर्फे भेट पाठविले होते. यात साहित्यिकांचे साहित्यही सन्मानित व्हावे व वाचकांपर्यंत न्यावे अशी भावना होती. या उपक्रमाला ग्रंथालयांकडून चांगला प्रतिसाद मिळाला. हा उपक्रम अधिकाधिक वाढावा, त्यात महाराष्ट्राबाहेरच्या मराठी भाषकांनाही सोबत घ्यावे असा प्रयत्न आहे.

हेही वर्ष आधीच्या पूर्वसूरींच्या खांद्यावरच उभे आहे. याही वर्षी मान्यवरांनी आणि नवोदितांनी शिफारशी, सूचना, 'संवादिनी'साठी लेखन अशा बहुअंगांनी आम्हाला मदत केली आहे. त्यांचे ऋण केवळ आभारांनी व्यक्त करावे याहून अधिक आहे. त्याविषयी आम्ही कृतज्ञ आहोत.

'महाराष्ट्र फाउण्डेशन'चे साहित्य पुरस्कार देताना आमची निःसंदिग्ध भूमिका आणि त्या भूमिकेचा पाठपुरावा करताना स्वीकारलेली चर्चा, मतभेद, पुन्हा चर्चा, ही संवादाची पद्धती याचा फायदा आम्हा सर्वांनाच झाला. पुरस्कारांनी सन्मानित साहित्यिक आणि साहित्य याकडे आपण निर्मळ नजरेने पाहिले तर याचा प्रत्यय आपणासही येईल. आपण तसे पाहाल असा विश्वासही आहे. येत्या काळात हा प्रयत्न अधिकाधिक नेमका आणि लोकाभिमुख व्हावा हा आमचा प्रयत्न राहील.

महाराष्ट्र फाउण्डेशनने आरंभापासून प्रकाशित साहित्याचा आणि काही ज्येष्ठांचा पुरस्कारांनी सन्मान केला. मराठी साहित्यात समाजाभिमुख पुरोगामी भूमिका स्वीकारून प्रकाशित होणाऱ्या नियतकालिकांना मदतीचा हात दिला. वाचकांपर्यंत पुरस्कारप्राप्त साहित्य पोचावे यासाठी ग्रंथालयांना ग्रंथसंच पुरविले. याबरोबरच साहित्य आणि समाज अशा दुहेरी परिमाणे असलेल्या काही वाङ्मय प्रकल्पांना मदतही केली. यातले काही प्रकल्प पूर्ण झाले आहेत. काही पूर्णतेच्या वाटेवर आहेत. अशा प्रकल्पांतून निर्माण झालेले साहित्य मराठी भाषकांपर्यंत जावे असे आमचे प्रयत्न सुरू आहेत.

येत्या काळात या सर्व कामांना गती मिळावी यासाठी आपणा सगळ्यांची गरज आहे. आपण सहकार्य द्याल हा विश्वास आहेच.

'केशव गोरे स्मारक ट्रस्ट'च्या माननीय अध्यक्षा मृणालताई गोरे, प्रा. चंद्रकांत केळकर, 'ट्रस्ट'चे अन्य पदाधिकारी व सहकारी, भारतातील व अमेरिकेतील निवड समितीचे सर्व सदस्य आणि आमच्या सर्व कामांत तत्परतेने मदत करणारे ज्येष्ठ, समकालीन आणि नव्या उमेदीचे मित्र, 'संवादिनी'च्या कामात मदत करणारे लेखक, मुखपृष्ठाचे चित्रकार आणि त्यांचे मित्र, 'न्यू एज प्रिंटिंग प्रेस'चे समजूतदार मुद्रणतज्ज्ञ, सहकारी या सगळ्यांच्या सहकार्याने हे वर्षभराचे आणि 'संवादिनी'च्या संपादनाचे काम झाले आहे. 'संवादिनी'च्या संपादनाची भागशः जबाबदारी आमचे मित्र गोपाळ आजगांवकर यांनी घेतली यासाठी त्यांचे विशेष आभार. त्यांच्याच सहकार्याने ते पुढेही जाणार आहे. या सर्वांचे प्रेम असेच राहो. सगळ्यांच्या कष्टांसाठी, सूचना-सहकार्यासाठी आणि सहभागासाठी आम्ही त्यांचे ऋणी आहोत.

**सतीश काळसेकर**

# महाराष्ट्र फाउण्डेशन (USA)
# मराठी साहित्य पुरस्कार योजना २००६ चे मानकरी

• महाराष्ट्र फाउण्डेशन गौरव पुरस्कार

**रा. ग. जाधव**






नियतकालिक

**परिवर्तनाचा वाटसरू**



विशेष पुरस्कार

**रत्नाकर मतकरी**



नाट्यक्षेत्रातील विशेष कामगिरीसाठी पुरस्कार

**अतुल पेठे**

ग्रंथ

**मराठी साहित्य : इतिहास आणि संस्कृती** / वसंत आबाजी डहाके

**निशाणी डावा अंगठा** / रमेश इंगळे-उत्रादकर

**हॉटेल माझा देश** / धम्मपाल रत्नाकर

**मळभ** / किरण यज्ञोपवीत











समाजमनस्क रसिक समीक्षक

# रा. ग. जाधव

दिगंबर पाध्ये

'वाङ्मयीन निबंध : स्वरूप आणि साधने' हे प्रा. रा. ग. जाधव यांचे पहिले पुस्तक १९६७ साली प्रकाशित झाले आणि साहित्याचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांनी त्याचे उत्साहाने स्वागत केले. या पुस्तकातील लेखनामागेही साहित्याचा अभ्यासक, समीक्षक आहेच. तथापि हे काही समीक्षक रा. ग. जाधव यांच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रत्यय देणारे पुस्तक नाही. समीक्षक म्हणून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा परिचय घडविणाऱ्या पुस्तकाचे शीर्षक आहे 'नव वाङ्मयीन प्रवृत्ती व प्रमेये'. या १९७२ साली प्रसिद्ध झालेल्या पुस्तकाच्या सुरुवातीलाच 'गेल्या दहाबारा वर्षांत मराठीत जे अनेक वाङ्मयीन प्रश्नोपप्रश्न निर्माण झाले, त्यांपैकी काही प्रश्नांचा मागोवा घेण्याचा प्रयत्न मी प्रस्तुत लेखसंग्रहात केला आहे' असे रा. ग. जाधव यांनी स्वत:च म्हटले आहे. या लेखसंग्रहातील लेखांची नुसती शीर्षके पाहिली तरी रा. ग. जाधव यांची साहित्यविषयक आस्था किती व्यापक आहे हे ध्यानात आल्यावाचून राहत नाही. 'नव समीक्षेचा अन्वय', 'व्यस्ततावादी मनोवृत्ती आणि वाङ्मय' यांसारख्या वर्तमानकालीन विषयांबरोबरच प्राचीन काळातील 'तुकारामाच्या प्रतिमासृष्टीचे सत्य' पाहण्याचीही रा. ग. जाधव यांना आस्था आहे. 'दलित साहित्याचा दृष्टिकोण' समजून घेत असतानाच 'ऐतिहासिक साहित्याचा सांस्कृतिक संदर्भ' तपासून पाहणेही त्यांना तेवढेच अगत्याचे वाटते; आणि 'केशवसुतांची व्यस्ततावादी स्फुरणे' पाहत असतानाच ग. दि. माडगूळकर यांच्या 'चैत्रबन'मधील भावगीतांचा सुभग घाटही त्यांना अनुभवासा वाटतो. रा. ग. जाधव यांच्या या पहिल्याच लेखसंग्रहातील विषयांची ही विविधता समीक्षक म्हणून असणाऱ्या त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची खरी ओळख पटविणारी आहे.

आपल्या या पहिल्याच लेखसंग्रहातील 'नव समीक्षेच्या कक्षा' या लेखाच्या अखेरीस वर्तमानकाळातील समीक्षेची भूमिका काय असावी याविषयी रा. ग. जाधव यांनी जे म्हटले आहे तेच त्यांच्या समीक्षादृष्टीचे दर्शक आहे. तेथे ते म्हणतात, 'समीक्षेचे अंतिम उद्दिष्ट ललित साहित्यातील जीवनाचा ललित साहित्याबाहेरील जीवनाशी असलेला अन्वय शोधणे हेच आहे. याचा अर्थ समीक्षेने ललित साहित्याचा साहित्यदृष्टीने विचारच करू नये असा नाही. परंतु विकसित समाजात व प्रगल्भ वाङ्मयीन अभिरुचीच्या काळात असा विचार वाचक व लेखक चांगल्या प्रकारे करू शकतात. समीक्षेचा साहित्यविषयक व साहित्यापुरताच जो कारभार असतो, तो स्वत: साहित्यिकच अधिक समर्थपणे करावयास पात्र असतो. प्रगल्भ रसिकतेची त्याला मदतही होते. समाजापुढे साहित्यकृती आली की तिला अनेक सामाजिक संदर्भ प्राप्त होतात. नवजात बालकाला ज्याप्रमाणे कुटुंब, समाज, देश अशा घटकांनी क्रमाक्रमाने, हळूहळू पण अटळपणे एक स्वत्व (आयडेंटिटी) प्राप्त होत जाते; त्याप्रमाणे अभिव्यक्त झालेल्या साहित्यकृतीलाही सांस्कृतिक घटकांनी स्वत्व प्राप्त होते. या स्वत्वाचा शोध-बोध करून घेणे हेच समीक्षेचे कार्य आहे. अखेरपक्षी जीवनाला मूल्य आहे या धारणेतूनच साहित्यकलेचे मूल्य निष्पन्न होते. नव्या समीक्षकानेच नव्हे तर कोणत्याही समीक्षकाने याचे भान ठेवले पाहिजे.' रा. ग. जाधव यांनी समीक्षा लिहिताना हे भान सातत्याने राखले आहे.

मराठी समीक्षेचा इतिहास पाहिला तर त्यामध्ये तीन प्रमुख टप्पे दिसतात. पहिल्या टप्प्यावर ललित साहित्याचा हेतू व परिणाम यालाच समीक्षेत विशेष महत्त्व होते. ललित साहित्याचा विचार



रा. ग. जाधव

**रा. ग. जाधव**

**जन्म :** २२ ऑगस्ट १९३२

**समीक्षा**

वाङ्मयीन प्रवृत्ती व प्रमेये, १९७२
साहित्य आणि सामाजिक संदर्भ, १९७५
निळी पहाट, १९७८
निळी क्षितिजे, १९८२
निळे पाणी, १९८२
अश्वत्थाची सळसळ, १९८५
कला साहित्य व संस्कृती, १९८६
सांस्कृतिक मूल्यवेध, १९९२
आधुनिक मराठी कवयित्रींची कविता, १९९६
पर्यावरणीय प्रबोधन आणि साहित्य, १९९६
साठोत्तरी मराठी कविता व कवी, १९९७

**कविता**

वियोगब्रह्म १९९५
मावळतीच्या कविता, १९९७

करताना साहित्यकृतीतून काय सांगितले आहे आणि ते कसे सांगितले आहे हेच प्रश्न तेव्हा महत्त्वाचे वाटत होते. 'कलेसाठी कला', 'जीवनासाठी कला' यांसारख्या वादांना या टप्प्यावर महत्त्व होते. साहित्यस्वरूपाची जाणीव तेव्हा नव्हतीच असे नाही, पण ती गौण होती. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात बा. सी. मर्ढेकर यांनी जे लेखन केले त्यामुळे मराठी समीक्षेत साहित्यस्वरूपाला मध्यवर्ती स्थान मिळाले आणि मराठी समीक्षा स्वरूपलक्ष्यी झाली. या समीक्षेने साहित्यातील सामाजिकता, साहित्याचे सांस्कृतिक संदर्भ या साऱ्या बाबींना साहित्यविचारात काहीसे अप्रस्तुत ठरविले. त्याचे बरेवाईट परिणामही मराठी साहित्यक्षेत्रावर झाले. तथापि मराठी साहित्यक्षेत्राला साहित्य स्वरूपाचे भान आणून देण्यात या समीक्षेचा महत्त्वाचा वाटा आहे हे नि:संशय. रा. ग. जाधव यांच्या विचारांची जडणघडण या विचारांच्या छायेतच झाली. परंतु रा. ग. जाधव त्या छायेत फार काळ रमले नाहीत. साहित्य स्वरूपाचा विचार आत्मसात करून सहजपणे ते पुढील टप्प्याकडे वळले. हा टप्पा म्हणजे संस्कृतिलक्ष्यी समीक्षा हा होय. मराठी साहित्यक्षेत्रात १९६० नंतरचा काळ हा या संस्कृतिलक्ष्यी समीक्षेचा काळ आहे. या काळातील रा. ग. जाधव हे एक विशेष महत्त्वाचे समीक्षक आहेत.

साहित्य समीक्षा ही केव्हाही साहित्योपजीवीच असते. साहित्याच्या क्षेत्रात काही नवे घडू लागले की त्या नवेपणाचे आकलन करून घेण्यासाठी समीक्षेला प्रयत्न करावे लागतात; आणि त्या प्रयत्नातच काळाच्या ओघात समीक्षेचे स्वरूप बदलत असते. रा. ग. जाधव यांचे समीक्षा लेखन सुरू झाले त्याच्या आसपासचा काळ मराठी साहित्यक्षेत्रात बरेच काही घडविणारा काळ होता. मर्ढेकरप्रणीत नव-कविता प्रस्थापित होऊन मर्ढेकर-करंदीकर यांच्या नंतरची दिलीप चित्रे, अरुण कोलटकर यांची पिढी काव्यलेखन करू लागली होती. कथेच्या क्षेत्रात गंगाधर गाडगीळ यांच्या नवकथेचा दबदबा कायम असला तरी जी. ए. कुलकर्णी, श्री. दा. पानवलकर, भाऊ पाध्ये, बाबूराव बागूल यांसारखे लेखक जबरदस्त ताकदीने लेखन करू लागले होते. मराठी साहित्य क्षेत्रातील अनियतकालिकांची चळवळ साहित्य क्षेत्रातील प्रस्थापिततेला जबरदस्त धक्के देत होती. भाऊ पाध्ये, भालचंद्र नेमाडे, उद्धव शेळके, मनोहर तल्हार यांसारख्या लेखकांचे नव्या जाणिवा व्यक्त करणारे लेखन प्रसिद्ध होत होते. इतिहास व ऐतिहासिक व्यक्ती तसेच पुराणकथा व पौराणिक व्यक्ती यांच्याकडे पाहण्याची नवी दृष्टी मराठी साहित्यातून जाणवू लागली होती. आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे मराठी साहित्य क्षेत्रात दलित साहित्याची स्फोटक चळवळ आकार घेऊ लागली होती. (पुढे थोड्याच काळात ग्रामीण साहित्य, स्त्रीवादी साहित्य अशा आणखी काही चळवळींचाही उदय झाला.) एकंदरीत १९६०नंतरचा काळ हा साहित्य क्षेत्रातील पूर्वीची व्यवस्था अस्ताव्यस्त करणारा काळ होता. या सर्व खळबळीचे आकलन करून घेऊन त्याची व्यवस्था लावणे प्रस्थापित समीक्षादृष्टीला शक्यच नव्हते. या सर्व




प्रवाहांकडे स्वागतशील दृष्टीने पाहत समजून घेणे व वाचकांना समजावून सांगणे ही त्या काळाचीच गरज होती. त्यासाठी केवळ स्वरूपलक्ष्यी हा टप्पा ओलांडून समीक्षेने संस्कृतिलक्ष्यी होणे हे अपरिहार्यच होते. रा. ग. जाधव यांच्यातील साहित्यरसिकाला ही गरज जाणवली आणि अगदी सहजपणे केवळ स्वरूपलक्ष्यी हा टप्पा ओलांडून त्यांची समीक्षा संस्कृतिलक्ष्यी झाली.

१९७२ साली पहिला लेखसंग्रह प्रसिद्ध झाल्यापासून आजपर्यंत गेल्या तीन-साडेतीन दशकांत रा. ग. जाधव यांनी केलेली समीक्षा त्यांच्या बत्तीस पुस्तकात संग्रहित झाली आहे. ती पुस्तके पाहिली तर असे लक्षात येते की साहित्य क्षेत्रातील एखाद्या विषयाचा सर्वांगीण सलग अभ्यास मांडणारी ही समीक्षा नाही. तसेच साहित्यसिद्धान्ताचा परिचय करून देणे असेही या समीक्षेचे स्वरूप नाही. एखाद्या साहित्यसिद्धान्ताचा स्वीकार करून रा. ग. जाधव लिहीत आहेत




असेही त्यांच्या लेखनाकडे पाहता म्हणता येण्यासारखे नाही. रा. ग. जाधव यांचे सर्व समीक्षालेखन हे साहित्यकृतीला, साहित्यामागील प्रवृत्तीला दिलेल्या उत्स्फूर्त प्रतिसादासारखे आहे. मात्र हा प्रतिसाद म्हणजे केवळ भारावून जाणे नाही. या प्रतिसादामागे साहित्याविषयीच्या अपार आस्थेबरोबरच रसिकता व भक्कम वैचारिकता आहे. रा. ग. जाधव यांच्या साहित्यविषयक आस्थेचा परिघ तर वाचकाला थक्क करील इतका व्यापक आहे. तुकाराम, एकनाथ यांसारख्या प्राचीन संत कवींपासून केशवसुत, बालकवी, चित्रे, कोलटकर एवढेच नव्हे तर १९८० नंतर लिहू लागलेल्या कवयित्रीपर्यंतच्या कवितेत त्यांना रस आहे. कथा हा साहित्यप्रकार घेतला तर वामन चोरघडे यांच्यापासून पु. भा. भावे, गंगाधर गाडगीळ, अरविंद गोखले, व्यंकटेश माडगूळकर, अण्णा भाऊ साठे, चारुता सागर, बाबूराव बागूल, जी. ए. कुलकर्णी अशा वेगवेगळ्या वृत्ती-प्रवृत्ती असणाऱ्या लेखकांच्या कथेविषयी त्यांना आस्था आहे. विजय तेंडुलकर यांच्या 'श्रीमंत'पासून सतीश आळेकरांच्या 'महानिर्वाण'पर्यंतच्या मराठी समाजात चर्चाविषय झालेल्या नाटकांविषयी त्यांना कुतूहल आहे. आणि असे कुतूहल वाटत असतानाच आचार्य अत्रे यांच्या नाट्यदृष्टीकडे पाहावे असे त्यांना वाटते आहे. आपल्या समीक्षेद्वारे प्रतिसाद देण्यासाठी रा. ग. जाधव यांना उद्युक्त करणारे हे साहित्यिक व त्यांच्या साहित्यकृती पाहिल्या म्हणजे साहित्यक्षेत्रातील कोणत्याही एका प्रवृत्तीचे ते समर्थक वा संवर्धक नाहीत हे सहजपणे जाणवण्यासारखे आहे.

एक समाजमनस्क समीक्षक अशी रा. ग. जाधव यांची ख्याती आहे ती साहित्य आणि समाज यांमधील संबंधाचे आकलन करून घेण्याच्या त्यांच्या वृत्तीमुळे. दलित साहित्याच्या संदर्भात रा. ग. जाधव यांची ही वृत्ती स्पष्ट झाली आहे. मराठी साहित्य क्षेत्रात दलित साहित्याची चळवळ सुरू झाल्यानंतर या चळवळीच्या संदर्भात चर्चा सुरू झाली. दलित या विशेषणाचा नेमका अर्थ काय? दलित साहित्याचे साहित्य म्हणून वेगळेपण काय? यांसारख्या अनेक प्रश्नांच्या चर्चेला तेव्हा चालना मिळाली. त्या काळात दलित साहित्याचे मनापासून स्वागत करताना रा. ग. जाधव यांनी व्यक्त केलेली भूमिका त्यांच्या समाजमनस्क वृत्तीची साक्ष पटविणारी आहे. 'दलित साहित्याचा प्रश्न हाही या समाजाच्या सांस्कृतिक अभिव्यक्तीच्या प्रयत्नांपैकी एक आहे... जी एक आकुल सांस्कृतिक मन:स्थिती आजचा दलित समाज अनुभवत आहे त्या मन:स्थितीचे हा प्रश्न म्हणजे दुसरे बोधचिन्ह आहे... सांस्कृतिक अभिव्यक्ती ही किती दुर्घट प्रक्रिया आहे याची कल्पना नसणारांना आजच्या दलित समाजाचे कोणतेच प्रश्न यथार्थपणे समजणार नाहीत. तसेच या प्रक्रियेचे अज्ञान खुद्द दलित समाजीयांनाही असणे शक्य आहे हेही पटवून घेणे आवश्यक आहे. सांस्कृतिक क्षेत्रात बौद्ध दर्शनाच्या स्वीकारासाठी दलित समाजाला ज्या अटळ प्रक्रिया इतिहासक्रमाने स्वीकाराव्या लागतील त्याच अटळ प्रक्रिया साहित्यक्षेत्रातही दलित साहित्याच्या सिद्धतेसाठी त्याला पार पाडाव्या लागतील. त्यासाठीही प्रदीर्घ काळाची गरज आहे. कोणत्याही समाजाची साहित्यिक अभिव्यक्ती एक पिढी रूपास आणू शकत नाही'. अशा शब्दांत रा. ग. जाधव यांनी या प्रवाहाचे समर्थन केले आहे. 'दलित साहित्याचा ध्रुवतारा बौद्धदर्शन आहे'. असे त्यांचे मत व्यक्त करून 'हा ध्रुवताराच मध्यमवर्गीय साहित्याच्या चौकटीतून दलित साहित्यास विमुक्त करील. एवढेच नव्हे तर, गेल्या आठशे वर्षांत ज्या साहित्याची व्याख्यादेखील मराठी सारस्वतांना करता आली नाही त्या दलित साहित्याची एक विधायक व्याख्या वर्णनासह व पुराव्यासकट संसिद्ध करू शकेल. दलित हा शब्दच नव्या अर्थाने व अर्थवत्तेने भारून टाकेल' असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे. आणि 'म्हणूनच आम्ही विचारवंतांनी या शब्दाच्या मागे लागण्याचा बाळचाळा

सोडला पाहिजे. हा शब्द गर्भार आहे. त्याच्या आसपास फिरकू नका. तो अपत्यसंभवाच्या नाजूक अवस्थेत आहे. थांबा किंवा हळूच पुढे जा! अशा स्वयंशिस्तीची आज खरी गरज आहे', असा इशाराही साहित्य क्षेत्राला त्यांनी दिला आहे. रा. ग. जाधव यांची दलित साहित्याविषयीची त्या काळातील ही भूमिका दलित साहित्याचे केवळ स्वागत करणारी म्हणून नव्हे तर सांस्कृतिकदृष्ट्याही महत्त्वाची ठरणारी आहे.

दलित साहित्याचे असे स्वागत व समर्थन करीत असतानाच दलित साहित्यिकांना रा. ग. जाधव यांनी दिलेले धोक्याचे इशारेही पाहण्यासारखे आहेत. 'प्रचारी टीकाकार व भलावणीकार समीक्षक हे दोघेही अनिष्टच ठरतील.', 'दलितेतरांची शाबासकी किंवा मान्यता मिळविण्याचा प्रयत्न करणे व तो प्रयत्न अयशस्वी झाल्यास हेत्वारोप करीत सुटणे किंवा तो प्रयत्न यशस्वी झाल्यास स्वत:ला धन्य समजणे या सर्व प्रकारांपासून



आज-उद्याच्या दलित साहित्यिकाने दूर राहावे' असे रा. ग. जाधव यांनी स्पष्टपणे बजावले आहे. सामाजिक प्रश्न व साहित्यिक प्रश्न यांच्यातील विवेकासंबंधीही रा. ग. जाधव यांनी स्पष्ट इशारा दिला आहे. ते लिहितात, 'आजच्या दलित समाजाचे सामाजिक व राजकीय प्रश्नोपप्रश्न ज्या निकडीच्या अवस्थेत आहेत ती अवस्था साहित्यिकाला साहित्येतर साध्य-साधनात साधनीभूत करण्याइतकी तीव्र आहे. शंकररावजी खरात व बाबूराव बागूल यांच्या हातातील लेखण्या त्यांच्या नकळत काढून तेथे मोर्चाचे फलक स्थापण्याची करामत ती अवस्था सहजपणे करू शकेल. लेखकाने समाजाभिमुख असावे, विशेषत: आजच्या दलित लेखकाने तर समाजाभिमुख असण्याची तीव्र गरज आहे. पण कोणत्याही समाजातील लेखकाची इष्ट समाजाभिमुखता म्हणजे अनिष्ट समाजाधीनता नव्हे... दलितांचे सामाजिक पातळीवरील प्रश्न सामाजिक पातळीवर समाज सोडवील, त्यांचे साहित्यिक प्रश्न साहित्यिक पातळीच्या स्वावलंबी वातावरणात दलित साहित्यिकलाच सोडवावे लागतील'. दलित साहित्याच्या आरंभकाळात रा. ग. जाधव यांनी त्यासंदर्भात घेतलेली ही भूमिका त्या प्रवाहाचा पुढील प्रवास पाहता किती गंभीर व सांस्कृतिकदृष्ट्या किती महत्त्वाची आहे हे कोणालाही जाणवण्यासारखे आहे.

दलित साहित्याच्या चळवळीच्या आरंभकाळात ही भूमिका घेणाऱ्या रा. ग. जाधव यांनी पुढील काळात 'ग्लासनॉस्त : दलित साहित्याच्या संदर्भात' या शीर्षकाखाली एक लेख




लिहिला आहे. ('सांस्कृतिक मूल्यवेध', १९९२ साली संग्रहित) या लेखात दलित साहित्याच्या समीक्षेला प्रोत्साहनपर समीक्षा असे हिणवणारांना 'ती एक कायमची गरज राहील' असे स्पष्टपणे सांगण्याचे धाडस रा. ग. जाधव यांनी केले आहे. 'दलितता ही लवकर संपणारी वस्तुस्थिती आहे असे मला वाटत नाही. शब्दार्थ आणि साहित्य यांपासून शेकडो वर्षे वंचित राहिलेली माणसे जेव्हा साहित्यनिर्मितीच्या अनोळखी जगात पावले टाकीत असतात, तेव्हा त्या पावलांना सुस्थिर करण्याचे काम समीक्षेने केले पाहिजे', अशा शब्दात रा. ग. जाधव यांची धारणा या लेखात व्यक्त झाली आहे. त्याचबरोबर, 'आपल्या समाजातील कितीतरी अलुतेदार बलुतेदार तसेच भटक्या विमुक्त जातींचे कवी, लेखक अजून निर्मितीचे सामर्थ्य ओळखू शकलेले नाहीत. स्त्री ही आपल्या समाजातील एक जातिनिरपेक्ष अशी सर्वंकष दलितता आहे. अपंग व्यक्ती ही आणखी एक जीवघेणी दलितता! खेड्यात अजूनही कसबसा तगून राहिलेला भिक्षूक हाही दलितच! दलितता अनंत आहे. ती नेमकी कशी आहे हे त्या त्या दलितांनीच सांगितले पाहिजे. ती क्षमता त्यांच्यात यावी. त्या सांगण्याला काही सांस्कृतिक मूल्य आहे.' इतकी व्यापक भूमिका रा. ग. जाधव यांनी स्पष्टपणे मांडली आहे. रा. ग. जाधव यांची समाजविषयक आस्था, त्यांचे सांस्कृतिक भान आणि साहित्य क्षेत्रातील सर्व प्रवाहांबद्दलची त्यांची स्वागतशीलता याचीच ही भूमिका दर्शक आहे.

मराठी साहित्य क्षेत्रातील ग्रामीण साहित्याची चळवळ किंवा स्त्रीवादी भूमिकेत झालेले लेखन यावर रा. ग. जाधव यांनी दलित साहित्य चळवळीइतके विपुल लिहिलेले नसले तरी त्या प्रवाहांची योग्य ती दखल त्यांनी घेतली आहे. (रा. ग. जाधव यांच्या दलितविषयक व्यापक कल्पनेतच हे सर्व प्रवाह समाविष्ट होतात हे त्याचे एक कारण असू शकेल.) आधुनिक मराठी कवयित्रींविषयी लिहिताना 'त्या नव्या वाटांच्या शोधसफरीवर निघालेल्या नवतेच्या सुवर्ण बेटाच्या दुर्दम्य प्रवासी आहेत' असे त्यांनी म्हटले आहे. तेथेही रा. ग. जाधव यांची दृष्टी स्वागतशील व त्या त्या प्रवाहाचे वैशिष्ट्य समजावून घेण्याचीच राहिली आहे. 'जगण्याचा काय किंवा साहित्याचा काय, अर्थ, अन्वय लावायचा तर इतर अनेक जीवनविषयक संदर्भ उभे करावे लागतात...मानवी जीवन व साहित्य यांचे निकटचे संबंध एकपदरी नसतात. त्याचप्रमाणे सदासर्वदा ते स्पष्टही नसतात. त्यासाठी साहित्याकडे गांभीर्याने पाहण्याची दृष्टी जोपासावी लागते व हीच मनोवृत्ती जीवनविषयक गांभीर्यात परिणत होते.' समीक्षक रा. ग. जाधव यांची साहित्याकडे पाहण्याची दृष्टी अशी समाजमनस्क व साहित्यधर्मी असल्यामुळेच त्यांना हे शक्य झाले आहे हे नि:संशय!

साहित्याकडे केवळ समाजमनस्क दृष्टीने पाहणाऱ्या समीक्षकांच्या लेखनात कधी कधी एक प्रकारचा वैचारिक कोरडेपणा किंवा साहित्यविषयक काहीशी एकारलेली भूमिका अनुभवाला येते. रा. ग. जाधव यांचे वैशिष्ट्य असे, की ते समाजमनस्क, सामाजिक प्रश्नांविषयी आस्था असलेले असे समीक्षक असले तरी रसिकता हे त्यांच्यातील समीक्षकाचे बलस्थान आहे. 'वैचारिक मीमांसा म्हणजे रसिकता नव्हे आणि प्रभावशाली विचारप्रणाल्या म्हणजेही रसिकता नव्हे. साहित्यकृतीच्या परिशीलनातून आनंद मिळविण्याची क्षमता म्हणजे रसिकता... रसिकता ही फक्त रससापेक्ष असते. रसपूर्ण कलापूर्ण आविष्कारांना ती स्वाभाविकपणेच तत्परतेने प्रतिसाद देते. रसिकता ही एक अखंड कलात्मक भक्ती असते. परिश्रमपूर्वक ती घडवावी लागते. रसिकतेचे संपादन ही एक अखंड कलात्मक साधना आहे. या साधनेत कलावस्तू व रसिक या दोघांनाच केवळ कलावस्तू व रसिक एवढ्याच नात्यांनी व भूमिकांनी स्थान असते. शुद्ध रसिक व रसिकता ही समाजाच्या सांस्कृतिक संपदेची निदर्शक असतात', ही रा. ग. जाधव

यांची रसिकतेविषयीची भूमिका आहे. 'एकवेळ समाजात कला-कलावंत नसले तरी चालेल पण रसिक व रसिकता हवी. त्यांच्या बळावर कला-कलावंत निर्माण होऊ शकतात.' एवढे रसिकतेचे मूलभूत महत्त्व रा. ग. जाधव यांना वाटते. 'ही रसिकता ज्ञानेश्वरी, दासबोध, मोरोपंतांचे आर्याभारत एवढेच नव्हे तर व्यंकटेशस्तोत्रासारख्या रचनांमधूनही नव्या दृष्टीने सौंदर्यप्रतीती देऊ शकते', असा त्यांचा विश्वास आहे. समाजमनस्क रा. ग. जाधव या रसिकतेच्या बळावरच साहित्यातील नव्या प्रवाहांकडे पाहत असतात. या प्रवाहांमागे असणारे सांस्कृतिक संदर्भ स्पष्ट करून ते त्यांचे स्वागत करतात. परंतु त्याचबरोबर साहित्य क्षेत्रातील प्रतिभेचे महत्त्वही ते अधोरेखित करीत असतात. 'चळवळ समाजनिष्ठ असो वा कलानिष्ठ, कला-वाङ्मयीन क्षेत्रात समर्थ प्रतिभावंताच्या आधारानेच ती उभी राहते. सांस्कृतिक ध्येयवाद कितीही प्रभावी असला तरी प्रतिभावंताच्या परतत्त्वस्पर्शाखेरीज तो टिकाऊ ठरणार नाही', असे त्यांचे स्पष्ट मत आहे. 'सामाजिक जाणिवांच्या धौशात नव्याने अंकुरित होणारी निर्मितिक्षमता सतत व्यग्र व्यस्त अवस्थेत घुसमटत राहते', तिला मुक्त केले पाहिजे असे रा. ग. जाधव यांच्यातील रसिकाला वाटते.
'सांस्कृतिक चळवळीच्या आंदोलकांनी रसिकतेच्या संवर्धनाकडे कमालीचे दुर्लक्ष केले आहे', 'सामाजिकतेचे थकविणारे भान, संकुचित समूहजाणिवा आणि वैचारिक असहिष्णुता यांच्या दबावाखाली कुंठित झालेले आपले सांस्कृतिक जीवन अभिजात रसिकतेच्या जोपासनेलाही वंचित होऊ लागलेले आहे... कला-साहित्याचे, कारागिरी कौशल्याचे क्रीडाखेळाचे कौतुक करण्यासाठीही आपणास समूहजाणिवांचे, वैचारिक बांधिलकीचे, जातीपातींचे परवाने घेणे आवश्यक वाटते', अशी खंत रा. ग. जाधव यांच्यातील रसिक स्पष्टपणे व्यक्त करतो. प्रगल्भ सामाजिक भान व उत्कट रसिकता या दोहोंचेही दर्शन रा. ग. जाधव यांच्या समीक्षालेखनात अनुभवाला येते.

समीक्षालेखन करताना रा. ग. जाधव यांच्या डोळ्यासमोर सर्व विसंवादासह आपला समाज असतो. समाजातील सर्व विसंवादांना आपण सर्व जबाबदार असून हे सर्व रोखण्याची जबाबदारी आपणा सर्वांची आहे असे ते मानतात. म्हणूनच हिंदी चित्रपटांमधील हिंसेविषयीही ते गंभीरपणे लिहितात. भगवद्‌गीतेतील अर्जुन विषादयोगाच्या निमित्ताने 'गांधीवाद ही आधुनिक काळातील एका विराट कुरुक्षेत्रावरील भगवद्‌गीताच होय... एखाद्या अत्यंत कसोटीच्या व निर्वाणीच्या क्षणी माणसात जागृत होणाऱ्या विशुद्ध मानव्याच्या ज्योतीचा तो विषादयोग हे प्रतीक आहे', असा वेगळा विचार ते मांडतात. सर्वसामान्य रसिकाच्या मनात असणाऱ्या प्रश्नांना ते वाचा फोडतात. पण त्या प्रश्नांची मुळे किती व्यापक प्रदेशात पसरली आहेत हे दाखवून त्याची जाणीव विकसित करण्याचा रा. ग. जाधव प्रयत्न करतात. वादविवादापेक्षा संवादावर त्यांचा अधिक भर आहे. सामाजिकतेचे व्यापक भान ठेवीत असताना साहित्य क्षेत्राची सापेक्ष स्वायत्तता ते नाकारीत नाहीत. साहित्याचे सामाजिक-सांस्कृतिक संदर्भ ध्यानात घेऊनही साहित्यविषयक विशुद्ध रसिकतेला ते गौण मानीत नाहीत. रा. ग. जाधव यांच्या या वैशिष्ट्यांमुळेच ते वाङ्मयीन संस्कृतीचे समर्थक व संवर्धक ठरतात.

आज आपले साहित्य क्षेत्र व्यावहारिक दृष्टीने पाहता बरेच गजबजलेले दिसते. जागोजागी होणारी चर्चासत्रे, व्याख्याने, पुरस्कार प्रदान सोहळे, पुस्तक प्रकाशन समारंभ ही या गजबजलेपणाची लक्षणे सांगता येतील. परंतु या गजबजाटात आपली वाङ्मयीन संस्कृती मात्र क्षीण राहिली आहे. दिमाखदार मनोरंजन आणि रुक्ष वैचारिकता व संज्ञा-संकल्पनांचा खडखडाट यामध्ये साहित्यविषयक अभिजात रसिकता अंग चोरून वावरत आहे. अशा काळात वर्तमानाचे रहस्य जाणून वाङ्मयीन संस्कृतीविषयी आस्थेने लिहिणाऱ्या-बोलणाऱ्या समीक्षकाची समाजाला गरज असते. असा समीक्षक परस्परांशी संबंधित अशा वेगवेगळ्या भूमिका पार पाडीत असतो. ललित साहित्यकृतीची सामाजिकता आणि साहित्याची परंपरा यांचा शोध घेताना तो इतिहासकाराच्या भूमिकेत असतो. साहित्यकृतीची अर्थपूर्णता व परिणाम स्पष्ट करताना त्याची भूमिका सौंदर्यशास्त्रज्ञाची असते. इतिहासकार किंवा सौंदर्यशास्त्रज्ञ म्हणून युक्तिवाद करीत असताना तो परंपरेचा रक्षक व व्यवस्थापक होत असतो. आणि आपल्या तीनही भूमिकांचे समर्थन करताना कधी कधी तो विचारप्रणालीचा उद्‌गाता होत असतो. रा. ग. जाधव हे आजच्या काळातील असे एक समीक्षक आहेत.

साहित्य धर्माचे उपासक

# रा. ग. जाधव

विलास खोले

प्रा. रा. ग. जाधव पुण्याला आले त्याला आता एक तप होऊन गेले. रमणबागेजवळ एका घराच्या माळ्यावर म्हणता येईल अशा खोलीत ते जवळपास अडीच वर्षे राहिले. तिथेच मी त्यांना त्या काळात भेटायला गेलो होतो. दिलीप पुरुषोत्तम चित्रे यांचा एस.एन.डी.टी.च्या मराठी विभागाने गौरव करायचा ठरविला होता, आणि त्यासाठी पुण्यात सर्वांत योग्य व्यक्ती जाधवांशिवाय दुसरी कुणीच नव्हती. चित्र्यांच्या कवितांसंबंधी त्यांनी अतिशय बारकाईने लिहिलेले होते आणि कविता समजून घेऊन अगदी अस्खलित अशा भाषेत त्यांनी तिचे रसग्रहण केले होते. संकोचाने नाही नाही म्हणणारे जाधव मी आग्रह सोडला नाही म्हणून आले आणि पुढे मात्र एस.एन.डी.टी.मध्ये येऊ लागले. त्यांच्या गंभीर असणाऱ्या परंतु हसून चटकन जवळीक साधणाऱ्या चेहऱ्याची व पँटमध्ये शर्ट खोचून पट्टा बांधलेल्या आणि बंदाचे बूट घातलेल्या, आपल्याच विचारांत मग्न राहून चालणाऱ्या मूर्तीची सर्वांना सवय झाली. वेगवेगळ्या चर्चासत्रांसाठी, कार्यक्रमांसाठी आणि एम.फिल.च्या अध्यापनासाठी ते अगदी २००४ पर्यंत एस.एन.डी.टी.मध्ये नियमाने येत राहिले. एकमेकांच्या घरी आणि बाहेर आमच्या भेटी होऊ लागल्या. सहवास वाढू लागला आणि त्यांच्या उत्कट स्नेहातली स्निग्धता माझ्याच नाही, तर घरातल्या सर्वांच्याही अनुभवाला येऊ लागली. "काय म्हणतात? तब्येत काय म्हणतेय? तब्येतीला जपा." या चौकशीतून त्यांचे संभाषण सुरू होते. त्यांच्या या प्रश्नांत औपचारिकतेचा लवलेशही नसतो; कुटुंबातल्या माणसाशी काटाकाळजीने बोलावे त्यातला जिव्हाळा असतो. एके काळी ते एल्फिन्स्टन कॉलेजात व मी इस्माइल युसूफमध्ये असल्यामुळे त्यांच्याबद्दल बरेच ऐकून होतो; पण जसजसा त्यांचा सहवास वाढत गेला तसतशा त्यांच्या आयुष्यातल्या एकेक गोष्टी स्पष्ट होत गेल्या.

रावसाहेब गणपतराव जाधव यांचा जन्म २४ ऑगस्ट १९३२ रोजी बडोद्याला 'विश्वामित्रीच्या काठी' झाला. योगायोगाने प्रा. जाधवांच्या आयुष्यात नदीकाठांनी नवनवी वळणे आणली आहेत. मुठा नदीच्या काठी पुण्याला बालपण, गोदावरीकाठी नाशिकला उमेदवारीचा काळ, कृष्णाकाठी वाईला विश्वकोशाची सेवा आणि आता पुन्हा त्यांचे वास्तव्य मुठेच्याच किनाऱ्यावर. बाबूराव जगतापांच्या शिवाजी मराठा हायस्कूलमध्ये त्यांचे शालेय शिक्षण झाले. तिथून ते मॅट्रिक झाले. शाळेत असतानाच त्यांच्या लेखनाला आरंभ झाला तो कवितेने. याच काळात त्यांनी 'पुण्यप्रभा' नावाचे एक लहानसे नाटकही लिहिले होते. त्यांचे वडील बडोदे संस्थानात नोकरीला असल्यामुळे तेथे गंधर्व नाटक मंडळी व इतर नाटक मंडळ्या यांची हजेरी असे. शिवाय वडिलांना तबला वाजवण्याची कला चांगली अवगत होती आणि आईचा आवाज सुरेल होता. घरात ती स्त्रीगीते म्हणत असे. याचा परिणाम असा झाला की, आपण नाटक लिहून पाहावे असे रावसाहेबांना वाटले. शाळेचा विद्यार्थी असतानाच त्यांनी साहित्य प्राज्ञ व साहित्य विशारद या परीक्षा दिल्या आणि मॅट्रिकच्या वर्षी ते साहित्य विशारद झाले. त्यामुळे सोळाव्या वर्षीच संस्कृत साहित्यशास्त्राशी आणि टीकाशास्त्राशी त्यांची ओळख झाली.

मॅट्रिकनंतर पुढले शिक्षण घेण्यासाठी त्यांनी सर परशुरामभाऊ महाविद्यालयात नाव नोंदवले खरे, पण तिथून पदवी मिळायचा योग नव्हता. नोकरी करत शिकणारे रा. ग. पुण्यातल्या शंकरशेठ रोडवर असणाऱ्या एस्. टी. च्या कार्यालयात

काम करत होते. एकाएकी त्यांची ही नोकरी गेली आणि संगमनेर डेपोला कारकून म्हणून त्यांना बदलीवर नोकरी मिळाली. ही बदली त्यांच्या पथ्यावरच पडली म्हणायची, कारण त्यामुळेच त्यांना नाशिकमधल्या साहित्यविश्वात वावरता आले. तिथे ते रमले. कुसुमाग्रज, अ. वा. वर्टी, बाळासाहेब दातार, बाळासाहेब व दत्ता सराफ या तत्कालीन नामवंत साहित्यिकांशी त्यांचे जवळचे संबंध आले. वि. बा. आंबेकरांकडेही त्यांचे वारंवार जाणेयेणे घडले. आंबेकर आगरकरवादी होते आणि येणाऱ्याजाणाऱ्यांशी ते मनापासून बोलत असा जाधवांचा अनुभव होता. विंदा करंदीकरांच्या 'ती जनता अमर आहे'चा उद्घोष त्यांनी पहिल्याप्रथम नाशिकमध्येच ऐकला. दि. के. बेडेकर याच दरम्यान सुमारे वर्षभर नाशिकला प्राध्यापक म्हणून आले होते. त्यांना ते आपल्या कविता दाखवीत.



नाशिकमधल्या वातावरणाने त्यांच्यातील लेखनगुणांचा विकास होत गेला. दादासाहेब पोतनीस यांच्या 'गावकरी'च्या साप्ताहिक पुरवणीचे काम करण्याची संधी जाधवांना लाभली. 'साहित्यातील सुधा आणि काकवी' नावाचे सदर त्यांनी 'गावकरी'मधून चालवले. त्यांनी केलेले 'मालतीमाधव' या नाटकाचे भाषांतर 'गावकरी'मधून सचित्र स्वरूपात प्रसिद्ध झाले. त्यांची आई नित्य म्हणत असलेल्या 'व्यंकटेशस्तोत्रा'चे सुरेख रसग्रहणही त्यांनी रविवारच्या 'गावकरी'च्या अंकातून प्रसिद्ध केले. आईची व त्यांची साहित्यिक सोबत तर शाळेत असल्यापासूनच होती. शाळेत असताना आई जेव्हा घरी रात्री भांडी घासे तेव्हा जाधव तिला साने गुरुजींच्या 'गोड गोष्टी' वाचून दाखवीत. स्वराज्यावरच्या ऐतिहासिक कादंबऱ्याही त्यांनी याच काळात आईला वाचून दाखवल्या होत्या आणि त्या वाचताना ते इतके तादात्म्य होत की, ऐतिहासिक कादंबऱ्यांतली स्वराज्यावरची संकटे म्हणजे जणू स्वत:वरच कोसळलेली संकटे आहेत, असे त्यांना वाटे.

नाशिकनंतरचा जाधवांचा एक तपाचा काळ महाविद्यालयीन अध्यापनात व्यतीत झाला. १९५८ साली जाधव महाविद्यालयात मराठीचे अध्यापन करू

लागले. विदर्भ महाविद्यालय, एल्फिन्स्टन महाविद्यालय आणि मिलिंद महाविद्यालय या ठिकाणी त्यांनी मराठीचे अध्यापन केले. अमरावतीला रा. भा. पाटणकर, के. ज. पुरोहित, दि. य. देशपांडे, नातूबाई यांच्यासारख्या प्राध्यापकांचा सहवास त्यांना लाभला. जाधव नेहमी सांगतात की, "आय वॉज ऑल्वेज इन द बेस्ट कंपनी." वाईला ते ज्या घरात राहत तिथे तर दत्त मंदिरच होते. त्यामुळे "मी बिघडण्याची शक्यता कधीच नव्हती", असे ते म्हणतात. जेव्हा ते एल्फिन्स्टनमध्ये आले तेव्हा एका लहानशा गावातून मुंबईसारख्या महानगरीतल्या एका प्रतिष्ठित महाविद्यालयात आल्याची तीव्र जाणीव त्यांना झाली. म. अ. करंदीकर, म. वा. धोंड, सरोजिनी शेंडे यांसारखे सहकारी तिथे होते. मुख्य म्हणजे तिथले वातावरण अगदी 'एलिट क्लास'चे होते. इंग्रजी भाषा, इंग्रजी साहित्य, इंग्रजीतील आधुनिक समीक्षाविचार इथे सतत त्यांच्या कानावर पडत होता. इथून मिलिंद महाविद्यालयात गेल्यावर अगदीच वेगळ्या जीवनाशी त्यांची ओळख झाली. त्यांच्या समीक्षाविचारात ज्याला अग्रक्रम लाभला त्या दलित साहित्याचे, दलित जीवनजाणिवांचे आणि दलितांच्या आंदोलनाचे औरंगाबादमध्ये ते साक्षीदार बनले. 'निळी पहाट' आणि 'निळे पाणी' यांचा अनुभव त्यांनी इथेच घेतला. दलित साहित्याची मीमांसा करणारे त्यांचे लेखन व इतरही बरेच समीक्षालेखन याच काळात घडले. "दलित साहित्याला खरीखुरी गरज स्वच्छ व दार्शनिक अधिष्ठानाची आहे. दलित समाजाला साहित्यिकापेक्षा निष्ठावंत विचारवंतांची अधिक आवश्यकता आहे", याचे भान त्यांनी आपल्या दलित साहित्यमीमांसेतून आणून दिले. "दलित साहित्याला प्रभावी समीक्षकाचीही गरज आहे. आपल्या समाजाची भाषा व भावना जाणणारा आणि त्यांच्याशी मन:पूर्वक समरस होणारा दलित टीकाकार दलित साहित्यिकाला फार मोठी प्रेरणा देऊ शकेल", हे त्यांनी केवळ ओळखलेच नाही तर, दलित साहित्याच्या समीक्षेचे महत्त्वाचे काम त्यांनी समर्थपणे पार पाडले.

१९७० साली तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे एक सहकारी व मराठी विश्वकोशाच्या मानव्य विद्या शाखेचे प्रमुख संपादक म्हणून वाईच्या विश्वकोश कार्यालयात ते रुजू झाले. तिथून निवृत्त होईपर्यंत म्हणजे १९९० पर्यंत जाधव वाईला होते. विश्वकोशातील कामाचा जाधव यांना आणि जाधव यांच्या कामाचा विश्वकोशाला खूप उपयोग झाला. अंगीकृत कार्यावरची निष्ठा, जिज्ञासू चिकित्सकता व मन:पूर्वकता हे जाधवांच्या स्वभावाचे आणि कार्यपद्धतीचे विशेष. शास्त्रीबुवांच्या सहवासात त्यांच्या कार्यशक्ती फुलून आल्या. विश्वकोशासारख्या कामाला जो साक्षेप आवश्यक असतो तो आणि त्याला तितकीच आवश्यक असणारी चिकाटीची जोड या गुणांच्या जोरावर विश्वकोशाचे काम त्यांनी झपाट्याने पार पाडले. वेगवेगळ्या ज्ञानक्षेत्रांशी, त्यातील विद्वानांशी त्यांचा जवळून परिचय झाला. विश्वकोशातल्या कामाचा आणि वाईमधल्या निवांत वातावरणाचा त्यांच्या लेखनावर चांगला परिणाम झाला. या काळात त्यांच्या समीक्षालेखनाला बहर आला. अर्नाळकरांच्या रहस्यकथेपासून अमिताभच्या अभिनयापर्यंत आणि साहित्याच्या सामाजिक बांधिलकीपासून तेंडुलकर-आळेकरांच्या नाट्यलेखनापर्यंत त्यांच्या समीक्षेने कोणताच विषय अविषय मानला नाही. समकालीन साहित्यकृतींना व साहित्यविचाराला उत्कट प्रतिसाद देण्याचा त्यांचा मनोधर्म तर त्यांच्या समीक्षेतून प्रकटतोच, शिवाय साहित्याचे संस्कृतीच्या परिप्रेक्ष्यात चिंतन करण्याची आणि त्यासंबंधी स्वतंत्र सिद्धान्तन करण्याची त्यांची क्षमताही त्यांच्या लेखनातून व्यक्त होते. त्यांचे हे सिद्धान्तन त्यांच्या पांडित्याचे नाही, तर प्रतिभेचे अपत्य आहे. त्यांच्या कविमनाचे दुसरे अंगच त्यांच्या समीक्षेतून प्रकटत असते.

त्यांची समीक्षा हे त्यांचे साहित्यविषयक चिंतन असते, मग ते

*"तुझ्याकडे येताना ।*
*मी असेन अगदी एकटा*
*एकटेपणाच्या मेण्यात ।*
*दुर्गम वाटेवर दुर्लभ झालेल्या*
*तुझ्या प्रासादाशी ।*
*मेणा थांबेल तेव्हा*
*मीच येईन तुझ्या दरबारी ।*
*कवितेचे पंख लावून*
*-कवनांचा नजराणा घेऊन ।*
*तुझे द्वार नि द्वारपाल ।।*
*नाही ना अडवणार मला?*
*नाही ना माझे पंख कापणार ?।*
*नाही ना, नाही ना, नाही ना?"*

– 'मावळतीच्या कविता' मधून

साहित्यकृतीसंबंधीचे असो, समाजासंबंधीचे असो किंवा संस्कृतीविषयीचे असो. त्या चिंतनाच्या अभिव्यक्तीत एक प्रकारची अमूर्तता असते, एक प्रकारचे ॲब्स्ट्रॅक्शन असते, आणि अशा प्रकारचे ॲब्स्ट्रॅक्शन करता येण्यासाठी गरजेचे असणारे मनन-चिंतन त्यांच्याकडून झालेले असते. त्यांची समीक्षा म्हणजे नुसता अभ्यास नसतो, तर जीवनानुभवांच्या प्रतीतीला व मानवी संस्कृतीच्या इतिहासाला स्पंदनशील मनाने दिलेला प्रतिसाद असतो. ते असे मानतात की, ''साहित्याला एक मानव्य मूल्य असते. माणसाची माणूस म्हणूनच संभवणारी प्रतिष्ठा त्यातून जोपासली जाते. माणसाच्या गुणदोषांवर, जयपराजयावर, दयाक्रौर्यावर, सुखदु:खावर सारख्याच आत्मीयतेने प्रेम करण्याचा प्रयत्न साहित्य करीत असते.''... ''साहित्याचे मानव्य मूल्य जपणे याचा अर्थ, समाजातच माणसाच्या केवळ माणूस म्हणून संभवणाऱ्या मूल्याचे संवर्धन करणे होय. या मूल्याचा संदर्भ सतत जागृत राखणे, हे आपल्यासारख्या बहुजिनसी व पारंपरिक समाजात तर नितांत आवश्यक आहे.'' त्यामुळेच ''साहित्याच्या आशयद्रव्याची, रंगरूपांची, अर्थपूर्णतेची, मूल्यांची संगती लावून देणारे समग्रलक्ष्यी चिंतन म्हणजे समीक्षा'' अशी त्यांची समीक्षेविषयीची धारणा आहे. सौजन्य हा जसा जाधव यांचा स्वभावविशेष आहे तसाच तो त्यांच्या समीक्षालेखनाचाही महत्त्वाचा विशेष आहे. मराठीतील कवयित्रींचा सहानुभूतीपूर्वक परामर्श घेणारे त्यांचे लेखन हा त्यांच्यातील सौजन्याचा आविष्कार आहे.

जाधव यांच्या प्रकाशित पुस्तकांची संख्या सदतीस आहे. त्यांपैकी किमान तीस तरी पुस्तके समीक्षेसंबंधीची आहेत. त्यामुळेच त्यांनी काव्यनिर्मिती केली असली, कोशकार्य केले असले, संपादने केली असली, तरी समीक्षक रा. ग. जाधव हीच त्यांची महाराष्ट्रातील प्रतिमा आहे. अलीकडे पंचाहत्तराव्या वर्षात पदार्पण केल्यानंतर समीक्षक हा आपल्या नावाबरोबर येणारा शिक्का पुसला जावा आणि आपण एक कादंबरी लिहावी, असे त्यांच्या मनात येऊन गेले. परंतु जाधव आज जे कोणी आहेत ते समीक्षेमुळेच आहेत याचा विसर कोणालाच पडणे शक्य नाही. त्यांचे वाङ्मयीन आकलन समंजस आहे आणि मराठी साहित्यसंचिताची त्यांची मीमांसा प्रगल्भ आहे. तुकारामांच्या कवित्वापासून पर्यावरणीय प्रबोधनापर्यंत आणि नववाङ्मयीन प्रवृत्तिप्रमेयांपासून आगळ्यावेगळ्या नाट्यरूपांपर्यंत नानाविध साहित्यान्तर्गत प्रश्नांचा त्यांनी आजवर घेतलेला परामर्श अतिशय उद्‌बोधक ठरला आहे.

वाईला असेपर्यंत अपवादभूत प्रसंग सोडले तर रा. ग. जाधव सभासंमेलनांमध्ये क्वचितच दिसत. पुण्याला आल्यावर मात्र त्याची सर्व भरपाई झाली. ते पुण्यात आले आणि त्यांचे ग्रहच बदलले. गृहस्वामिनीची साथ संपल्याचे चिरदु:ख बरोबर होते, पण मन रमविणारा साहित्यसहवास मात्र इथे पुरेपूर वाट्याला आला. जाधव पुण्यात आले आणि पुण्याच्या




साहित्यिक वातावरणाचा एक अविभाज्य घटक बनले. पुण्यातले कुठलेही चर्चासत्र, पुस्तकप्रकाशनाचा कुठलाही कार्यक्रम जाधवांच्या उपस्थितीवाचून सहसा घडलेला नाही. सुरुवातीला व्यासपीठावर अवघडणारे, संकोचणारे जाधव गेल्या दहा-बारा वर्षांत व्यासपीठाला सरावले आहेत. माणसे त्यांना चांगली ओळखता येतात. कोण आपले आणि कोण मतलबी जवळीक दाखवतात ते त्यांना बरोबर समजते. अशांच्यात त्यांचे मन रमत नाही आणि अशा सहवासाचा प्रसंग ते शक्यतोवर टाळतात. चर्चासत्रे आणि वैचारिक देवाणघेवाणीचे प्रसंग यांत सहभागी व्हायला त्यांना मनापासून आवडते. दुसऱ्याचे बोलणे शांतपणे ऐकून घेण्याइतका धीर त्यांच्याजवळ नेहमीच असतो आणि स्वत:चे जे काही मत असेल ते न बिचकता ते नंतर ठामपणे मांडतात. जिथे बोलले नाही तर चालणार असेल तिथे मौन पाळणेच ते पसंत करतात.

एखाद्याचे बोलणे आवडले किंवा एखाद्याचे लिहिणे आवडले तर टाळ्या वाजवून अगदी उत्स्फूर्तपणे ते प्रतिसाद देतात किंवा 'वा! वा!' म्हणून दाद देतात. आवडलेल्या कोणत्याही गोष्टीला उत्स्फूर्तपणे दाद देणे हा त्यांचा स्वभावच आहे. त्यांनी केलेली मराठीतील सुंदर कथांची रसग्रहणे याची साक्ष पटवतात. त्यांचे हे लेखन म्हणजे त्यांच्या सौंदर्याभिलाषी मनाचा व त्यांच्या ठायी असणाऱ्या तरल संवेदनशीलतेचा उत्कट प्रत्यय असे म्हणता येईल.

विश्वकोशाचे प्रमुख संपादक व विश्वकोश मंडळाचे अध्यक्ष म्हणून त्यांनी जी जबाबदारी स्वीकारली ती मुख्यत्वे मित्रांच्या आग्रहास्तव आणि विश्वकोश मार्गी लावण्याच्या आकांक्षेने. त्यामुळेच त्यानंतर जेवढा काळ जाधवांनी काम पाहिले त्या संपूर्ण काळात त्यांनी एकहाती खूप काम उरकले. महाराष्ट्र शासनाने त्यांना विश्वकोश मंडळाचे अध्यक्ष केले खरे, परंतु त्यांच्या कामाची जी काही बूज राखावी ती मात्र राखली नाही. असे असले तरी अजूनही त्यांना विश्वकोश चटदिशी पुरा व्हायला हवा अशी तळमळ लागून राहते, आणि मनापासून धडपड केली व सरकारचे सहकार्य असेल तर तो चटदिशी पुरा होईलही अशी खात्री वाटते.

जाधव साहित्य संमेलनाचे अध्यक्ष झाले. बिनविरोध झाले. केवळ समंजस, समतोल, सुजाण साहित्य समीक्षेच्या जोरावर आणि सौजन्यशील वागण्यामुळे मराठी साहित्य क्षेत्रातला हा सर्वोच्च सन्मान त्यांच्या वाट्याला आला. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या

*"माझा कांतारीचा वास,*
*दिसे का गे तुला तेथ?*
*तुझ्या माझ्या भेटीसाठी,*
*आहे का एखादी वाट?"*
– 'वियोगब्रह्म' मधून

पदाधिकाऱ्यांनी, निकटवर्ती मित्रांनी आणि महाराष्ट्रातील त्यांच्या चाहत्यांनी एकमताने त्यांना पाठिंबा दिला. साहित्य संमेलनाचे अध्यक्ष झाल्यावर अनेकांनी त्यांना आता तरी तुमच्या बोलण्यात मधूनमधून येणारे इंग्रजी टाळा असा सल्ला दिला होता, परंतु जाधवांनी तो फारसा मनावर घेतला नाही. त्यांच्या स्वतःच्या बोलण्यात अधूनमधून इंग्रजी शब्द आणि वाक्ये येतात हे खरे. तथापि मराठीबरोबर इंग्रजी आणि हिंदी अशा भाषा प्रत्येकाला अवगत असल्या पाहिजेत व त्यांचा गरजेनुरूप उपयोग केला पाहिजे अशी त्यांची भूमिका आहे. तीमधूनच मराठी, इंग्रजी व हिंदी अशा त्रिभाषासूत्राचा त्यांचा आग्रह त्यांनी प्रतिपादन केला आहे.

रा. ग. जाधव हे कवी आहेत. त्यांनी सातत्याने कविता लिहिली आहे. अजूनही त्यांचे काव्यलेखन चाललेच आहे. १९५९ साली 'छंद' या नियतकालिकाने आयोजित केलेल्या काव्यस्पर्ध्येत त्यांच्या 'शिरमोही' या दीर्घ चिंतनपर काव्यास पहिले पारितोषिक त्र्यं. वि. सरदेशमुख यांच्याबरोबर विभागून मिळाले होते. दीर्घकाळ कविता लिहीत असणाऱ्या जाधवांचे कवितासंग्रह प्रकाशित व्हायला मात्र खूप वर्षे जावी लागली. 'वियोगब्रह्म' आणि 'मावळतीच्या कविता' हे त्यांचे काव्यसंग्रह अनुक्रमे १९९५ व १९९७ साली प्रसिद्ध झाले. 'वियोगब्रह्म'मधील कविता त्यांच्या प्रिय पत्नीच्या—कै. सौ. शशिकला जाधव यांच्या—निधनानंतर लिहिलेल्या आहेत. पत्नीबरोबरच्या सहजीवनातील आठवणींनी व्याकूळ होऊन तिच्या वियोगाने सैरभैर झालेल्या संवेदनशील हळुवार कविमनाच्या स्पंदनातून निर्माण झालेली ही कविता जाधवांच्या मनःप्रकृतीवर प्रकाश टाकणारी आहे. शशिकाला जाधव यांच्या स्मृतींनी त्यांना नेहमीच गलबलून येते. त्या गेल्यानंतर बरीच वर्षे त्यांच्या स्मृतिदिनाचे कार्यक्रम त्यांनी केले, आणि या प्रसंगी सामाजिक कार्य करणाऱ्या महिला कार्यकर्त्यांना त्यांनी दरवर्षी रोख पाच हजार रुपयांचा याप्रमाणे अनेक वर्षे व्यक्तिगत पातळीवर पुरस्कार दिले.

*"कसे विदेही राहून*
*तुझेपण जपतेस?*
*सांग मला माझ्याकडे*
*कोण्या रूपे पाहतेस?"*
– 'वियोगब्रह्म' मधून

जाधव आणि मी बरोबर खूप प्रवास केला. नागपूर, अमरावती, गोवा, मुंबई, औरंगाबाद, हिंगोली, कोल्हापूर अशा अनेक ठिकाणी अनेक वेळा आम्ही दोघे बरोबर गेलो-आलो आहोत. नानाविध विषयांवर आमच्या खूप गप्पा झाल्या आहेत. वेगवेगळ्या व्यक्तींबद्दलही बोलणे झाले आहे. परंतु त्यांचे बोलणे चुकूनसुद्धा कुत्सिततेच्या पातळीवर गेलेय असे घडले नाही. निंदानालस्ती वा टवाळकी-कुचाळकी त्यांना कधीही रुचत नाही. अशा प्रकारची असभ्यता त्यांनी सदैव दूर

ठेवली आहे. प्रवासात चांगले सुखसोयीने राहणे त्यांना आवडते, त्यांची रसिकता जागी होते, खाण्यापिण्याबाबत एरवी असणारी उदासीनता कमी होते आणि खाद्यपेयांचा आस्वाद ते मनापासून घेतात. फळांचा रस किंवा आइस्क्रीम त्यांना आवडते, मात्र एरवी त्यांच्या सवयी अगदी साध्या आहेत. अलीकडे प्रकृतीच्या तक्रारी वाढल्यामुळे त्यांची सिगारेट सुटली आहे. नाहीतर लिहिताना सिगारेट आणि व्यासपीठावर बोलण्यापूर्वी ॲनासिनची गोळी यांवाचून त्यांचे कामच होत नाही. रमणबागेशेजारचा माळा सोडून सदाशिव पेठेतल्या 'अनपट बिल्डिंग'मध्ये सर्वात वरच्या मजल्यावर सात-आठ वर्षे राहणारे जाधव आता दोनेक वर्षांपासून साधना परिवाराच्या पुढाकाराने शनिवारात एका सदनिकेत राहतात. 'साधना' साप्ताहिकाचे कार्यालय तेथून जवळच आहे. बैठक मारून बसणे आणि कामात अखंड व्यग्र असणे असा पिंड असणारे रा. ग. जाधव 'साधने'च्या साठीनिमित्त 'निवडक साधना'चे काम गेले वर्षभर करताहेत. हे काम करताना साने गुरुजींच्या उत्कट समर्पणशीलतेचे, त्यांच्या आंतरभारतीच्या भव्य स्वप्नाचे स्मरण त्यांना सतत होत असते. साने गुरुजींची व त्यांच्या कार्याची आठवण आता फारशी कुणाला राहिली नाही याची खंत त्यांना वाटत राहते व ते ती बोलूनही दाखवतात.

'साहित्य हाच माझा धर्म आणि या साहित्यधर्माचा मी उपासक' असे मानणाऱ्या रा. ग. जाधव यांना सर्व साहित्यप्रेमीविषयी मनापासून आस्था वाटते. आज-उद्याचे मराठी लेखक-कवी ज्या पर्यावरणात वावरताहेत ते पर्यावरण, साहित्यनिर्मितीसंबंधी त्यांचा असणारा 'कन्सर्न', त्यांच्या संवेदनशीलतेवर प्रभाव टाकणाऱ्या गोष्टी, जगण्याच्या वास्तवाशी त्यांच्या सर्जनशीलतेने राखलेली संगती, त्यांची वाङ्मयीन स्वप्ने आणि साधने, त्यांच्या सामाजिक जाणिवांचे स्वरूप यांसारख्या विषयांत जाधवांना मनापासून रस वाटतो. त्यांना भेटायला येणाऱ्या सर्व नवलेखकांना, विद्यार्थ्यांना आणि रसिकांना कोणतीही सबब न सांगता ते भेटत असतात, त्यांच्याशी बोलत असतात. भेटायला येणाऱ्यांनाही आपले हृद्गत त्यांच्यापाशी व्यक्त करावे, आपले लेखन त्यांना दाखवावे, त्यांच्याकडून मार्गदर्शन घ्यावे, त्यांच्या शाबासकीची थाप आपल्या पाठीवर पडावी असे वाटत असते. जाधव कोणालाही हिरमुसले होऊ देत नाहीत. कोणालाही न दुखावता ज्याला त्याला योग्य ती वाट दाखवतात.

आजवर रा. ग. जाधव यांना वेगवेगळे सन्मान प्राप्त झाले. त्यांच्या पुस्तकांना महाराष्ट्र शासनाची, विविध साहित्य संस्थांची पारितोषिके मिळाली. यशवंतराव चव्हाण पुरस्कार, प्रियदर्शिनी पुरस्कार, युगांतर पुरस्कार यांसारखे अन्य पुरस्कारही लाभले. या सगळ्यांवर महाराष्ट्र फाउण्डेशनच्या वतीने दिल्या जाणाऱ्या जीवनगौरव पुरस्काराने कळस चढविला आहे. यानिमित्त ज्येष्ठ मित्रवर्य रा. ग. जाधव यांना अभिवादन.

*तुकोबांचे सामाजिक-सांस्कृतिक महत्त्व व प्रेरकता आणि त्यांच्या गाथेचे वाङ्मयीन महत्त्व व प्रभावशीलता या दोन्ही गोष्टी स्वयंभू आहेत, समीक्षासापेक्ष नाहीत. तुकारामदर्शनावर एकही पुस्तक नव्हते, तेव्हाही ते दर्शन,*

*'कोण सांगायास । गेले होते देशोदेशी वाऱ्याहाती नेले माप । समर्थ तो माझा बाप'*

*असे म्हणत सर्वदूर पसरलेच आणि आता व यापुढे कुणी तुकोबा-दर्शनकार झालाच नाही, तरी ते दर्शन देशोदेशी नेण्याचे काम वारा पार पाडेलच. कालच्या, आजच्या व उद्याच्या दर्शनकारांचा अधिक्षेप करण्यासाठी मी हे सांगत नाही. ते सांगण्याचे कारण वेगळे आहे. ते असे की, तुकोबांना मी फक्त यथार्थपणे जाणतो व म्हणून माझ्या जाणकारीचे जतन करणे यात तुकोबांनाच मी जतन करण्यासारखे आहे; इतरांच्या हाती तुकोबा सुरक्षित नाहीत; त्यांची सुरक्षा ही माझी सामाजिक-सांस्कृतिक जबाबदारी आहे; म्हणून माझे तुकारामदर्शन हेच रक्षणीय, पूजनीय आहे, यासारखी भूमिका दर्शनकाराने घेण्यात अर्थ नाही. तुकोबादर्शनाची अनेकार्थकता, अनेकता व विविधता मान्य करण्याखेरीज गत्यंतर नाही. तुकोबांच्या श्रेष्ठत्वाची व प्रेरकतेची काळजी घेण्यास स्वतः तुकोबाच समर्थ आहेत आणि ही गोष्ट तुकारामदर्शनाच्या तीनशे वर्षांच्या इतिहासपरंपरेने निर्विवादपणे अधोरेखित केली आहे.*

*– 'वागर्थ'मधून*

## घेणारा आणि दामदुपटीने देणारा गर्भश्रीमंत-लेखनश्रीमंत

# रत्नाकर मतकरी

कमलाकर नाडकर्णी

'आपलं काम निष्ठेने आणि प्रामाणिकपणे करा. तीच देवाची भक्ती. ते करीत असताना आपण समाजासाठी आहोत हे कधीही विसरू नका. आपल्या कामातच आपला देव पहा.' संत गाडगेबाबांनी केलेले आजच्या 'सामजिक बांधिलकी'चे हे इंटरप्रिटेशन, हे अर्थनिर्णयन, हा अन्वयार्थ आजही जुना झालेला नाही. आपल्या कामातच सामाजिक बांधिलकी पाहणारे आणि सामाजिक बांधिलकीतच आपले काम पाहणारे जे अगदी मोजकेच साहित्यिक आहेत त्यात रत्नाकर मतकरी अग्रेसर आहेत.

फाउंटनपेनच्या जाहिरातीत त्याच पेनने काढलेली एक लांबवर गेलेली रेषा दाखवतात व ती कित्येक किलोमीटर्स चालू शकेल असे सांगतात. त्याच हिशेबाने मतकरींच्या लेखणीची रेषा पृथ्वीला काही पालांडं घालू शकेल इतकी दीर्घकाळ सतत चालते आहे. वयाच्या सतराव्या वर्षी 'वेडी माणसं' या एकांकिकेपासून या माणसाने लेखनाला प्रारंभ केला आणि आज अडुसष्टाव्या वर्षी 'दादाची गर्लफ्रेंड' भेटेपर्यंत अर्धा शतकभर त्यांचे लेखन अव्याहत आणि अथकपणे चालूच आहे. 'अखंड ते लिहीत राहणे' हेच त्यांचे जणू व्रत आहे.

त्यांना एकांकिकाकार म्हणावे तर ते नाटककारही आहेत. त्यांना व्यावसायिक नाटककार म्हणावे तर त्यांनी प्रायोगिक नाटकेही लिहिली-केली आहेत. बालनाट्यांचे तर सुधा करमरकरांबरोबर तेच प्रवर्तक आहेत. बालनाट्यांचे ते लेखक तर आहेतच पण दिग्दर्शकही आहेत. मोठ्यांची नाटकेही त्यांनी दिग्दर्शित केली आहेत. आकाशवाणीवर श्रुतिकांनी तर त्यांचा लेखनप्रारंभ झाला. कथा तर त्यांनी लिहिल्या आहेतच, पण गूढकथांचे मराठी साहित्यात नवे दालन प्रथम उघडणारे तेच अद्‌भुत सम्राट आहेत त्यांच्या कादंबऱ्याही आहेतच. वृत्तपत्रात स्तंभलेखन तर त्यांनी सतत दोन वर्षे केले आहे आणि राजकीय विषयावरही कित्येक लेख लिहिले आहेत. शिवाय बालकथा, परिकथा, ललितलेख आहेतच. नाटकवाले एखाद्या नाटकाचे एका वर्षात किती प्रयोग झाले याच्या संख्येवर त्याच्या यशाचे गणित ठरवतात. हा मोठा नाटकवाला अर्ध्या शतकात एकोणनव्वद प्रकाशित पुस्तकांची आणि चाळीस अप्रकाशित पुस्तकांची संख्या पेनठोकपणे सांगू शकतो. इतके विपुल, इतके विविध, इतके बहुढंगी आणि बहुरंगी, वेगवेगळ्या आकृतिबंधांचे आणि अनुबंधांचे लेखन करणारा एकमेवाद्वितीय लेखक म्हणून मतकरींचेच नाव घ्यावे लागेल. हे सगळे त्यांना कसे शक्य होते? कसली जादू आहे त्यांच्याकडे? कमालीची शिस्त आणि वक्तशीरपणा हे त्यांचे मुख्य मदतनीस आहेत. कचेरीच्या वेळेप्रमाणे ठरलेल्या वेळेवर ते दररोज सकाळी लेखनाला प्रारंभ करतात आणि मध्यंतरी लंच टाईम घेऊन परत संध्याकाळपर्यंत झरणी चालत राहते. मधेच कुणी भेटायला आले तर कुठूनतरी गुहेतून बाहेर पडल्यासारखे ते हॉलमध्ये येतात आणि अभ्यागताचीच आपण वाट पाहत होतो असा भाव आणून मोकळेपणाने बोलत राहतात. हा गेलेला वेळ मग ओव्हरटाइम करून भरून काढायला ते विसरत नाहीत.

लेखनाचे म्हणजेच कागदावर उतरवण्याचे ठीक आहे. पण त्यासाठी हवे ते सुचणे कधी? आकार देणे केव्हा? विकसित करायचे कधी? आणि अखेरचे निर्णायक रूप? शिवाय स्फूर्ती, प्रतिभा, प्रज्ञा वगैरे वगैरे वगैरे?

निर्मितीची अथक ऊर्जा, उपक्रमशीलता, अवलोकन आणि अंतर्मुखता ही मतकरींच्या लेखनाची साधने आहेत.



रत्नाकर मतकरी

**रत्नाकर मतकरी**

**जन्म :** १७ नोव्हेंबर १९३८

**नाटके**

दुभंग

अश्वमेध

घर तिघांचं हवं

आरण्यक

लोककथा ७८ आणि इतर ४० नाटके

बालनाटके १४

**अनेक एकांकिका**

**कादंबऱ्या**

जौळ

पानगळीचं झाड

ॲडम

**कथासंग्रह**

खेकडा (आणि इतर २५ कथासंग्रह)

**इतर**

ललित लेखांची ८ पुस्तके

अनेक नाटके - एकांकिका - चित्रमालिकांचे दिग्दर्शन

दिवसभर ते लिहितात, तेवढेच वाचतात आणि पाहतात. आणि हे सगळे करीत असताना आस्वादकाबरोबरच त्यांच्यातला एक लेखकही सतत जागा असतो. एखादी घटना, एखादी कल्पना, एखादी व्यक्तिरेखा, एखादा स्वभावविशेष त्यांना भावला, त्यात काही अधिक होण्याची व आहे त्यापेक्षा वेगळे काही निर्माण करण्याची शक्यता त्यांना आढळली तर ती तेवढ्यापुरती राहत नाही. ताबडतोबीने त्याची नोंद केली जाते. ती कशी विकसित करता येईल वा कोणत्या प्रकारची भर त्यात टाकता येईल याचीही टिपणे केली जातात. आणि मग वेळेनुरूप त्याच्या उपयोगातून कथा, एकांकिका, नाटक वा लेख आपापले रूप साकार करीत लहानाचे मोठे होतात. म्हणूनच ते बऱ्याच वेळा म्हणतात, 'या विषयावरचे माझे नाटक दहा वर्षांपूर्वीच माझ्या डोक्यात होते.' किंवा 'ही कल्पना मी पूर्वी माझ्या एका कथेत वापरली होती. विशिष्ट कथेतली वा घटनेतली पात्रे भारतीय पर्यावरणात, संस्कृती आणि स्वभावधर्मात कशी वागतील याचा मी विचार करतो, त्याप्रमाणे मग नवे प्रसंग, नव्या व्यक्तिरेखाही घडवाव्या लागतात आणि मग ती कलाकृती सर्वस्वी नवीन व वेगळीच होते. आधारित वाटली तरी ती खऱ्या अर्थाने स्वतंत्रच.' जीवनाचे सम्यक आकलन आणि अनुभव घेण्याची समर्थता नसेल तर हे शक्य होणारच नाही. मतकरी हे उत्तम क्राफ्ट्समन मानले जातात. त्यांची कारागिरी समजून येत नाही, कारण ती कलात्मकतेचे आवरण घेऊन येते.

त्यांचा कुठल्याही प्रकारचा आविष्कार ही त्यांची ताबडतोबीची प्रतिक्रिया नसते. त्यामागे दीर्घकाळाचे चिंतन आणि अभ्यास असतो. या साऱ्याच प्रक्रियेत स्फूर्ती, प्रतिभा त्यांच्या कागदापेनाला चिकटूनच असतात. त्यासाठी त्यांचे याचकासारखी वाट बघावी लागत नाही. जात्यावर बसल्यावर ओवी सुचावी तसे त्यांना




लिहिणे होते!

हे सगळे शक्य होते कारण लेखन आणि लेखन हांच आपला धर्म आहे हे त्यांनी पुरतेपणी फार पूर्वीपासूनच जाणले आहे. म्हणूनच सगळ्याच समारंभांना ते कधी दिसत नाहीत. केवळ आमंत्रण दिले जाते तिथे ते कधीच फिरकत नाही. जेथे काही शिकता येईल आणि जेथे आपल्याला काही देता येईल अशाच ठिकाणी ते आवर्जून हजेरी लावतात. त्यांच्या लेखी लेखक हा सर्वश्रेष्ठच असायला हवा. म्हणूनच ज्या रंगमंचावर मंत्रीमहोदयांची वा सरकारी धेंडांची गर्दी असते तिथली पायरीदेखील ते चढत नाहीत. बालवाङ्मय परिषदेचे अध्यक्षपद त्यांनी साथीला मंत्रीमहाशय असल्याचे कळल्यावर नाकारले होते. आणि कोकण साहित्य मंडळाच्या अध्यक्षपदावरून सरकारी मिंधेपण स्वीकारणाऱ्या साहित्यिकांवर कोरडे ओढले होते.

आपल्या व्यक्तिरेखांबद्दल लेखकाला अपार सहानुभूती वाटायला हवी तरच त्या वाचकाला भिडतात, अशी त्यांची धारणा आहे. म्हणूनच मला वाटते की त्यांच्या साहित्यकृतीतून खलनायकाला कधी विशेष स्थान नसते. नियती किंवा परिस्थितीच खलनायक होते.

लेखक म्हणून आपण समाजाला जबाबदार आहोत याचे त्यांना पूर्वीपासूनच भान आहे, त्यामुळेच लैंगिकता या विषयावरची त्यांची 'अॅडम' ही वेधक कादंबरी अश्लील होत नाही. (कदाचित त्यामुळेच ती महत्त्वाची असूनही माध्यमांनी गाजवली नाही.) 'शुऽऽ कुठं बोलायचं नाही' हा बेडरूम फार्स काय किंवा पौगंडावस्थेतल्या लैंगिक जाणिवांबद्दल भाष्य करणारे त्यांचे सर्वात महत्त्वाचे नाटक 'खोल खोल पाणी' काय, प्रेक्षक कुटुंबासह अनुभवू शकतात. फार्सकडेसुद्धा ते गंभीरपणे पाहतात, (उडवाउडवी करीत नाहीत) म्हणूनच ते त्यातून मोकळा, स्वच्छ आणि मनमुराद विनोद निर्माण करू शकतात.

'मेलोड्रामा' हा शब्द व्याज अर्थाने वापरला जातो. अतिनाट्य किंवा गडदनाट्य असे त्याला म्हटले जाते. त्याचा संबंध खोटेपणाशी अधिक

जवळचा असतो. पण मेलोड्रामा वास्तवही असू शकतो. तो उत्कट तितकाच उत्कृष्ट आणि खराखुरा असू शकतो हे 'नटसम्राट' या नाटकानंतर पुन्हा सिद्ध केले ते मतकरींच्या 'घर तिघांचं हवं' या शिक्षणतज्ज्ञ ताराबाई मोडक यांच्या जीवनावरील नाटकाने.

प्रेक्षकांना धाय मोकलून रडायला



लावणे, अश्रुपात करायला लावणे हा गुन्हा आहे, अपराध आहे, हे ते पुरेपूर जाणून आहेत, नव्हे ती त्यांची लेखनामागची भूमिकाच आहे. प्रेक्षकांना भावाकुल करणे—भावविवश नव्हे हे लेखकाचे कसब आहे, असे ते मानतात.

'जावई माझा भला' व 'साटंलोटं' या नाटकांच्या बाबतीत त्यांनी पुढची मजल मारली. सासरी जाणाऱ्या मुलीच्या बापाची व्यथा किंवा पती अकाली निधन पावलेल्या पत्नीची व्यथा या गंभीर समस्या असूनही त्या कॉमेडीच्या वळणाने नाटकात मांडल्या आहेत. रडण्यात प्रेक्षकांची शक्ती वाया घालवण्यापेक्षा आशयाची जाणीव निर्माण करण्यात ती कामी यावी, असे या लेखकाला अनुभवाने जाणवले असावे. नाटक केवळ हसण्यारडण्याकरता नसून काहीतरी सांगण्याकरता असावे हेच यामागचे सत्य आहे.

याबाबतच्या प्रश्नाला उत्तर देताना ते म्हणतात : *'नाट्यांतर्गत वातावरण प्रसन्न ठेवण्याकडे, हसत खेळत ठेवण्याकडे माझा हल्ली कल आहे. पण म्हणून गंभीर समस्यांकडे नाटककार दुर्लक्ष करतोय असा समज होणे चूक आहे. गंभीर समस्याही नाटककार खेळकरपणे मांडू शकतो. कधी कधी ती त्यामुळेच अधिक चांगली पचनी पडते. माणसाच्या चांगुलपणावर, आनंदावर, एकमेकांना समजून घेण्यावर अधिकाधिक भर देण्याची आज सर्वाधिक गरज आहे. लोक आज चोहोबाजूंनी गांजलेले, त्रासलेले आहेत. सगळीकडचा स्वार्थ, खोटेपणा, भ्रष्टाचार आणि दहशत यांच्या अनुभवांनी त्यांचा चांगुलपणावरचा विश्वास उडत चालला आहे. अशा परिस्थितीत प्रेक्षकांना न फसवता, न भुलवता पण तरीही आयुष्यातल्या चांगल्या बाजूंची जाण त्यांना करून देणे हे समाजजीवनाच्या दृष्टीने आरोग्यदायीच आहे. काळी बाजू प्रकट करणारे किंवा शोकात्म साहित्य तेवढंच दर्जेदार आणि प्रसन्न वाङ्मय म्हणजे 'प्रेक्षकशरण वा वाचकशरण लोकप्रिय वाङ्मय' ही समजूत अज्ञानमूलक आहे. तुम्ही वास्तवाकडे कुठल्या दृष्टीने पाहता आणि त्याचा आविष्कार किती कौशल्याने करता यावरच कलाकृतीचा दर्जा ठरवला गेला पाहिजे.'*

निर्मितीच्या प्रवासात ते साधेपणाकडे वाटचाल करताना दिसतात. काटकसर हे त्यांचे शैलीतील ब्रीद असते. 'लोककथा ७८' काय किंवा 'आरण्यक' काय, त्यात साधेपणातून आशय पोचवण्याकडेच कल दिसतो. अगदी अलीकडे मात्र म्हणजे 'जादू तेरी नजर' किंवा 'दादाची गर्लफ्रेंड' या नाटकापासून साधेपणाची जागा चमकदारपणाने आणि काटकसरीची जागा संख्याबळाने घेतलेली दिसते. आजच्या सांस्कृतिक वातावरणातच भपका आणि गर्दीचे महत्त्व एवढे वाढले आहे की त्यांना साधेपणाने सामना देणे अशक्य आहे. याच कारणास्तव बहुधा मतकरींनी आपला दृश्यपोतातला दृष्टिकोन बदलला असेल. अंतर्यामी मात्र त्यांची भाषा,

शैली पूर्वीसारखी साधी, सर्वांना समजेल अशीच आहे आणि त्यांचा Moral Stand ही तोच आहे.

बालरंगभूमीच्या क्षेत्रातले मतकरींचे योगदान मोठे आणि महत्त्वाचे आहे. स्वत: लिहिलेली बालनाट्ये त्यांनी दिग्दर्शितही केली आहेत. प्रौढ वाचकांसाठी उत्तम साहित्य निर्माण करू शकणाराच उत्तम बालवाङ्मय निर्माण करू शकतो, ही त्यांच्या विधानातील सत्यता साने गुरुजी, पु. ल. देशपांडे, विजय तेंडुलकर, सई परांजपे यांच्या बालवाङ्मयातून पटण्याजोगी आहे.

वाचक लेखकाच्या भाषेच्या शैलीच्या प्रेमात पडतात. मतकरींच्या बाबतीत तसे होत नाही. नाव नसेल तर मतकरींचे लेखन चटकन ओळखता येत नाही. कारण त्यांनी आपल्या शैलीच्या मांडणीचा साचा होऊ दिला नाही. आशयच त्यांना शैली सुचवतो. 'लोककथा ७८' पूर्वी ग्रामीण भाषेत मतकरींनी काहीच लिहिले नव्हते. पण त्या आशयाची ती भाषा ही मागणीच होती. महाभारताचा पुराणकाळ लक्षात यावा म्हणून काव्यमय भाषा अपरिहार्य होती. आशयानुरूप शैलीबदल होत असल्यामुळे एखाद्या साहित्यप्रकारावर 'मतकरी' हा शिक्का मारता येत नाही. संवादावरून, रचनेवरून, व्यक्तिरेखांच्या स्वभावविशेषांवरूनही




कानेटकरी नाटक ओळखता येते तसे मतकरी नाटकांचे होत नाही. म्हणूनच बहुविधा शैलीचा साहित्यिक असेच त्यांच्याबाबतीत म्हणावे लागते. त्यांच्या विपुल लेखनाबद्दल मी प्रश्न विचारला. खरं तर त्या प्रश्नाचा रोख त्यांच्यावर नव्हताच मुळी. विपुल लेखन करणारे जे अन्य लेखक आहेत त्यांच्याबद्दलच तो होता.

**प्रश्न :** खूप लिहिल्याने कलाकृतींचा कस कमी होण्याचा धोका असतो. मोजकेच लेखन अधिक प्रतिष्ठामान्य होते, गुणवत्तादर्शक मानले जाते. खरं का?

**उत्तर :** *केवळ संख्या वाढवण्याकरताच लिहिलं जातं तेव्हा गुणवत्ता घसरते, पण अंतर्यामीची ओढ असेल तर संख्या आणि गुणवत्ता यांचा संघर्ष होत नाही. पाथेर पांचाली नंतरही अनेक चित्रपट निर्माण करून सत्यजीत रायनी आपली गुणवत्ता टिकवलीच ना? कमी तेच चांगलं म्हणणाऱ्यांत धाडस नसतं.*

*शतकानुशतके पिडल्या गेलेल्या बहुजनसमाजाला स्वातंत्र्योत्तर तीस-पस्तीस वर्षांत एकदम ऊर्जितावस्था येईल आणि त्याचा भीषण सामाजिक छळ संपूर्ण थांबेल यावर नाहीतरी कुणाही सुज्ञ माणसाचा विश्वास बसला नसताच; पण घटनेच्या नावाने वारंवार दिल्या गेलेल्या पोकळ आश्वासनांनी जणू काही हे सिद्धच केले की भाषणांतून आणि कागदोपत्री, मंत्र्यांपासून संत्र्यांपर्यंत कुणी कितीही बकवा केला तरी बहुजनसमाज जिथे आहे तिथेच राहणार आहे; किंबहुना अधिकच गर्तेत जाणार आहे. स्वातंत्र्योत्तर काळात शासनाने केलेल्या अनेकविध सुधारणांचा प्रत्यक्षात अणूभरही फायदा या नाडलेल्या समाजाला होत आहे का? अत्याचार, बलात्कार, जाळपोळ आणि हिंसक बळजबरी यांविरूद्ध हा पीडित, शोषित समाज एकदिलाने उभा ठाकेल असा आशेचा किरणही आजच्या सत्यपरिस्थितीत दिसत नाही – मग या समाजाला या गर्तेतून वर आणणारा कोण? एखादा 'प्रेषित' की तुमच्या आमच्यासारखे अन्यायाच्या दर्शनाने पेटून उठणारे सामान्यजन? पण आपण तरी खरोखरच पेटून उठतो का? रत्नाकर मतकरींनी हाच प्रश्न आपणा सर्वांना विचारला आहे – आजच्या भीषण सामाजिक परिस्थितीचे तितकेच प्रत्ययकारी दर्शन घडविणाऱ्या या नाटकात–लोककथा' ७८ मध्ये!*

*या नाटकातील रौद्रभीषण वास्तव आणि त्याचा मन हादरून टाकणारा प्रत्यय म्हणते एक अविस्मरणीय 'अनुभव' आहे.*




*एकदा मिळालेलं नाव पुढं जाईल अशी त्यांना भीती वाटते. 'क्रिएटिव्ह अर्ज' महत्त्वाची. तिच्यासाठी काय होईल, कसं होईल, याचं रिस्क घेण्याची तयारी हवी. रायबाबूंचे सारेच चित्रपट यशस्वी झाले नाहीत; पण प्रत्येक वेळी नवं करून पाहण्याचं त्यांचं धाडस होतं. श्रेय दिलं पाहिजे ते त्या धाडसाला. मोठा कलावंत एखाद्या कलाकृतीनं गप्प बसू शकत नाही. चार्ली चॅप्लिनने किती चित्रपट निर्माण केले? हरि नारायण आपटे, चिं. वि. जोशी, श्री. ना. पेंडसे अशा अनेकांनी उदंड वाङ्मय निर्मिती केली. संख्येमुळे तिचा कस कमी झाला असं म्हणता येईल का? स्वत:ची पुनरावृत्ती होऊ नये म्हणूनच लोककथा ७८ नंतर लगेच त्याच प्रकारातलं प्रायोगिक नाटक न लिहिता मी व्यावसायिक नाटकाकडे वळलो.*

मतकरी लेखनात आकंठ बुडालेले असले तरी त्यातूनही ते वेळ काढतात आणि आजूबाजूच्या नाट्यगृहांत होणारे सर्व मराठी नाटकांचे प्रयोग आवर्जून पाहतात. व्यावसायिक तसे प्रायोगिकही. माहीमच्या आविष्कारच्या नाटकांना तसेच पृथ्वी थिएटरमधील नाटकांनाही ते हजेरी लावतात. इतरांचेही नाट्यप्रयोग न चुकता पाहणारा मी पाहिलेला हा एकमेव व्यावसायिक नाटककार. केवळ नाटक पाहून ते थांबत नाहीत. कलावंतांना, दिग्दर्शकाला, निर्मात्याला सूचना करतात. त्यांचे कौतुकही करतात.




नवोदितांना संहितेबाबतच्या सूचना व लेखनात मार्गदर्शनही करतात. आवडलेल्या नाटकावर वृत्तपत्रातून लेखही लिहितात. बांधिलकी असल्याशिवाय, नाट्यआच असल्याशिवाय या गोष्टी घडत नाहीत.

नाटक घरोघर पोचावे, प्रेक्षक नाटकापर्यंत येत नसतील तर नाटकांनी प्रेक्षकापर्यंत जावे हा हेतू मनात धरून त्यांनी उपनगरातील काही रंगकर्मींना प्रवृत्त केले होते. उपनगरातील वेगवेगळ्या कॉलनीतल्या खुल्या जागा, छोटे हॉल्स पाहून त्या त्या विभागात मर्यादित प्रेक्षकांसमोर नाटक कसे करता येईल याची एक योजनाही त्यांनी तयार केली होती. मुलुंड, गोरेगाव येथे जाऊन जागाही पाहिल्या होत्या. वृत्तपत्रातून ही संकल्पना तपशिलवार मांडली होती. स्वत: 'त्रिपुटी' नावाचे नाटकही या योजनेसाठी लिहिले होते. उपनगरात काही ठिकाणी ही छोटी नाट्यकेंद्रे सुरूही झाली.

झोपडपट्टीतली मुले, तळागाळातली मुले, पांढरपेशा वस्तीतील मुले नाट्यगृहापर्यंत येत नाहीत. त्यांना ते परवडतही नाही. अशी मुले सांस्कृतिक संस्कारांपासून, रंजनापासून दूर राहू नयेत म्हणून त्यांनी आपल्या बालनाट्यांचे प्रयोग झोपडपट्ट्यांतून केले. बालसुधार केंद्रातून, रिमांड होममधून केले. ट्रकवर रंगमंचाची उभारणी करून फिरत्या नाटकाद्वारे तळागाळातल्या मुलांची नाटकभूक



भागवली. हे सर्व साध्य होण्यासाठी त्यांनी आपल्या साऱ्या कुटुंबालाच कामी लावले. प्रतिभा मतकरी (पत्नी), गणेश मतकरी, पल्लवी मतकरी (मुलगा आणि मुलगी) सुप्रिया, विनोद (मुलगी आणि जावई) या सगळ्यांना या नाट्यकार्यात सामील करून घेतले. एवढ्यावरच मतकरी थांबले नाहीत.

'पिनॅकिओ' ही जी विश्वविख्यात अभिजात बालकथा आहे त्याचे मराठी नाटक—'बुटबैंगण'—पथनाट्य पद्धतीने लिहिले आणि वस्त्यावस्त्यांतून सादर केले. 'टी बॉक्स थिएटर', ('चाय-खोका रंगमंच') नावाची संस्था स्थापन करून एक खोका आणि त्याच्यात मावतील एवढ्याच वेशभूषेची गरज लागेल अशी नाटके तयार करून ती कुठेही जागा मिळेल तिथे केली. बालप्रेक्षकांना मनमुराद हसवण्याबरोबर त्यांच्यात काही जाणिवाही निर्माण केल्या. बालमजुरी, मुलांची तल्लख बुद्धिमत्ता, शिक्षकांची भीती असे विषय या बालनाट्यांतून विनोदी पद्धतीने मांडले गेले.



नाटक लिहिणे हेच नाटककाराचे काम. तीच त्याची बांधिलकी. पण ते करूनही संहितेबाहेर नाटकासाठी एवढे काही करणारा दुसरा कुणी नाटककार आहे?

लाचलुचपत, भ्रष्टाचार, बेहिशेबी मालमत्ता, पैसा खाणे असे राक्षस समाजात थैमान घालीत असताना त्यांच्या विरोधात एकही व्यावसायिक अथवा प्रायोगिक नाटककार आपल्या नाटकाच्या माध्यमातून उभा राहिला नाही. आपली निर्मिती कलाकृतीच्या पातळीवर पोचणार नाही या भयाने नाटककारांनी या वस्तुस्थितीकडे दुर्लक्ष केले. पण सर्व प्रकारचे धोके पत्करून या अनिष्ट प्रवृत्तीविरुद्ध 'बकासुर' आणि 'मेजवानीचा फार्स' या नाटकांच्याद्वारे उभे राहणारे एकमेव नाटककार म्हणणे रत्नाकर मतकरी. 'बकासुर' नाटकाची निर्मिती तर त्यांनी गोव्यात जाऊन तेथील तरुण रंगकर्मींना घेऊन गोवा कला अकादमीसाठी केली.

अशा नाटकांतून येणारा थेटपणा कलेच्या आड येतो हे तर खरेच. त्या बाबतीत ते म्हणतात, *'संदर्भ फार उघड आणि म्हणून कलाहीन होऊ न देणं, तो केवळ तत्कालीन राहू न देणं, शिवाय नाटक म्हणूनही ते इंटरेस्टिंग*

*वाटणं हे सगळं आवश्यक असतं. म्हणून तर इतक्या वर्षांत या प्रकारची फक्त तीनच नाटकं मी लिहू शकलो. नर्मदा आंदोलनावर नाटक लिहिणं ही आंदोलनाची गरज होती. पण काय करणार? माझ्या डोळ्यासमोर ते आलंच नाही.'*

'एड्स'सारख्या जगाला भेडसावणाऱ्या प्रश्नावर 'तनमन' नावाचे नाटक त्यांनी लिहिले. पण ते प्रचारकी किंवा बोधामृती झाले नाही. या नाटकाने समाजापुढे बदलत्या परिस्थितीतले नैतिक प्रश्न उभे केले. संसार समाधानाचा असतानाही चैन म्हणून पुरुषांनी इतर बायकांकडे जाणे हे समाजाने व स्त्रियांनी का स्वीकारले, या नाटकातील मानसीने विचारलेल्या प्रश्नाला नैतिक तडजोडी करणाऱ्या समाजाकडे उत्तर नाही. नायिकेची नैतिकता आत्मकेंद्री नाही. ती विश्वासघातकी नवऱ्यापासून दूर जाते, पण एड्स पेशंट म्हणून त्याला वाऱ्यावर सोडत नाही. तिची खंत एवढीच आहे की शारीरिक पातळीवर अपरिहार्य म्हणून जी चूक माणूस स्वीकारतो ती त्याला नैतिक पातळीवर स्वीकारता येऊ नये हा त्याचा हिणकसपणा आहे. कालच्या सुधाकराच्या आजच्या सिंधूत झालेला हा बदल तिचे आधुनिक रूप प्रकट करतोच पण पातिव्रत्याच्या कल्पनेला वेगळे परिमाण देतो.

शिक्षणक्षेत्रातील तत्त्वनिष्ठ नामवंत कार्यकर्त्या ताराबाई मोडक यांचे चित्र 'घर तिघांचं हवं'मध्ये उभे करताना शैक्षणिक सुधारणा करण्याच्या वेडाने झपाटलेल्या स्त्रीला कुठल्या आंतरिक आणि सामाजिक विरोधाशी सामना करावा लागतो याचे भेदक तितकेच दारुण चित्र त्यांनी उभे केले. ऐतिहासिक घटनेतल्या माणसांचाच त्यांनी शोध घेतला.




गूढ कथेतले भय त्यांनी भीती निर्माण करण्यासाठी नव्हे तर वाचकाला जागृत करण्यासाठी वापरले. त्यातही माणसाचा शोध आहेच. नर्मदा आंदोलनासाठी नाटक लिहिता येत नाही म्हणून स्वस्थ बसणे त्यांना शक्यच नव्हते. ते उत्तम चित्रकार आहेत. आपल्या अनेक पुस्तकांची मुखपृष्ठे त्यांनीच चितारली आहेत. नर्मदा आंदोलनावरची चित्रे त्यांनी काढली. अमेरिकेतील प्रदर्शनात ती विकली गेली. तो निधी नर्मदा आंदोलनाला मिळाला.

प्रत्येक डाव्या चळवळीला त्यांनी कोणत्या ना कोणत्या प्रकार हातभार लावलाच आहे. 'निर्भय बनो'च्या आंदोलनातही ते अग्रभागी असतात. 'एड्स' विषयावर फक्त नाटक लिहून ते थांबले नाहीत. सिद्धहस्त लेखकांना या विषयावर कथा लिहिण्यासाठी त्यांनी जागृत केले. त्यांच्या कथांचा संग्रह 'पॉझिटिव्ह' या नावाने प्रसिद्ध केला. स्वत:बरोबर इतर लेखकांनाही घेऊन एड्सबद्दल जागृती केली. त्यांच्या मते, आज नाटक रंगभूमीपेक्षाही अशा चळवळींना साहाय्यभूत ठरणे अधिक आवश्यक झालेय. कलेच्या सॉफिस्टिकेशनच्या आहारी जाऊन प्रेक्षकांपर्यंत विचार पोचत नसतील, तर सूचकतेचा, कलात्मकतेचा काहीही उपयोग नाही. सामाजिक आशयाचे चांगले कला चित्रपटही अयशस्वी झाले त्याच्या अनेक कारणांपैकी एक कारण हे अतिसॉफिस्टिकेशन आहे. अखेरीस किंकाळी ही किंकाळीसारखी ऐकू आली तरच ती ऐकणारा मागे वळून पाहणार! आज राजकारण इतक्या खालच्या पातळीवर गेले की त्याचा फक्त तिसऱ्या दर्जाचा ॲक्शन ड्रामाच

*प्रायोगिक रंगभूमी म्हणजे जगभरच्या प्रयोगांचं, इतर संस्कृतीत झालेल्या प्रयोगांचं डेमॉन्स्ट्रेशन किंवा डुप्लिकेशन नव्हे. त्यातून मूठभर नवे नाट्यप्रयोग जन्माला येतील, इतकंच. आपली प्रायोगिक रंगभूमी निर्माण होणार नाही. फक्त नकला निर्माण होतील. ब्रेश्तचं नुसतं अनुकरण करून काय साधणार? शेवटी आपल्या समस्या आपण आपल्या पद्धतीने मांडल्या पाहिजेत. नवे प्रयोग त्यातूनच घडले पाहिजेत. तशा त्या मांडता येतील. अस्सल प्रायोगिक रंगभूमी त्यांतूनच उभी राहील, राहायला हवी.*

*– 'रत्नाक्षरं'मधील मुलाखत*

*उदारीकरण आणि मुक्त अर्थव्यवस्था उचलून धरल्यापासून शासनाने सर्वच क्षेत्रांत हळूहळू काखा वर करायला सुरुवात केली. काही जनहिताची क्षेत्रे नफेबाजांकडे न सोपवता सर्वसामान्यांचा, विशेषतः गरिबांचा, विचार करून नियंत्रणाखाली ठेवावी लागतात. नाहीतर पाणीदेखील विकत घेण्याची पाळी येईल. (आज काही ठिकाणी ती आलीच आहे.) उद्या श्वासोच्छ्वासासाठी शुद्ध हवादेखील विकत घ्यावी लागेल. चांगले शिक्षण देणे ही सरकारचीच जबाबदारी आहे. अशा अर्थाने की शिक्षणावरच त्या त्या देशाची प्रगती अवलंबून असते. मग हलके शिक्षण हवे तर महानगरपालिकेच्या शाळेत जा; चांगले शिक्षण हवे तर खाजगी शाळांमध्ये जा, हे कशासाठी? कसलीच जबाबदारी घ्यायची नसेल तर दिवसेंदिवस मंत्रिमंडळाचा आकार का फुगतो? पैसे हडप करण्यापासून कोणीही मंत्री वंचित राहायला नको म्हणून?*

*उदारीकरण आणि जागतिकीकरण यांपासून होणारे फायदे काय, हे आपल्याला अर्थशास्त्रज्ञ वेळोवेळी सांगतच असतात. दिसताना चित्र मात्र हे दिसते की जगभर अमेरिका आपल्या फायद्याचे कायदे करून घेण्यात निर्लज्जपणे गुंतलेली आहे आणि आपण हे दास्य मनोभावे स्वीकारीत आहोत. कारण आपली गुलामी प्रवृत्ती जे इंग्रजी ('अमेरिकन' असे वाचावे) ते चांगले, या कल्पनेचा आपल्या मानेवरील जबरदस्त पगडा, आणि देशी संस्कृतीची मुळीच होऊ न दिलेले वाढ. आमची वृत्तपत्रे, आमच्या चित्रवाहिन्या, आमच्या शाळा, आमच्या फॅशन्स या झपाट्याने अमेरिकेच्या पगड्याखाली येत आहेत, आणि त्याचे कुणालाही सुखदुःख नाही, म्हणजे दुःख नाहीच उलट सुख आहे. कॉम्प्युटर्स आले, माणसांची गरज कमी झाली. 'सुवर्ण हस्तांदोलन' किंवा 'व्ही.आर.एस.' देऊन माणसांना घरी बसवण्यात आले. काहींना नोकरीवरून काढूनच टाकण्यात आले.*

***रत्नाकर मतकरी : अनुभव, डिसेंबर २००३***

होऊ शकतो. त्याच्या चित्रणात कलावंताने सूचकता आणायची कुठून? माणूस, मग तो दलित असो व सवर्ण, जो गरीब आहे तोच दडपला जातोय. वरचा माणूस राजकारण्यांबरोबर साटेलोटे करून खुनातूनदेखील सुटू शकतो हे आज पोराटोरांनाही कळतेय. त्यात लेखक कसली जागृती करणार? म्हणून लेखकांनी बाहेरच्या मोहिमांमधून भाग घ्यायला हवा. आज असे दिसते की, साहित्यिकांना स्वत:च्या कामाविषयीचा जो सन्मानयुक्त प्रतिसाद मिळतो तो पुरेसा होत नाही. त्यांना वेगवेगळ्या समित्यांवर असावे लागते. इतर मानसन्मान हवे असतात. मग त्यासाठी लांगूलचालन, लाचारी अपरिहार्य होते. सरळ मार्गाने आवश्यक त्या सुखसोयी मिळत असताना भ्रष्टाचाराने अधिक सुखसोयी मिळवण्याचा प्रयत्न कशासाठी? राजकारण्यांपासून फायदा करून घेण्याची वृत्ती का? त्यांना त्यांचे राजकारण करू द्या. तुम्ही तुमचे लेखन करा. चांगल्या कलाकृती पहा. उत्तम साहित्य वाचा. स्वत:च्याच आनंदात रहा!

साहित्यातून सत्यम्, शिवम्, सुंदरम्चा आपण आग्रह धरतो, मग भ्रष्टाचाराला कडाडून विरोध करणे हे साहित्यिकांचे कर्तव्य ठरत नाही का? हा विरोध प्रत्यक्ष कृतीतून करणे जमत नसेल तर निदान भ्रष्टाचाराशी हातमिळवणी तरी करू नका. स्वत: लबाडीने वागणारा साहित्यिक वाचकाला आदर्श कसला घालून देणार? दुर्दैवाने राजकारण्यांना थेट विरोध करणारे साहित्यिक इतके अल्पसंख्य आहेत की त्यांची गणना मूर्खातच केली जाते.

मतकरींची साहित्यविषयक भूमिका त्यांच्या वरील विधानांवरून स्पष्ट होते.

देवासमोरच्या पेटीत पैसे टाकणाऱ्याला गाडगेबाबा विचारतात, देवाला पैसे देणारा तू कोण? देव तुला देणार का देवाला तू देणार?

या लेखाचे दातृत्व त्यामुळेच मला घेता येणार नाही. आजूबाजूच्या समाजातून आणि परिस्थितीतून बीजरूपाने घेऊन मतकरींनी आजतागायत भरभरून आणि दामदुपटीने समाजाला दिले आहे. मतकरी गर्भश्रीमंत आहेत, लेखनश्रीमंत आहेत!

## संदर्भसमृद्ध सांस्कृतिक समीक्षा

# वसंत आबाजी डहाके

रोहिणी तुकदेव

विशिष्ट भाषिक समूहाचा इतिहास, त्याची संस्कृती आणि त्याचे वाङ्मय-साहित्य यांतील परस्परसंबंध शोधणे, त्यांचे परस्परांवरील प्रभाव आणि अवलंबित्व यांचे निरीक्षण करून तात्त्विक स्वरूपाची मांडणी करणे हे दीर्घोद्योगाचे, सूक्ष्म विचारदृष्टीचे आणि एकापेक्षा अधिक ज्ञानशाखांत गती असल्याचे फलित असते. मराठीत अशा प्रकारचे फार थोडे पण महत्त्वाचे प्रयत्न झालेले आढळतात. श्री. व्यं. केतकरांचे 'प्राचीन महाराष्ट्र शातवाहनपर्व'चे दोन खंड किंवा 'महाराष्ट्रीयांचे काव्यपरीक्षण' हे ग्रंथ, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा 'वैदिक संस्कृतीचा विकास' हा ग्रंथ किंवा एका विशिष्ट विचारप्रणालीच्या भिंगातून सामाजिक-सांस्कृतिक परिप्रेक्ष्यात मध्ययुगीन साहित्याचे सामर्थ्य उलगडून दाखविणारा गं. बा. सरदारांचा 'संत वाङ्मयाची सामाजिक फलश्रुती' हा ग्रंथ अशी काही नावे चटकन डोळ्यांसमोर येतात. एखाद्या कालखंडातील सामाजिक-सांस्कृतिक जीवनपट उभा करणारे असे काही महत्त्वपूर्ण ग्रंथ आहेत किंवा विशिष्ट कालपटातील वाङ्मयाचे विवेचन करणारे उत्तमोत्तम ग्रंथही आहेत. परंतु, या दोन्हींचा परस्परसंबंध उलगडणारे ग्रंथ मात्र मोजकेच आहेत. या प्रकारच्या ग्रंथपरंपरेत नव्याने समाविष्ट झालेला ग्रंथ ही वसंत आबाजी डहाके यांच्या 'मराठी साहित्य : इतिहास आणि संस्कृती' या ग्रंथाची मूळ किंवा मुख्य ओळख होय.

कवी, कादंबरीकार तसेच समीक्षक म्हणून डहाके महाराष्ट्राला परिचित आहेत. 'योगभ्रष्ट', 'शुभवर्तमान', 'शुनःशेप', 'टेररिस्ट ऑफ द स्पिरिट' (अनुवाद : रणजित होस्कोटे आणि मंगेश कुलकर्णी), 'चित्रलिपी' हे त्यांचे कवितासंग्रह आहेत. 'अधोलोक', 'प्रतिबद्ध आणि मर्त्य' या त्यांच्या कादंबऱ्या आहेत आणि 'कवितेविषयी' हा समीक्षाग्रंथ आहे.

ग्रंथलेखनामागील भूमिका सांगताना डहाके लिहितात, 'मला मराठी साहित्याचा इतिहास लिहायचा नव्हता. फार मोठ्या, व्यापक अशा कालखंडातील लेखनाची राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक पार्श्वभूमी चित्रित करायची होती. लिहिणाऱ्यांनी कोणत्या काळात, कोणत्या परिस्थितीत लेखन केले हे पाहायचे होते. त्या त्या लेखकांच्या काळात जगण्याचे आणि लिहिण्याचे कोणते बंध उपलब्ध होते, कोणते नवे निर्माण झाले, आपला काळ, आपले अस्तित्व आणि आपली स्थितिगती यांचा त्यांनी कसकसा आविष्कार केला हे शोधायचे होते.' (ऋणनिर्देश-८) अशा प्रकारचा उद्देश असल्यामुळे ग्रंथाचे स्वरूप मराठी वाङ्मयेतिहासापेक्षा निश्चितपणे वेगळे आणि वैशिष्ट्यपूर्ण झाले आहे.

'महाराष्ट्र : इतिहास, संस्कृती, साहित्य', 'युगांतर', 'ब्रिटिश वसाहतकाल आणि मराठी साहित्य' आणि 'इतिहास, संस्कृती, साहित्य' अशा चार प्रकरणांनी मिळून ग्रंथ सिद्ध झाला आहे. ग्रंथलेखनासाठी मांडणीच्या आणि मजकुराच्या साधारतेविषयी, अधिकृततेविषयी लेखकाने घेतलेल्या परिश्रमांची साक्ष पानोपानी पटते. अनेक व्यासंगी विद्वानांच्या ग्रंथांतील उतारे, अनेक जुन्या, नव्या साहित्यकृतीतील मजकूर, शिलालेख, ताम्रलेख यांवरील मजकूर, चरित्र-आत्मचरित्रांतील आधार अशा विविध प्रकारच्या सामग्रीचा लेखकाने यथायोग्य वापर केला आहे. ग्रंथाच्या अखेरीस दिलेली संदर्भसूची नजरेखालून घातली तरी मांडणीच्या संदर्भसंपृक्ततेची ग्वाही पटते; तर विषयसूची पाहिल्यावर विस्तृत आवाका ध्यानात येतो. मुळात डहाके कवी, कादंबरीकार आणि साहित्य समीक्षेत सांस्कृतिक समीक्षेला महत्त्वाचे स्थान आहे असे मानणारे



वसंत आबाजी डहाके

**वसंत आबाजी डहाके**

**जन्म :** ३० मार्च १९४२

**कविता**

योगभ्रष्ट, १९७२
शुभवर्तमान, १९८७
शुनःशेप, १९९६
चित्रलिपी, २००६

**कादंबरी**

अधोलोक, १९७५
प्रतिबद्ध आणि मर्त्य, १९८१

**समीक्षा**

मराठी साहित्य : इतिहास आणि संस्कृती, २००५

समीक्षक. आणि त्याला संक्षिप्त मराठी वाङ्मयकोशाच्या दोन्ही खंडांच्या प्रस्तावना लिहिण्याच्या निमित्ताने तसेच विविध चर्चासत्रांमध्ये वाचण्यासाठी तयार केलेल्या निबंधांच्या निमित्ताने केलेल्या सखोल अभ्यासाची मिळालेली जोड, यातून हा ग्रंथ तयार झाला आहे.

'इतिहास, संस्कृती व साहित्य' हे ग्रंथातील चौथे पण प्रतिपाद्याच्या दृष्टीने पहिले मानावे असे प्रकरण आहे. त्यात लेखकाने स्वीकारलेल्या तात्त्विक भूमिकेचे विस्तारपूर्वक केलेले विवेचन आहे. इतिहास आणि संस्कृती असलेल्या लोकसमूहाची महत्त्वपूर्ण अभिव्यक्ती म्हणजे साहित्यकृती. साहित्यकृतीची संहिता ही सांस्कृतिक अवकाशात घडणारी कृती असते. साहित्याची संहिता स्वत: परिपूर्ण, स्वायत्त नसते. ती एक सांस्कृतिक घटना असते. तिच्यातून संस्कृती व्यक्त होते, ती इतिहासाचा भाग असते आणि इतिहास व्यक्तही करते; असे विचारसूत्र निष्कर्षित करणारे भिन्न भिन्न विचारव्यूह या प्रकरणात विशद केले आहेत. इतिहास, धर्म, संस्कृती या संज्ञांची व्यापकता डहाके स्पष्ट करतात आणि या गोष्टी प्रत्यक्ष जीवनव्यवहारात कसे रूप धारण करतात याचेही ते विवेचन करतात. उदाहरणार्थ, 'इतिहास' या संज्ञेचे स्वरूप उलगडून सांगताना ते वि. का. राजवाडे यांच्या मांडणीचा आधार तर घेतातच पण त्याचबरोबर 'एका किंवा अनेक व्यक्तींच्या, एखादी विचारसरणी मानणाऱ्या गटाच्या, एखाद्या समूहाच्या किंवा एखाद्या देशाच्या लाभासाठी इतिहासाचे विकृतीकरण केले जाते किंवा आपली सगळी ओळखच विसरली जावी अशा प्रकारचे इतिहासलेखन केले जाते' हे वास्तव पुढे आणतात. 'इतिहास आमच्या बाजूला आहे' या विलास सारंगांच्या कथेत आढळणारे अर्थनिर्णयात्मक इतिहासाविषयीचे भाष्य तळटिपेत देऊन इतिहासाच्या अर्थनिर्णयातील सापेक्षतेवर आणि गुंतागुंतीवर नेमके बोट ठेवतात. मूळ विवेचनातील गंभीर सूर आणि सारंगांच्या लेखनातील उपहासपूर्ण टिंगल यांच्या मिश्रणाने वाचकाला बौद्धिक गुंगीतून सावध करणारी टपली मिळते. नेमकी उदाहरणे निवडून एका विशिष्ट दिशेने विवेचनाचा ओघ ठेवला की वाचक त्यात गुंतून पडण्याची, वाहावला जाण्याची शक्यता असते. अशा वेळी त्या विषयाची दुसरी अथवा वेगळी बाजू त्याच्या लक्षात येत नाही. अशी बौद्धिक डुलकी येऊ नये याची काळजी डहाके यांनी अनेक ठिकाणी घेतलेली दिसते. एखाद्या संदर्भातील अनेक विद्वानांच्या मत-मतांतराचा गलबला पुढे ठेवूनही लेखकाने हे साधले आहे.

इतिहास आणि साहित्य यांचा निकट संबंध आहे. इतिहासाने साहित्याला विषय पुरविले आहेत, आशयसूत्रे दिली आहेत आणि समाजाचा इतिहास घडविण्यामध्ये साहित्याने काही एक वाटा उचलला आहे. साहित्यात इतिहास असतो त्याचप्रमाणे साहित्याचाही इतिहास असतो. हे परस्परसंबंधांचे रूप डहाके स्पष्ट करतात आणि इतिहासाचा कादंबरीलेखनासाठी कसा उपयोग करून घेतला जातो ते दाखवून देतात. ललित साहित्यकृतीत ऐतिहासिक कालावकाशाची रचना कशी केली जाते




ते सांगताना लेखक गंगाधर गाडगीळ यांच्या 'प्रारंभ' कादंबरीचे व मुकुंदराव पाटील यांच्या 'ढड्ढाशास्त्री परान्ने' या कादंबरीचे उदाहरण देऊन वर्तमानकाळात भूतकाळाची रचना करणे आणि भूतकाळातील पात्रांच्या दृष्टीतून वर्तमानकाळाची रचना करणे या दोन प्रवृत्ती दाखवून देतात. या विवेचनात 'अंताजीची बखर' या नंदा

खरे यांच्या कादंबरीचा उल्लेख यायला हवा होता. भविष्याबद्दल कोणतीच आशा नसलेल्या, दळभद्री वर्तमान असलेल्या समाजाची भावनिक गरज म्हणून कादंबरीत जे इतिहासाचे गौरवीकरण, सुशोभीकरण होते, त्यावर विनोदाचे शस्त्र रोखणारी ही कादंबरी इतिहासाचे, समाजमनाचे आणि ऐतिहासिक कादंबरीचेही एक विदारक रूप दाखविते.

धर्म, संस्कृती यांच्या कक्षा, या संज्ञांचे विस्तारित रूप लेखक काटेकोरपणे दाखवितो. त्यातील तपशिलाबद्दल सर्व वाचक सारख्याच प्रमाणात सहमत होतील असे नाही, परंतु तसा विरोध उत्पन्न झाला तर ती लेखकाची उणीव मानण्याचे कारण नाही. कारण या क्षेत्रात मतभिन्नतेला भरपूर वाव असतो. शिवाय, निर्णायक अथवा अखेरचे असे काही असत नाही. नवी माहिती मिळाली किंवा वेगळीच घटिते पुढे आली किंवा वेगळा दृष्टिकोन स्वीकारून त्याच सामग्रीची पुनर्मांडणी केली तर नवे, वेगळे निष्कर्ष मिळू शकतात. ही या क्षेत्रातील जिवंतपणाची खूण असते. नंतर येणाऱ्या सूर्यकिरणामुळे आधीचा किरण जुनाट किंवा शिळा ठरत नाही किंवा त्या दोहोंत खरे-खोटे असे काही नसते तसेच हे असते. उपलब्ध सामग्रीची तर्कसंगत आणि साधार मांडणी हाच निकष असतो आणि डहाके याबाबतीत काटेकोर राहिलेले आहेत.



या प्रकरणाच्या उत्तरार्धात साहित्याच्या स्वरूपाची चर्चा आहे. साहित्याचे स्वरूप म्हटले की साहित्याच्या अभ्यासकाला पौर्वात्य आणि पाश्चिमात्य विद्वानांनी केलेल्या वेगवेगळ्या व्याख्या आठवतात. ही वाट सोडून डहाके विषय अगदी वेगळ्या वाटेवर नेऊन उभा करतात आणि सांस्कृतिक संरचना आणि साहित्यकृती तसेच सामाजिक संरचना आणि साहित्यकृती यांच्यातील परस्परसंबंधांची जी. ए. कुलकर्णी यांच्या कथांच्या आधारे किंवा विजय तेंडुलकरांच्या नाटकांच्या आधारे चर्चा करतात. एक सामाजिक संस्था या दृष्टीने साहित्याकडे कसे पाहता येते, साहित्यवाचनाच्या किती आणि कोणकोणत्या भूमिका असू शकतात याचे विवेचन करण्याच्या ओघात लेखक 'साहित्यकृती हे सांस्कृतिक रचित असते; एकाहून अनेक जाणिवांनी तिला आकार दिलेला असतो' या तथ्यापर्यंत सहजपणे येऊन पोहोचतो. इथे तळटिपेत दि. के. बेडेकरांच्या ग्रंथातील एक उद्धृत दिले आहे. ते मुळातून वाचण्यासारखे आहे. डहाकेंनी उद्धृते इतक्या नेमकेपणाने आणि समर्पक दिली आहेत की, वाचकाला ते सारे संदर्भ उलगडून पाहण्याचा मोह पडावा, विवेचित विषयाबद्दलची आस्था आणि जिज्ञासा वाढत जावी.

'सांस्कृतिक जडवाद', 'नवऐतिहासिकवाद' हे शब्द अलीकडच्या साहित्यचर्चांमध्ये वारंवार कानावर पडतात. पुष्कळ वेळा ते ढोबळपणे, सरधोपटपणे वापरले जातात किंवा कधी कधी ऐकणाऱ्यांना त्यांचा नीट अर्थ माहीत आहे, असे गृहीत धरून टीकाटिप्पणी केली जाते. अर्थाचा पोकळपणा किंवा अर्थाबद्दलचा संभ्रम यांपैकी काहीही घडले तरी ते एकंदर चर्चेच्या दृष्टीने इष्ट नसतेच. या दोन्ही संकल्पना परकीय भाषेतून, साहित्यविचारांतून आल्यामुळेही असे होत असावे. ही अडचण ओळखूनच की काय, डहाकेंनी या दोन्ही संज्ञा-संकल्पनांची तात्त्विक भूमिका साक्षेपाने

सांगितली आहे. एवंच, साहित्य आणि साहित्य समीक्षा या परिक्षेत्रातील आजघडीला मान्यता पावलेल्या आणि चर्चेत असलेल्या भूमिकांचा आटोपशीर पट उभा करण्यात लेखक यशस्वी झाला आहे. या पटाची मांडणी लेखकाने अशा खुबीने केली आहे, की त्यामुळे कलेच्या—विशेषत: साहित्याच्या—स्वायत्ततेचा विचार मनावेगळा होऊन साहित्याचे समाज-संस्कृतिसापेक्ष स्वरूप लख्ख उभे राहते. पहिल्या तीन प्रकरणात केलेल्या मांडणीचा हा पूर्वरंग आहे. साहित्यकृतीची समीक्षा संस्कृतीच्या परिप्रेक्ष्यात केली पाहिजे. इतिहास आणि संस्कृती असलेल्या लोकसमूहाची अभिव्यक्ती म्हणजे साहित्यकृती हा विचारव्यूह पत्करून लेखक मराठी माणसाच्या इतिहास, संस्कृती आणि साहित्याच्या संदर्भात भाष्य करतो.

'महाराष्ट्र हे भारतीय संघराज्यातील एक प्रमुख राज्य आहे', या विधानाने ग्रंथातील आणि पहिल्या प्रकरणातील विवेचनाचा प्रारंभ होतो. आजच्या महाराष्ट्र राज्याची स्थापना १ मे १९६० रोजी झाली असा वर्तमानकाळातील राजकीय संदर्भ देऊन लेखक 'महाराष्ट्र' हे देशवाचक नाम केव्हा आढळते अशा प्रकारच्या भूतकालीन राजकीय तथ्याच्या आधारांची चर्चा करतो. महाराष्ट्रात वस्ती करणारे लोक मूळचे कुठले होते, कोण होते, वेगवेगळ्या कालखंडांत इथे कोण कोण लोक आले याविषयी संशोधकांनी मांडलेली वेगवेगळी मते त्यांच्या उद्धृतांसह देतो. जुन्या काळातील राजवंश, राजवटी यांची तपशिलाने माहिती देतो. महाराष्ट्रातील राजवंशांसंबंधी, संस्कृतीसंबंधी केलेले हे विवेचन जिज्ञासूंना आवडेल, त्यांची माहितीची तृषा शमवेल असेच आहे. 'प्राचीन महाराष्ट्र - शातवाहन पर्व' या ग्रंथात श्री. व्यं. केतकरांनी जुन्या कथा-कहाण्या (उदा. उर्वशी-पुरुरव्याची कथा किंवा यम-यमी कथा), लोकरूढी, समजुती इत्यादींचा आधार घेऊन त्या काळातील सांस्कृतिक जीवन उभे करण्याचा प्रयत्न केला आहे. या प्रयत्नांमागे साहित्य ही लोकसमूहाची सांस्कृतिक अभिव्यक्ती असते, हेच सूत्र आहे. डहाके अगदी विरुद्ध दिशेने प्रवास सुरू करून साहित्यापर्यंत येऊन पोहोचतात. 'मराठी अस्मिता' या शब्दसमूहात कोणता ऐतिहासिक आणि सांस्कृतिक ऐवज दडलेला आहे याचे भान देणाऱ्या विवेचनानंतर थेट 'मराठी भाषा व साहित्याचा प्रारंभ' या मुक्कामी पोहोचतात. आद्य लोकसाहित्य असे 'गाथा सप्तशती'चे वर्णन करून त्या ग्रंथाचा 'आद्य अभिमानस्थान' असा गौरव करतात व पुढे जाऊन मराठी भाषेची पूर्वपीठिका सांगतात.

मराठीतील पहिला ग्रंथ कोणता? पहिला शिलालेख कोणता? महानुभव पंथ वैदिक की अवैदिक? यांसारख्या वाङ्मयेतिहासकारांना वादग्रस्त वाटणाऱ्या प्रश्नांची मांडणी करीत, उत्तरे शोधत लेखक पुढे सरकतो आणि महत्त्वाचे पंथ, संप्रदाय, परंपरा व महत्त्वाच्या साहित्यकृती यांचे विवेचन करतो. हे विवेचन सरधोपट माहितीच्या पातळीवर राहत नाही, त्यात तपशिलाचा बारकावा येतो आणि सूक्ष्मताही येते. 'श्रीज्ञानदेव आणि श्रीनामदेव एकाच काळात अवतरले आणि त्यांनी आपल्या रचनाकार्याने समकालीन आणि उत्तरकालीन संतांना रचनेची प्रेरणा जशी दिली तशीच रचनेचे विविध प्रकार योजून अभिव्यक्तीची वेगवेगळी क्षितिजेही उघडून दिली' असे म्हणून लेखक प्राचीन रचनाबंधांतील विविधता स्पष्ट करतो. लोकसाहित्यातून संतसाहित्यात आलेले रचनाबंध, संस्कृत-प्राकृत साहित्यातून आलेले रचनाबंध, परक्या भाषिक संस्कृतीच्या प्रभावातून आलेले रचनाबंध असे अनेक बारकावे दाखवून देतो. पुढील काळातील बखरगद्य, शाहिरी काव्य यावर सविस्तर टिप्पणी करतो. या विवेचनातील काही भाग कदाचित आपल्याला मान्य होणार नाही. परंतु, डहाकेंनी जी मांडणी केली आहे त्यासाठी त्यांनी पुरेपूर आधार दिले आहेत. आता त्यांनी दिलेला आधार आपल्याला पुरेसा विश्वासार्ह वाटला नाही, तर प्रश्न वेगळा. दक्षिणापथावर स्वामित्व मिळविलेल्या सातवाहनाच्या काळापासून म्हणजे इ.स.पूर्व २३० पासून ते मुद्रणाच्या प्रारंभापर्यंत म्हणजे इ.स. १८२२ पर्यंतच्या प्रदीर्घ अशा २००० वर्षांच्या कालपटातील राजकीय, धार्मिक, सामाजिक आणि साहित्यविषयक घडामोडींचा हा धावता आढावा माहितीने आणि आधारार्थ अथवा पुष्ट्यर्थ दिलेल्या संशोधकांच्या उद्धृतांनी गच्च भरलेला आहे. विवेचन ओघवत्या भाषेत आहे. भाषा प्रौढ, अर्थवाही आहे. अकारण गौरव, पराभव अथवा उणिवा लपविण्यासाठी केल्या जाणाऱ्या शाब्दिक कसरती यांना फाटा

दिला आहे. 'महाराष्ट्र हे भारतीय संघराज्यातील एक प्रमुख राज्य आहे' या विधानाने प्रारंभ करून लेखक अनेक आधार देत देत दोन हजार वर्षांचा सामाजिक-सांस्कृतिक कालपट उभा करतो आणि प्रकरणाच्या अखेरीस लिहितो.... 'दुर्दैवाने मराठी भाषेतील, कागदावर लिहिलेला अत्यंत जुना असा पहिला लेख आज अस्तित्वात नाही.' (पृ.६१) या वाक्यात इतिहास जतन करण्याच्या संदर्भातील आपली अनास्था व्यक्त होते तसेच इतिहास म्हणून स्वीकारलेल्या बाबींवर प्रश्नचिन्हाचे सावट येते. डहाके सर्जनशील लेखक आहेत. प्रकरणाचा प्रारंभ आणि प्रकरणाची अखेर यांची अर्थपूर्ण योजना करून त्यांनी एकंदर विवेचनाला घाट प्राप्त करून दिला आहे. त्यांचा अभिप्राय त्यातून स्पष्ट प्रतिबिंबित होतो.

ब्रिटिशांचे भारतातील आगमन, त्यांचे हेतू व प्रयत्न, त्यांची सार्वभौम राजवट, एतद्देशीयांबद्दलची त्यांची धोरणे, त्यांचा प्रभाव या विषयाची व्याप्ती फार मोठी आहे. अनेकांनी त्याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला असला तरी अजूनही कितीतरी भुई नांगरल्याविण उरली आहे. डहाकेंनी आपल्या ग्रंथाची दोन प्रकरणे या विषयाला वाहिली आहेत. सोळाव्या-सतराव्या शतकात युरोपातील विविध देशातील लोक इथे व्यापाराच्या हेतूने आले अशा माहितीने प्रारंभ करून ब्रिटिशांच्या इथल्या वास्तव्यावर रोख ठेवून डहाके विवेचन करतात. इंग्रजी शिक्षण, ग्रंथमुद्रण, प्रकाशन, ज्ञानाच्या साधनांची निर्मिती, नियतकालिके, इंग्रजी शिक्षण घेतलेल्या लोकांतील मतप्रवाह अशा अनेक बाबींचा ते परामर्श घेतात. ब्रिटिशांच्या प्रभावकाळातील साहित्यविचार आणि साहित्यनिर्मिती यांचा काटेकोर तपशील देतात. 'ब्रिटिश राजवट म्हणजे केवळ राजकीय स्थित्यंतर नव्हते' हे विधान सार्थ ठरविणारा केवढा तरी पुरावा सादर करतात. ब्रिटिशांची इथली राजवट कशी होती, याबाबतची मतमतांतरे डहाकेंनी आधारासह दिली आहेत. 'सुज्ञांनी इंग्रज जाण्याची इच्छा कदापि करू नये' यासारखी लोकहितवादींची प्रतिक्रिया आणि ब्रिटिशांनी पहिल्या पन्नास वर्षांतच हिंदुस्थानातून दहा कोटी पौंडांची लूट केली यासारखी प्रतिक्रिया, या दोन टोकांच्या मधील अनेक प्रतिक्रिया डहाके उद्‌धृत करतात. ब्रिटिशांच्या इथल्या वास्तव्यामुळे झालेल्या ज्ञानक्षेत्रातील, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक क्षेत्रातील विकासाचा आढावा घेतात तसेच आर्थिक नुकसानीचा, हिंदू-मुस्लीम ऐक्यावर झालेल्या परिणामाचा लेखाजोखा मांडतात.

ही सगळीच मांडणी केवळ आढावावजा अथवा माहितीच्या पातळीवरील नाही. 'वसाहतवादाची रूपवैशिष्ट्ये' किंवा 'वसाहतीकरण' या संदर्भातील लेखन लेखकाची वैचारिक भूमिका स्पष्ट करणारे आहे. 'जोतीबा फुले आणि विष्णुशास्त्री चिपळूणकर हे दोन ध्रुव नव्हते. त्या काळात तसे चित्र निर्माण झाले होते' (पृ. ९८) 'एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात शिक्षित-अशिक्षित या द्वंद्वाचे ब्राह्मण-ब्राह्मणेतर या द्वंद्वात रूपांतर झाले' (पृ. ७५) अशी स्पष्ट निरीक्षणे डहाके नोंदवितात.

ब्रिटिश काळातील चित्रणामधील मला आवडलेली आणि महत्त्वाची वाटलेली आणखी एक गोष्ट म्हणजे, त्यांनी नोंदविलेल्या काही हकिकती आणि चरित्र-आत्मचरित्रांतून निवडून उद्‌धृत केलेले घटना-प्रसंग. उदाहरणार्थ ही माहिती पहा, नाना फडणवीसांनी सवाई माधवरावांच्या शिक्षणाची जी व्यवस्था ठेवली होती त्यात स्नानसंध्या, पोथ्या-पुराणे, पारंपरिक नीती, घोडदौड, दांडपट्टा यांचा समावेश होता. तंजावरचे सरफोजी सवाई माधवरावांहून फक्त दोन-तीन वर्षांनी लहान. त्यांना 'स्वार्त्झ' हा मिशनरी शिक्षक म्हणून लाभला. त्याचा मोठा परिणाम म्हणजे हिंदुस्थानातील पहिले ग्रंथालय उभारण्याचे ऐतिहासिक कार्य सरफोजीने केले. १८०५ मध्ये 'नवविद्याकलानिधी' हा छापखाना सुरू केला आणि १८०६ मध्ये त्यात 'बालबोध मुक्तावली' हे देवनागरी लिपीतील पुस्तक छापले गेले.

न. र. फाटकांच्या ग्रंथातील एक प्रसंग असा : १८५९ मध्ये सोलापूर जवळच्या माढे नावाच्या गावात एका गृहस्थाचे घर अतिवृष्टीमुळे पडले. त्या खाली त्या गृहस्थाची एक विधवा बहीण सापडली आणि प्राणास मुकली. तिचे वपन झाले नव्हते, अर्थात तिच्या प्रेताला स्पर्श केल्यास ब्राह्मणांना जातिभ्रष्ट व्हावे लागले असते. प्रेताच्या वपनाला न्हावी तयार होईनात. अखेरीस शूद्रांच्या हस्ते तिला अग्निसंस्कार मिळाला. (पृ.१४३) या सारख्या घटना स्वयमेव अर्थपूर्ण आहेत. तत्कालीन वातावरणावर प्रकाश टाकणाऱ्या आहेत.

या काळातील साहित्यनिर्मितीचा डहाकेंनी तपशिलाने विचार केला आहे. 'मुक्तामाला या कादंबरीतील प्रत्येक प्रकरणाच्या आरंभी देण्यात आलेल्या श्लोकांतून परमहंस सभेचे तत्त्वज्ञान व्यक्त झाले आहे' (पृ. १४२) किंवा 'बळीबा पाटील (लेखनकाल १८७७) ही ग्रामीण जीवनाचा संदर्भ असलेली मराठीतील पहिली कादंबरी आहे', (पृ. १२९) यांसारखी निरीक्षणे डहाकेंनी तत्कालीन साहित्याचा किती कसोशीने, काळजीपूर्वक शोध घेतला आहे, याची साक्ष देतात.

रेनॉल्डसच्या 'गॉथिक'चा प्रभाव असूनही हरीभाऊ गॉथिक कादंबरीत असलेला भूतकाळ मराठी परिसरात पूर्णपणे निर्माण करू शकले नाहीत. त्यांच्या नंतरच्या कादंबऱ्या पाहता त्यांचा तो पिंड नव्हता असे 'मधली स्थिती'बद्दलचे यथार्थ आकलन डहाके देतात.

हरीभाऊंच्या कालखंडाच्या नंतरच्या कालखंडातील वेगवेगळे विचारप्रवाह, राजकीय, सामाजिक चळवळी, धार्मिक मतप्रवाह, महत्त्वाच्या घटना यांचे वर्णन करीत करीत लेखक तत्कालीन वाङ्मयीन परिस्थिती, वातावरण, घटना यांवर भाष्य करतो. गांधीवादाचा आणि मार्क्सवादाचा मराठी साहित्यावरील प्रत्यक्ष प्रभाव क्षीणच असला तरी या वादांच्या अनुषंगाने साहित्यातील समाजचित्रणाच्या संदर्भात नवी जाणीव आकार घेऊ लागली होती असे निरीक्षण नोंदवून ग्रामीण साहित्य, दलित साहित्य, स्त्रीवादी साहित्य या १९६० नंतरच्या चळवळींच्या मागे १९२० ते १९५० या कालखंडातील विचारमंथन आहे, असे निभ्रांतपणे सांगतो. या पुढच्या काळातील सामाजिक-सांस्कृतिक संदर्भ आणि साहित्यकृती यांची सहज उपलब्धता असल्यामुळे, हे सर्वच लेखन काळाचा वेध घेणारे झाले आहे. गेल्या पन्नास वर्षांच्या मराठी साहित्यातून प्रत्ययाला येणाऱ्या अगतिकता, असुरक्षितता, असहाय्यता, एकाकीपणा, त्रुटितता, संवादहीनता, अंतर्विरोध यांची लेखकाने केलेली मीमांसा मुळातून वाचण्याजोगी आहे.

'मला मराठी साहित्याचा इतिहास लिहायचा नव्हता' असे जरी लेखकाने म्हटले असले तरी, प्रतिपादनाचा मुख्य रोख साहित्याच्या वाटचालीवर आहे. त्यामुळे मराठीतील पहिल्या ग्रंथापासून ते अगदी अलीकडच्या म्हणजे राजीव नाईकांच्या 'एक लेखक लिहिता-लिहिता'पर्यंत, किंवा जनाबाई-मुक्ताबाईपासून प्रभा गणोरकरांच्या कवितेपर्यंतच्या अवकाशातील प्रमुख साहित्यकृतींचे निर्देश आणि काही प्रभावशाली साहित्यकृतींचे तपशिलातून केलेले विवेचन या ग्रंथात मिळते. सामाजिक-सांस्कृतिक जीवन आणि या साहित्यकृतींचे स्वरूप व प्रभाव यासंबंधी लेखकाने केलेले भाष्य वाचकाला विचारोन्मुख करते.

सातवाहनकालापासून ते आजतागायतपर्यंतच्या सांस्कृतिक आणि साहित्यविषयक वाटचालीचा प्रदीर्घ पट मांडून शेवटी डहाके आपली भावनिक, वैचारिक प्रतिक्रिया नोंदवितात. 'परिस्थिती सुखावह नाही' अशा निर्णयापर्यंत येतात. 'आजच्या आपल्या समाजात, आपल्या विद्यापीठांत विज्ञान आणि वाङ्मय यांना समान महत्त्व नाही. कोणत्याही विद्याशाखेकडे प्रवेश मिळू न शकलेला विद्यार्थी नाइलाजाने कलाशाखेकडे येतो' अशा परिस्थितीबद्दल दिगंबर पाध्ये यांनी काढलेल्या 'परिस्थिती सुखावह नाही' या उद्‌गाराशी सहमत होत लेखक चिंता व्यक्त करतो. आणि पुढे जाऊन मराठी भाषेचे अस्तित्व टिकविण्यासाठी आत्मभान टिकवून ठेवायचे आणि विश्वभानही राखायचे, या दोन्ही गोष्टींमध्ये योग्य संतुलन कसे ठेवायचे या पेचाचा निर्देश करतो. हे लेखकाचे मुक्त चिंतन आहे. एका सर्जनशील लेखकाने, प्रबुद्ध वाचकाने, विचारवंताने सध्याच्या सांस्कृतिक परिस्थितीवर केलेले भाष्य आहे.

अनेक संदर्भ, आधार, भरपूर तपशील, काळाच्या विस्तीर्ण पटावरील सामाजिक-सांस्कृतिक-साहित्यिक घडामोडींचा ताळमेळ आणि एका चिंतनशील वृत्तीच्या कलावंताने या सगळ्याबद्दल व्यक्त केलेली भावनिक-वैचारिक प्रतिक्रिया असे स्वरूप असलेला हा ग्रंथ आपल्याला माहिती देतो, आपल्या जवळची माहिती तपासून पाहण्यास उद्युक्त करतो, जिज्ञासा वाढवतो, प्रश्न निर्माण करतो आणि हे सर्व होत असताना आपला उत्साह टिकवून ठेवतो. चांगल्या ग्रंथाने आणखी काय करायला हवे?

द ग्रेट साक्षरता सर्कस

# निशाणी डावा अंगठा

भास्कर लक्ष्मण भोळे

*निशाणी डावा अंगठा* ही रमेश इंगळे-उत्रादकरांची कादंबरी म्हणजे स्वातंत्र्याची पन्नास वर्षे उलटून गेल्यावरही जगातील सर्वात मोठा निरक्षर देश म्हणून विख्यात असलेल्या आपल्या परमप्रिय भारत देशातील प्रौढ-साक्षरता अभियानाच्या जिल्हास्तरीय शोकांतिकेचा एक फार्स आहे. जे केवळ चार घटका करमणुकीसाठीच फक्त वाचत असतात अशा काही सुखासीन वाचकांना ती कदाचित विनोद-विसंगतींनी व गमतीजमतींनी ओतप्रोत भरलेली रंजक कादंबरीही वाटू शकेल, पण जे वाचक समाजाभिमुख आहेत आणि ज्यांना तळागाळातल्यांच्या प्राथमिक हक्कांबाबत आस्था आहे अशा वाचकांच्या संवेदनांना मात्र ओरबाडून रक्तबंबाळ करण्याचे आणि त्यांना अंतर्मुख व अस्वस्थ करण्याचे सामर्थ्य ह्या लेखनात निश्चितच उतरले आहे. विशेषत: प्राथमिक शिक्षणाची जी अक्षम्य हेळसांड आपण केली आहे तिचे अत्यंत विदारक वास्तव आपल्यासमोर ह्या कादंबरीने ठेवले आहे. ज्या प्रौढ निरक्षरांना साक्षर करण्यासाठी अभियानांचा घाट आज घातला जातो ते अगणित भारतीय नागरिक स्वातंत्र्योत्तर काळात जन्माला आले असले तरी आपल्या सदोष शिक्षणप्रणालीमुळे वयाची पन्नाशी ओलांडतानाही डाव्या हाताच्या अंगठ्याचा उपयोग स्वाक्षरीचा पर्याय म्हणून करताना सर्वत्र दिसतात. संविधानाने सांगितल्याप्रमाणे प्राथमिक शिक्षण जर खरोखरच सार्वत्रिक, मोफत व सक्तीचे झाले असते तर त्यांच्यापैकी अनेक जण निशाणी-अंगठ्याच्या लाजिरवाण्या मजबुरीतून सुटू शकले असते.

२ ऑक्टोबर १९९७च्या शुभमुहूर्तावर सुरू झालेल्या आणि २०००अखेर संपलेल्या साक्षरता अभियानाच्या एका भिलठाणा नामक जिल्ह्यातील सर्व पातळ्यांवरील अंमलबजावणीचा हा आलेख असला तरी त्याला अपवादात्मक ठरवून उडवून लावण्याची शक्यता नाही. "भालगाव म्हणाल तर भालगाव; त्याऐवजी दुसरं कोणतंही गाव म्हटलं तरी हरकत नाही, म्हणजे तसा काही फरक पडत नाही. तिथे ग्रामसेवक होते गोमासे. गोमासे म्हणाल तर गोमासे, त्या ऐवजी दुसरं कुणीही म्हटलं तरी हरकत नाही. म्हणजे तसा काही फरक पडत नाही." ...अशा प्रकारची वाक्यरचना पुन:पुन्हा करून लेखकाने वर्ण्य शोकांतिकेची सार्वत्रिकता प्रभावीपणे अधोरेखित केली आहे. विशिष्ट नावागावांचे संदर्भ घेऊन आणि विशिष्ट घटना-प्रसंगांमधून हे निवेदन पुढे सरकरत जात असले तरी ह्यातील वर्तमान तेवढ्यापुरते मर्यादित नाही, ते अगदी आपल्या आसपासही हुबेहूब तसेच आहे ही जाणीव वाचकाला अधिकच अस्वस्थ करते. किंबहुना कादंबरीतील घटना, पात्रे व प्रसंग काल्पनिक वाटू नयेत इतकी हुबेहूब ती प्रत्यक्षात आढळतात, त्यामुळे वाचक अधिकच हादरून जातो. 'असे आढळल्यास तो योगायोग समजावा' असे लेखक म्हणत असला तरी त्याच्या ह्या कादंबरीला केवळ कपोलकल्पित वा अतिशयोक्त म्हणून सोडून देणे वाचकाला मुळीच शक्य होत नाही.

कोणत्याही सरकारी अभियानात तयार होते त्याप्रमाणे आपली जबाबदारी दुसऱ्या कोणाच्या तरी गळ्यात टाकून स्वत: मोकळे होण्याची साखळी साक्षरता अभियानातही कशी कलेक्टरपासून सुरू होऊन इओ, बीओ, एडीआय, केंद्रप्रमुख, ग्रामसेवक ह्या क्रमाने शेवटी गावागावांतल्या प्राथमिक शिक्षकापर्यंत पोहोचते ते ह्या तीनशे दोन पानांच्या कादंबरीत लेखकाने औपरोधिक शैलीत अनेक



रमेश इंगळे-उत्रादकर

**रमेश इंगळे उत्रादकर**

**जन्म :** १७ नोव्हेंबर १९६८

**कविता**

दाखल खारीज २००१

**कादंबरी**

निशाणी डावा अंगठा, २००५

**संपादन**

शब्दवेध

ऐवजी

प्रसंगांच्या माध्यमातून रेखाटले आहे. प्रत्येक स्तरावर ज्याच्या हाती अभियानाची जी काही जबाबदारी असेल तो स्वत:ची कातडी बचावून, आपल्यावर कारवाईचा बडगा उगारला जाणार नाही एवढी काळजी घेत अभियानाचा कसा बट्ट्याबोळ करतो, त्यासाठी किती कल्पक नाटके आणि लांड्यालबाड्या करतो ह्याची अस्सल वर्णने येथे आपल्याला वाचायला मिळतात. सरकारकडून रोज एकतर अभियानासंबंधीच्या सूचना येणार किंवा माहिती मागवणारी परिपत्रके बरसत राहणार! कागदी घोडे नाचवण्यातच कार्यक्रमांची कृतार्थता समाजणाऱ्या शासकीय यंत्रणेला सतत काही ना काही माहिती हवीच असते. लेखक म्हणतो त्याप्रमाणे सरकारी अधिकाऱ्यांना कागदांशीच बोलण्याच्या सवयीमुळे जणू माणसांशी बोलताच येत नाही किंवा त्यांचे म्हणणे ऐकूही येत नाही! ग्रामसमन्वयकाने दर महिन्याला पाठवायच्या अहवालाबरोबरच दर आठवड्याला, पंधरवड्याला पाठवायचे अजून वेगवेगळे अहवाल असायचे. मागितली जाणारी प्रत्येक माहिती तातडीचीच असल्यामुळे शिक्षकांनी हातची सर्व कामे सोडून ती माहिती गोळा करायच्या कामाला लागायचे. परिणामी कादंबरीतील एका पात्राने म्हटल्याप्रमाणे, ''हे निरक्षर तर आपल्याकडून बापजल्मात साक्षर होणार नाहीत; पण या भानगडीत शाळंतली ही पोरं मात्र निरक्षर झाल्यावाचून राहणार नाहीत!''

सरकार जेव्हा कोणतीही धडक मोहीम सुरू करते तेव्हा अंगात आल्यासारखे वरपासून खालपर्यंत फक्त त्या मोहिमेबद्दलच चर्चा चालत राहते. सुपात काही नसले तरी रिकामेच जाते घरघरत राहते. वरच्यांना वाटते छान पीठ गळते, खालच्यांना मात्र कळत असते की आपण जात्याचा वांझ खुंटा फिरवतो आहोत. वरच्यांना पिठाशी कर्तव्य नसते, फक्त घरघर सुरू राहणे त्यांना पुरेसे वाटते. साक्षरता अभियानाचे दिवसही अशा वांझोट्या घरघरीसोबत पुढे सरकत होते. मागितलेले सगळे अहवाल चोखपणे पाठवले जात होते. दौरे-मीटिंगा वेळापत्रकाप्रमाणे होत होत्या. प्रत्येक केंद्रात एका शिक्षकाची अभियानाचा पूर्णवेळ कार्यकर्ता म्हणून नेमणूक झाली होती. त्याला त्या नेमणुकीचा अर्थ फक्त एवढाच समजला होता की यापुढे आपला शिक्षकाचा धावपळीचा व दळभद्री जीवनक्रम काहीकाळ तरी संपला, आता आपण सुखासीन जगायचे! मुख्याध्यापकांना ग्रामसमन्वयक ही उपाधी अभियानांतर्गत मिळाली होती, पण त्यांच्यापैकी कोणालाच समन्वय कोणाशी, कोठे, कसा, कशाचा, कशाला, कोणी व का साधायचा याबद्दल पुसटशीही कल्पना नव्हती! हीच परिस्थिती अभियानातील इतरही सर्वांचीच होती. तरी पण आदेशाबरहुकूम प्रत्येक जण रीतसर औपचारिकता सांभाळीत डायऱ्या भरत होता, रिपोर्ट पाठवत होता, सोहळे-समारंभ साजरे करत होता.

अभियानाच्या कालावधीत साजऱ्या केल्या गेलेल्या आंतरराष्ट्रीय साक्षरता दिनाचे कादंबरीतील वर्णन मुळातून वाचण्याजोगे आहे. त्यातही बंडू भावडा राठोड ऊर्फ भाऊ ह्यांचे भाषण तर




केवळ अप्रतिम आहे. भाऊंच्या भाषणाबद्दल लेखक म्हणतात, ''भाऊ बोलायला उभे राहिले की मारुतीचं शेपूट आखूड पडे. भाऊ जिथं जिथं जाता येईल तिथं तिथं जाऊन हिंडून येत. मग कार्यक्रमाचा हेतू, विषय,

आशय, गांभीर्य, वेळ या साऱ्या गोष्टी निरर्थक होत.''

आंतरराष्ट्रीय साक्षरता दिनाचा अहवाल लिहिण्याचा प्रसंग म्हणजे तर सरकारी ससेमिऱ्याला ग्रामस्थ मंडळींकडून मिळणाऱ्या इरसाल प्रतिसादाचा नमुनाच म्हणावा लागेल! भाऊ जावईबुवा ह्या पात्राला म्हणतात की,



अहवाल लिहिताना खोटे असेल तेही असे रेटावे लागते की खऱ्यालाही त्याचे खरेपण खोटे वाटावे. लांडी-लबाडी करण्याबाबतचेही त्यांचे एक तत्त्वज्ञान आहे. जिथे कोणाच्या काळजाला ठेच पोहोचत नाही तिथे कितीही लांडी-लबाडी करण्यात त्यांना काहीही गैर वाटत नाही. ते म्हणतात, ''हे अभियान सुरू झाल्यापासून आपण सर्रास खोटी माहिती पाठवतो, ही आपली लबाडीच झाली. पण ही लबाडी आपल्या नोकऱ्या राखते, आपलं अन्न-पाणी राखते. जिथे वरपासून खालपर्यंत लबाडीच चाललीय तिथं हरिश्चंद्राच्या वंशातले लोक जगूच शकत नाहीत!'' लबाडांच्या राज्यात लबाडी हा शिष्टाचार झाल्यावर ज्यांना लबाडी जमत नाही त्यांनी जगायचे कसे हा वस्तुनिष्ठ प्रश्न त्यांना पडला होता. साक्षरता प्रसाराचे वर्ग नियमित भरत नसतानाही इन्स्पेक्शनच्या वेळी देवळात पोथीपुराणे करत बसलेल्या म्हाताऱ्याकोताऱ्यांना नवसाक्षर म्हणून दाखवणे, त्यांच्या वाचन-लेखन क्षमतांचे खोटे साक्षीदार उभे करणे किंवा तपासणी अशक्य व्हावी म्हणून गावातला वीजपुरवठा तोडून अंधार करणे, खऱ्याखोट्या देवदेवतांच्या साक्षात्कारांच्या व चमत्कारांच्या कथा प्रसृत करणारी धमकीवजा पत्रके वाटणे, गावाच्या इज्जतीचा मुद्दा पुढे करून अशा बाबतीत वाच्यता करण्याची शक्यता असणाऱ्यांची तोंडे बंद करणे अशा अनेक कल्पक उपायांचा अवलंब ग्रामस्थ मंडळी करताना येथे भेटते. लेखकाला असलेल्या तळपातळीवरच्या समृद्ध अनुभवविश्वाची साक्षच या सर्व प्रसंगांतून वाचकाला मिळते.

नवसाक्षरांचे अंतर्गत मूल्यमापन आणि बाह्य मूल्यपापन हे प्रसंग तर 'द ग्रेट साक्षरता सर्कस' ह्या वर्णनात अगदी फिट्ट बसणारे आहेत. गावागावांत भिंतीभिंतींवर सर्वत्र चिकटवलेली मोठाली पोस्टरे, कोणी काळवाघेबाई दोरीवरून तोल सांभाळीत चालत आहेत, तर कोणी पाठकबाई जळत्या रिंगेतून उडी मारत आहेत. कोणी जुंबड आठ टोप्या एकामागून एक शिताफीने झेलतो आहे, तर बिनाहेल्मेटचा डुकरे मौतच्या कुव्यात फटफटी चालवतो आहे... अशा सर्व सर्कसकसरती अवतीभवती सुरू असल्याचा भास भाऊंनाच नव्हे तर वाचकालाही येतो. सर्कशीच्या वातावरणातील गतिमानता लेखकाने अचूकपणे शब्दांत पकडली आहे. आधीच साक्षर असलेल्या शे-सव्वाशे स्त्रिया आणि पंचवीस-तीस पुरुष ह्यांना दुसरीच निरक्षरांची खोटीनाटी नावे देऊन त्यांना नवसाक्षर म्हणून बसायला तयार करणे, ती नवी नावे त्यांच्याकडून घोकून घेणे, त्यांच्या हातून कधी मुद्दाम वाईट अक्षर काढून तर कधी डाव्या हाताने लिहून उत्तरपत्रिका भरून घेणे, त्यांच्या छत्तीस महिन्यांच्या खोट्या हजेऱ्या भरणे इत्यादी प्रकार तळपातळीवरची माणसे वरपातळीवरच्यांच्या कधी मूकसंमतीने तर कधी अप्रत्यक्ष इशाऱ्यांवर बिनबोभाट पार पाडतात. मूल्यमापन समितीच्या सदस्यांना आदरातिथ्याच्या ओझ्याखाली इतके दाबून टाकतात की त्यांना कामातील उणिवा शोधायला संधीच मिळू देत नाहीत. परिणाम असा होतो की ज्या जिल्ह्यात कुठेच साक्षरतेचा वर्ग कधी भरला नाही, कोणी शिकले नाही की कोणी शिकवले नाही, फक्त सगळ्यांनी उत्तम नाटक वठवले, नव्याने कोणी साक्षर तर झालेच नाही पण अभियानाच्या ताणापायी शाळांमधूनही शिकवणे झाले नाही तो *भिलठाणा जिल्हा संपूर्ण साक्षर झाल्याचे* सरकारतर्फे घोषित केले जाते. एवढेच नव्हे तर साक्षरता

अभियानातील उत्कृष्ट कार्याबद्दल महाराष्ट्रातील *ह्या जिल्ह्याची सर्वोच्च राष्ट्रीय पुरस्कारासाठी निवड* होते आणि त्या जिल्ह्यासंबंधी वर्तमानपत्रांत रकानेच्या रकाने भरून लिहून येतात. अशा प्रकारे गांधीजयंतीच्या मुहूर्तावर सुरू झालेल्या एका मिथ्या-अभियानाची इतिश्री होते, आणि आत्मवंचनेच्या दुष्टवर्तुळाचा एक फेरा पूर्ण होतो.

पण ह्या अन्योन्याश्रयी फसवणुकीच्या काळ्या ढगाला एक रुपेरी किनार बौद्धवाड्यातील साक्षरतावर्गाच्या स्वरूपात लाभलेली असते. साक्षरता अभियान सुरू झाल्यापासून बौद्धवाड्यात एक नवेच चैतन्य आणि उत्साह संचारला होता. तिथल्या तमाम निरक्षर बाया-माणसे न चुकता समाजमंदिरात येऊन न लाजता एकत्र बसू लागली, स्वयंसेविका शांताबाई जे शिकवतील ते मन लावून शिकू लागली. शांताबाईही ते काम मनापासून व आवडीने करत होत्या. स्वाभाविकच सुरुवातीपासून शेवटपर्यंत बौद्धवाड्यातील साक्षरता वर्गाच्या संदर्भात कोणताच खोटेपणा करण्याची गरज पडली नाही. ना खोट्या हजेऱ्या, ना खोटी नावे. फक्त तिथलेच प्रौढ नवसाक्षर लिहा-वाचायला शिकले होते. त्यात देखाव्याचा नव्हे तर शिकण्याच्या आंतरिक ओढीचा भाग होता, अक्षरओळखीचे स्वप्न साकार झाल्याचा आणि शब्दभेटीचा निखळ आनंद होता. बौद्धवाड्यातील वर्गाबाबतच्या ह्या वेगळेपणाचे कारण त्यांनी भोगलेल्या भूतकाळात जसे आहे तसेच ते बाबासाहेब आंबेडकरांनी त्या समाजाला दिलेल्या संदेशातही सामावलेले आहे असे कादंबरीतील एक पात्र जेव्हा सांगते तेव्हा खरे म्हणजे त्याच्या तोंडून लेखकाची सामाजिक अंतर्दृष्टीच व्यक्त होते. जे आपल्यापासून हिरावले गेले, ज्याच्यावाचून आपल्यात एक वैगुण्य व अपुरेपण निर्माण झाले आणि आपल्या वाट्याला हे अमानुष जिण्याचे भोग व पिढ्यान्‌पिढ्यांचे दारिद्र्य आले ते शिक्षण मिळण्याची सुवर्णसंधी आयुष्यात उशिरा का होईना जर चालून आली आहे तर तिचे सोने करावे अशी ऊर्मी पूर्वास्पृश्य समाजात ह्या निमित्ताने आली. "उपाशी माणसाला एकदम अन्न मिळाल्यावर होतं ना तसं झालंय त्यांचं!" बाबासाहेबांनी त्यांच्या मनात ज्ञानाची भूक जागवण्यासाठी जो विचार दिला तो त्यांनी त्यांच्या काळजात जपून ठेवला होता. संधी मिळताच तो वर उफाळून आला. ह्याउलट बहुजन समाजाबाबत झाले आहे हे सांगताना लेखक त्याबद्दल त्याच पात्राच्या तोंडून म्हणतो की, "त्यांच्याजवळ दिशा दाखवणारी बोटं नाहीत, काळजात जपून ठेवावा असा विचार नाही. म्हणून हे सगळे समाज दिशाहीन आणि सैरभैर झालेत. संपूर्ण समाजाला एकाच विचारानं बांधण्याची जी शक्ती बाबासाहेबांजवळ होती तशी दुसरीकडे पहायलाच मिळत नाही. म्हून सगळे प्रॉब्लेम आहेत." महारवाड्यात जाण्याच्या नुसत्या विचारानेही कपाळावर आठ्या पाडणारा सवर्ण शिक्षक किंवा खोटे नाव धारण करताना महारणीचे नाव आपल्याला मिळाल्यावर अंगावर पाल पडल्यासारखी दचकणारी बहुजन स्त्री ही सामाजिक दुराव्याची प्रातिनिधिक पात्रे समकालीन वास्तवाबद्दल बरेच काही सांगून जातात.

शैक्षणिक पर्यावरण ही जरी ह्या कादंबरीची मुख्य आशयवस्तू असली तरी तिच्या निमित्ताने समकालीन ग्रामीण जीवनाचा वस्तुनिष्ठ आलेखच लेखकाने वाचकासमोर उभा केला आहे. त्यातील विविध स्तरांवर वावरणारी माणसे, त्या माणसांची नुसती सामाजिक-आर्थिक परिस्थितीच नव्हे तर त्यांची इरसाल तरीही निरागस मानसिकता, त्यांची स्वप्ने, भाषा-परिभाषा, त्यांचे संवादांचे विषय, अस्सल कल्पकता, त्यांचे भावविश्व, त्यांची भाबडी जिज्ञासा, तर्काच्या भानगडीत न पडता त्यांनी निमूटपणे स्वीकारलेले आयुष्य, पोटासाठी त्यांना उपसावे लागणारे अपार कष्ट आणि केवळ वर्तमानावर नजर ठेवून सुरू असलेले त्यांचे जगणे — हे सारे लेखकाने प्रत्ययकारी शब्दांत रेखाटले आहे. ह्या कथित निरक्षर माणसांना समजून घेण्यासाठी जी आत्मीयता अंगी असावी लागते ती लेखकाच्या ठिकाणी पुरेपूर असल्यामुळेच तो हे आव्हान पेलू शकला. ह्या माणसांना पाटी-पेन्सिलीपेक्षा उपलब्ध काळाच्या अवकाशावर नक्षी काढण्यासाठी हातापायात बळ टिकून राहणेच जास्त श्रेयस्कर वाटते. ते काळावर जे लिहितात, किंवा त्यांचे हात जे बोलतात ते ज्यांना वाचता येत नाही, कळत नाही त्यांना समाजात साक्षर-सुशिक्षित मानले जाते हा गोंधळ साक्षरतेबाबतच्या गैरसमजुतीतूनच उद्भवलेला असल्याचे नोंदवून लेखक एका जागी असे लिहितो की, "साक्षरता ह्या शब्दातच एक मूल्यभाव

आहे. त्याचा संबंध केवळ वाचन आणि लेखनाशी नाही, तो काळजाशी आणि आतड्याशी आहे.'' ह्या निकषावर तपासल्यास त्याच्या मते मोठमोठाल्या ऑफिसांतील अधिकारपदांवर, सत्तेच्या खुर्च्यांवर, तारांकित हॉटेलांत वगैरे निव्वळ निरक्षर माणसांचाच भरणा आहे. सर्व जनहिताच्या सरकारी अभियानांचा खेळखंडोबा करून सोडणाऱ्या ह्या अडाणी-निरक्षर जगासाठी कोणते अभियान राबवता येईल? असा लेखकाचा प्रश्न असून तो विचारात टाकणारा आहे.

विकासप्रक्रियेच्या चुकीच्या दिशा-आशयामुळे जे विपरीत वास्तव खेड्यापाड्यांत निर्माण झाले आहे त्याची अधिकृत चुणूक ह्या कादंबरीत मिळते. वरवर पाहता खेडे बदलले, शाळा निघाल्या, इस्पितळे उघडली, पंचायती संस्था कार्यान्वित झाल्या,



नाना प्रकारचे सरकारी अधिकारी पायधूळ झाडू लागले. जिथे कधीकाळी सायकलीचे अप्रूप होते तिथे तऱ्हेतऱ्हेच्या गाड्या धावू लागल्या. पण तरीही सामान्य माणूस मात्र जिथे होता तिथेच राहिला. अंधाराच्या आडोशाआड प्रातर्विधी उरकण्याची अगतिकता ग्रामीण भगिनींच्या नशिबात पूर्वी होती तशीच कायम राहिली. सरकारी योजनांचे ढोलताशे बडवले जात असतानाच ज्यांच्यासाठी त्या योजना होत्या ते त्यांच्यापासून कोरडेच राहिले. आपल्या सर्वांगीण दुरवस्थेकडे विषण्ण नजरेने पहाता पहाताच तिच्यावर कुरघोडी करण्याचा मिश्कील मार्ग खेडुतांनी कसा शोधून काढलेला असतो हे ह्या कादंबरीतील अनेक प्रसंगांतून दिसून येते. लेखकाची सूक्ष्म निरीक्षणशक्ती जशी त्यातून जाणवते त्याचप्रमाणे त्या वरकरणी विनोदी वाटणाऱ्या प्रसंगांमागची शोकात्म वस्तुस्थितीही त्याला सूचित करायची असते हे लक्षात आल्यावाचून राहत नाही. ह्या ग्रामीणांच्या बोलण्यात लैंगिक संदर्भ व प्रतिमा वारंवार येतात. स्त्री-पुरुष संबंधांचे उल्लेख, सिनेमा-तमाशा वगैरेतून ते अनुभवण्यातील असोशी, त्याबद्दलची चविष्ट चर्चा आणि अश्लील अभिप्राय व्यक्त करण्यासाठी 'आध्यात्मिक' ही संज्ञा वापरण्याचा खास देशी ढंग. आणि सगळे सूचक संवाद वाचताना एका बाजूने मनोरंजन होत असले तरी हे असे होण्याची कारणे काय असावीत ह्याचा जेव्हा आपण शोध घेऊ लागतो तेव्हा मनोविनोदनाच्या कला-साहित्य-संगीतादी सुसंस्कृत साधनांपासून त्यांना वंचित राहावे लागण्यातून तर हे होत

**'साक्षरता अभियाना'तील उत्कृष्ट कार्याबद्दल**
**महाराष्ट्रातील भिलठाणा जिल्ह्याची राष्ट्रीय पातळीवरील**
**सर्वोच्च 'देवेन चित्रा' पुरस्कारासाठी निवड**

रकानेच्या रकाने भरून वाहू लागले. बातमी वाचून एक लाख अठ्ठावीस हजार सातशे सत्तावीस पोट धरून हसत राहिले. बातमी ऐकून दोन लाख वीस हजार एकोणवीस जणांना धक्का बसला. बातमी वाचून नव्याण्णव हजार नऊशे नऊंना भोवळ आल्यासारखे झाले. बातमी ऐकून त्र्याऐंशी हजार चारशेवीसांच्या तोंडून शब्द फुटेना. बातमी वाचून सातशेएकोणऐंशी म्हणाले, 'कठीण आहे हो कठीण आहे!' बातमी ऐकून एक लाख सातशेएकोणऐंशी म्हणाले, 'सगळं सोप्पं झालंय... आता सोप्प झालंय!' बातमी वाचून तेरा हजार आठशेबावन्न म्हणाले, 'रिप्ले यांचे माना न माना.' बातमी ऐकून चौदा हजार आठशेएक्कावन्न म्हणाले, 'ऐकावं ते अजबच!' बातमी वाचून एकशेसतरा जणी म्हणाल्या, 'अहो, हे वाचलं का?' बातमीने एक हजार सातशेसत्तावन्न घोडेस्वारांना आनंद झाला. त्यांनी पेढे वाटले. बातमी वाचून-ऐकून कुणालाही म्हणजे अगदी एकालासुद्धा वाईट वाटलं नाही. दुःख झालं नाही. दोन लाखांतल्या कुण्यातरी एकाला कुणीतरी एक म्हणाला, 'तुझ्यामुळे जिल्ह्याला एवढा मोठा पुरस्कार लाभला.' त्याने हात जोडले, डोळे मिटले आणि तो दैवी सुरात म्हणाला, 'देवा पांडुरंगा, याहीले माफ कर, ह्ये काय करून राह्यले?' 'याहीचं याह्यीलेच समजत नाही.'

नसावे ना अशी शंका मनात डोकावते.

कोणाच्याही ध्यानीमनी नसताना एक दिवस कागदी घोड्यांची धावपळ थांबली आणि भिलठाणा जिल्ह्याचे नशीब फळफळले. तो नुसताच संपूर्ण साक्षर नाही झाला तर राष्ट्रीय पुरस्काराचा मानकरीही ठरला. ह्या बातमीने काही लाख जण पोट धरून हसले, काही हजारांना धक्का बसला तर काहींनी पेढे वाटले, काही शेकडा लोकांना आश्चर्य वाटले, पण पुढे लेखक खेदाने नमूद करतो की, ''बातमी वाचून-ऐकून कुणालाही म्हणजे अगदी एकालासुद्धा वाईट वाटलं नाही, दुःख झालं नाही.'' जणू तीन वर्षे चाललेल्या एका शोकात्म नाटकाचा सुखान्त शेवटच झाला आहे असे सर्वांना वाटले होते. सशक्त आशयवस्तू, प्रभावी कथन आणि साक्षेपी भूमिका ह्या बळावर लेखकाने साक्षरता अभियानाची ती तिन्ही वर्षे वाचकापुढे इत्यंभूत जिवंत केली आहेत त्याबद्दल मतभेदाला मुळीच जागा नाही.

लेखकाच्या भाषाशैलीचा स्वतंत्र उल्लेख करावा लागेल एवढी ती चित्रदर्शी व चपखल आहे. खेड्यातील माणसांच्या सहज बोलण्यातही जो मिश्कील, इरसाल व बेधडकपणा असतो तो तर ते हुबेहूब शब्दांत पकडतातच, पण प्रसंगानुरूप भाषेला वळण देण्यातही ते चांगलेच वाकबगार आहेत. सरकारी खलित्यांची आदेशवजा, औपचारिक, हडेलहप्पीची कोरडी भाषा जशी ते शब्दशः लिहून जातात तद्वतच त्या सरकारी 'येनकेनप्रकारे' झालेच पाहिजेच्या परिपत्रकांना गाव-तालुका-जिल्हा स्तरांवरून जो बेरकी प्रतिसाद 'खोटं असतं ते नेटानं रेटावं लागतं' ह्या जाणिवेतून ठोकून दिलेल्या अहवालांच्या स्वरूपात मिळतो त्याचीही भाषा लेखकाने अचूक पकडलेली आहे. अमुक-तमुक देवीच्या नावाने पत्रांची साखळी चालवण्याचे प्रकार खेड्यापाड्यांत सर्रास सुरू असतात, त्या माध्यमाचा वापर करून तरी लोकांचा प्रतिसाद साक्षरतावर्गाला मिळवता येईल का हे पाहण्याचा एक कल्पक प्रयोग कोणीतरी करतो. तुळजाभवानीच्या मंदिरात ब्राह्मणाला भेटलेल्या नागदेवतेची गोष्ट सांगून लोकांच्या मनात दहशत पेरणाऱ्या त्या पत्रकातील तपशील आणि त्याची भाषा, तसेच बाह्यमूल्यांकनाच्या सर्कसवजा घडामोडींचे गतिमान वर्णन पद्यात्मक पोथीसदृश कहाणीच्या शैलीत लेखकाने केले आहे त्याचीही भाषा लक्षणीय उतरलेली आहे. खेड्यातील लोक नेहमीच्या त्यांच्या बोलण्यात रूढ शब्दांना त्यांच्या प्रचलित अर्थापेक्षा वेगळेच सांकेतिक अर्थ देऊन वापरत असतात. ही त्यांची लकब वापरूनही लेखकाने निवेदनाला रंगत आणली आहे. बेमालूमपणे मराठीकरण झालेल्या, कधी त्या शब्दांना मुळापेक्षा वेगळाच अर्थ लाभलेल्या खास शब्दांचा तर अगदी सढळ हातांनी वापर ग्रामीण भागात होत असतो. बॅटरीक, इंटरेस, आयटेम, बरडन, सुलूप असे शब्द, तर व्हिडीओ जुळवून आणणे, टच करणे, किंवा स्टोरीचा रिक्याप सांगणे असे वाक्यप्रयोग लोक जितक्या सराईतपणे वापरतात तितक्याच सहजपणे लेखकाने निवेदनात पेरले आहेत.

चिरंतन मूल्यांचा जिताजागता अनुभव

# हॉटेल माझा देश

सतीश बडवे

झपाट्याने बदलत चाललेले वाङ्मयीन पर्यावरण, वाङ्मय व्यवहाराची बदलत जाणारी केंद्रे, अगदी खेड्यापाड्यांतही फोफावलेले प्रतिभेचे उन्मेष, त्यांची उगवण्याची, विकसण्याची आणि रुजण्याची धडपड, समविचारी लोकांचे तयार होत जाणारे गट, बदलती जीवनशैली, चंगळवादी जीवनाच्या आकर्षणातही संवेदना बधिर होऊ न देता सहसंवेदना जपण्याची ओढ, अशा नाना गोष्टींमुळे मराठी कविता सध्या वेगळ्या वळणावर उभी आहे. कवितेतल्या या नव्या वळणाने मध्यमवर्गीय मानसिकतेच्या संवेदनविश्वाला बाजूला सारण्याची प्रक्रिया सुरू केली, नकाराच्या तीव्र होत जाणाऱ्या प्रतिक्रिया संयमित करण्यास प्रारंभ केला आणि विशिष्ट प्रवाहातच अडकून राहण्यापेक्षा नवे आत्मभान प्रकट केले. अशा नव्या वाटेवरची नवे आत्मभान व्यक्तविणारी कविता 'हॉटेल माझा देश' या कवितासंग्रहात भेटते. धम्मपाल रत्नाकरचा हा नवा कवितासंग्रह कवितेच्या नव्या वळणाला सामावून घेणारा आणि आगामी निर्मितीच्या नव्या शक्यतांना प्रतिसाद देणारा आहे.

'हॉटेल माझा देश' या शीर्षकातून एक वेगळे जग ही कविता उभी करणार याचा अंदाज येतो, हे खरे असले तरी या जगाचे घडणारे दर्शन वेगवेगळ्या पातळ्यांवरचे आहे. धम्मपालचा अनुभव केवळ वेगळ्या जगातला आहे, असे नसून या जगाकडे डोळसपणे बघण्यातला आहे. हॉटेलविषयीची त्याची संवेदना अतिशय तीव्र स्वरूपाची आहे. विविध धर्मपंथ, जाती, स्वभाव आणि प्रवृत्ती यांचा समुच्चय जिथे 'माणूस' या एकाच पातळीवर विसर्जित होत राहतो आणि स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यांचा जिताजागता प्रत्यय देतो ते हॉटेल म्हणजे कवीने अनुभवलेला 'देश' आहे. वस्तुतः या मूल्यांचा उद्भव विचारवंतांच्या विचारांमधून प्रकट झाला. पण मूल्यांचे उच्चारण आणि ती मूल्ये प्रत्यक्ष कृतीत उतरणे, यासंबंधीचा येणारा अनुभव बऱ्याच वेळा व्यस्त प्रमाणात असतो. मात्र हॉटेल हे असे ठिकाण आहे की, तिथे ही मूल्ये रुजलेली आहेत हे वेटरपासून कॅशिअरपर्यंत घेतलेल्या अनुभवांच्या आधारे धम्मपालच्या शब्दांतून मांडले जाते. ज्या हॉटेलमध्ये तो वाढला, ज्या हॉटेलने त्याला उभे केले, ज्या हॉटेलने त्याला माणूस म्हणून जगण्याचा विश्वास दिला; तो या देशातल्या प्रत्येकालाच मिळावा आणि जातीपातीच्या पलीकडे जाऊन हा देश माणसांचा देश व्हावा हे स्वप्न सांगू पाहणारी धम्मपालची ही कविता आधुनिक वास्तवातील नवसंवेदनेचा प्रत्यय देते. ही हॉटेलची लाईन म्हणजे जातीपातीला क्षुद्र करणारी लाईन आहे, असा पुरेपूर आत्मविश्वास त्याला असल्याने या देशालाच हॉटेल बनविण्याचा आशावाद तो मांडतो...

*जिथं नसते जात*
*जिथं नसतो धर्म*
*जिथं नसतो पंथ*
*फक्त असतात माणसं*
*त्या माणसांचा देश*
*हॉटेल माझा देश.*

देशाबद्दलच्या प्रेमाच्या, आत्मीयतेच्या, उज्ज्वल इतिहासाच्या साऱ्या संकल्पनांच्या मर्यादा इथे स्पष्ट होतात. जात, धर्म आणि पंथ या तीन गोष्टी माणसांच्या वाटण्या करणाऱ्या ठरू शकतात. या तीन गोष्टींच्या आधारे माणसामाणसात अंतर निर्माण करता येते, माणसाच्या वृथा अस्मिता जागृत करता येतात, आपल्या स्वार्थासाठी माणसांचा समूह वापरता येतो, आपापसातली तेढ वाढवता येते, त्यांच्या आधारेच सत्तेपर्यंत पोचण्याचा



धम्मपाल रत्नाकर

## चिरंतन मूल्यांचा जिताजागता अनुभव

# हॉटेल माझा देश

सतीश बडवे

झपाट्याने बदलत चाललेले वाङ्मयीन पर्यावरण, वाङ्मय व्यवहाराची बदलत जाणारी केंद्रे, अगदी खेड्यापाड्यांतही फोफावलेले प्रतिभेचे उन्मेष, त्यांची उगवण्याची, विकसण्याची आणि रुजण्याची धडपड, समविचारी लोकांचे तयार होत जाणारे गट, बदलती जीवनशैली, चंगळवादी जीवनाच्या आकर्षणातही संवेदना बधिर होऊ न देता सहसंवेदना जपण्याची ओढ, अशा नाना गोष्टींमुळे मराठी कविता सध्या वेगळ्या वळणावर उभी आहे. कवितेतल्या या नव्या वळणाने मध्यमवर्गीय मानसिकतेच्या संवेदनविश्वाला बाजूला सारण्याची प्रक्रिया सुरू केली, नकाराच्या तीव्र होत जाणाऱ्या प्रतिक्रिया संयमित करण्यास प्रारंभ केला आणि विशिष्ट प्रवाहातच अडकून राहण्यापेक्षा नवे आत्मभान प्रकट केले. अशा नव्या वाटेवरची नवे आत्मभान व्यक्तविणारी कविता 'हॉटेल माझा देश' या कवितासंग्रहात भेटते. धम्मपाल रत्नाकरचा हा नवा कवितासंग्रह कवितेच्या नव्या वळणाला सामावून घेणारा आणि आगामी निर्मितीच्या नव्या शक्यतांना प्रतिसाद देणारा आहे.

'हॉटेल माझा देश' या शीर्षकातून एक वेगळे जग ही कविता उभी करणार याचा अंदाज येतो, हे खरे असले तरी या जगाचे घडणारे दर्शन वेगवेगळ्या पातळ्यांवरचे आहे. धम्मपालचा अनुभव केवळ वेगळ्या जगातला आहे, असे नसून या जगाकडे डोळसपणे बघण्यातला आहे. हॉटेलविषयीची त्याची संवेदना अतिशय तीव्र स्वरूपाची आहे. विविध धर्मपंथ, जाती, स्वभाव आणि प्रवृत्ती यांचा समुच्चय जिथे 'माणूस' या एकाच पातळीवर विसर्जित होत राहतो आणि स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यांचा जिताजागता प्रत्यय देतो ते हॉटेल म्हणजे कवीने अनुभवलेला 'देश' आहे. वस्तुत: या मूल्यांचा उद्भव विचारवंतांच्या विचारांमधून प्रकट झाला. पण मूल्यांचे उच्चारण आणि ती मूल्ये प्रत्यक्ष कृतीत उतरणे, यासंबंधीचा येणारा अनुभव बऱ्याच वेळा व्यस्त प्रमाणात असतो. मात्र हॉटेल हे असे ठिकाण आहे की, तिथे ही मूल्ये रुजलेली आहेत हे वेटरपासून कॅशिअरपर्यंत घेतलेल्या अनुभवांच्या आधारे धम्मपालच्या शब्दांतून मांडले जाते. ज्या हॉटेलमध्ये तो वाढला, ज्या हॉटेलने त्याला उभे केले, ज्या हॉटेलने त्याला माणूस म्हणून जगण्याचा विश्वास दिला; तो या देशातल्या प्रत्येकालाच मिळावा आणि जातीपातीच्या पलीकडे जाऊन हा देश माणसांचा देश व्हावा हे स्वप्न सांगू पाहणारी धम्मपालची ही कविता आधुनिक वास्तवातील नवसंवेदनेचा प्रत्यय देते. ही हॉटेलची लाईन म्हणजे जातीपातीला क्षुद्र करणारी लाईन आहे, असा पुरेपूर आत्मविश्वास त्याला असल्याने या देशालाच हॉटेल बनविण्याचा आशावाद तो मांडतो...

*जिथं नसते जात*
*जिथं नसतो धर्म*
*जिथं नसतो पंथ*
*फक्त असतात माणसं*
*त्या माणसांचा देश*
*हॉटेल माझा देश.*

देशाबद्दलच्या प्रेमाच्या, आत्मीयतेच्या, उज्ज्वल इतिहासाच्या साऱ्या संकल्पनांच्या मर्यादा इथे स्पष्ट होतात. जात, धर्म आणि पंथ या तीन गोष्टी माणसांच्या वाटण्या करणाऱ्या ठरू शकतात. या तीन गोष्टींच्या आधारे माणसामाणसात अंतर निर्माण करता येते, माणसाच्या वृथा अस्मिता जागृत करता येतात, आपल्या स्वार्थासाठी माणसांचा समूह वापरता येतो, आपापसातली तेढ वाढवता येते, त्यांच्या आधारेच सत्तेपर्यंत पोचण्याचा



धम्मपाल रत्नाकर

धम्मपाल रत्नाकर

**जन्म :** १५ मार्च १९६६

**कविता**

लक्तरांची गझल, १९९४
सैतानाच्या खांबावर, २००३
हॉटेल माझा देश, २००५

एक मार्गही शोधता येतो आणि या तीन गोष्टींच्या आधारेच स्वत:च्या पुरोगामीपणाचा बेगडी मुखवटा सिद्ध करता येतो. मानसन्मानाचे मार्गही याच रस्त्यावरून जातात. पण या तिन्ही घटकांचा विलय करणारी आणि त्यात सूत्रबद्धता आणणारी संस्था म्हणजे हॉटेल! गंगाराम कांबळेला हॉटेल सुरू करायला लावून स्वत:च त्या हॉटेलमध्ये चहा घेणारे शाहू महाराज—ही महाराष्ट्रात एकेकाळी घडलेली घटना या कवितेच्या निर्मितीच्या मागे उभी असणारी शक्यता बनून जाते. एका व्यापक विचारांचे अधिष्ठान व्यक्तविणारी ही कविता नव्या काळातील डोळस आत्मभानाचा साक्षात्कार घडविते.

धम्मपाल रत्नाकरच्या या कवितेचा दुसऱ्या पातळीवर विचार करताना इथल्या दु:खाची वेगळी जातकुळी लक्षात घ्यावी लागते. वंचितांचे एक वेगळे जग सामर्थ्याने उभी करणारी ही कविता आहे. हे दु:ख आहे हॉटेलात काम करणाऱ्या कामगारांच्या वेदनांचे, अगतिकतेचे आणि व्यवस्थेमुळे वेश्या बनविलेल्या बाईमाणसांचे. त्यांच्याविषयी आपुलकी व्यक्त करणारी अर्पणपत्रिका या कवितेच्या आरंभीच वाचता येते आणि मग जुन्या विचारांची पाणथळ जागा पुसून नवी कोरडी जागा घेणाऱ्या कविता या संग्रहात शोधण्याशिवाय पर्याय राहत नाही. अशा कवितांमधून भेटणारी स्त्री वेगवेगळ्या रूपातली आहे. स्त्रीविषयीचे अनुभवही बोलके पण खोल वेदना देणारे—

*तुझ्या बोलण्यात अली-*
*-कडे भेटतो एक पुरुष*
*तुला गोंजारण्याऐवजी*
*छळताना दिसतो*
*खरकट्या पाण्यात तुला*
*खंगाळताना दिसतो*

*आपल्या स्वच्छ मैत्रीबद्दल*
*संशयताना दिसतो.*

असा एक अनुभव. दुसरा स्त्रीविषयक अनुभव आणखी वेगळ्या विश्वातला. संवेदना गोठवून टाकणारा. कॉटवर गिऱ्हाईकाला, पुरुषाला भोग देणारी वेश्या आणि त्याच कॉटखाली मात्र तिची असहाय्य महाभयंकर रोगाने पीडलेली मोठी बहीण. हा महाभयंकर रोग तिच्याशी दीर्घ संभोग करतोय असे कवीला वाटते. तिचं विव्हळणं चालू. तो आवाज वरच्यांना ऐकू येऊ नये म्हणून आपले तोंड ती गच्च दाबून घेते. आठ बाय आठच्या खोलीत एकाचवेळी तीन श्वासांची चालू असणारी घुसळण एक भेसूर नाट्य चित्रित करते. या वेदनांना दृश्यात्मक पातळीवर आणताना भोगापाठीमागे दडलेल्या वेदनांना गडद करणारा धम्मपाल रत्नाकर हा कवी ही वेगळी सहसंवेदना साकार करतो. 'कॉटखालची आणि कॉटवरची' यांचा जगण्याचा संघर्ष आतडे पिळवटून टाकणारा आहे. बेदरकार गिऱ्हाईकाला या जगण्याशी कोणतेच देणेघेणे लागत नाही.

*तो उघडे शरीर कपड्यात घुसवून*
*जातो वेगात निघून*
*ठरलेला दर भिकेसारखा*
*तिच्या हातात ठेवून*

*ती कॉटखालून कॉटवर येते*
*वरचीच्या गळ्यात पडते*
*तुझ्या गळा*
*माझ्या गळा*

*सोसू दोघीही कळा*
*सोसू दोघीही कळा*



'तुझ्या गळा माझ्या गळा'ची हॉटेल लाईनमध्ये काम करताना ऐकलेली धून इथे वेगळ्या संदर्भात येते आणि ताईदादाच्या नात्याचा वेगळा पदर कवीच्या अनुभवाला आकार देतो.

*पर्वा एक वेश्या दिसली रस्त्यात*
*ती मला 'दादा' म्हणायची*
*अन् मी तिला 'ताई'*



*मी फक्त हसलो उसने*
*नि बुळग्यासारखा भित्राभागुबाई बनून*
*पुढेच राहिलो चालत*
*पाठीमागे घुमत होता तिचा*
*कारुण्यगर्द आवाज*
*दादा ऽ ऽ दादा ऽ ऽ*

पोटासाठी, रोजीरोटीसाठी रेडलाईट एरियात घालवलेल्या दोनचार वर्षांच्या अनुभवातून या संग्रहातल्या काही कविता आकारलेल्या आहेत. त्या अनुभवाचे कितीएक कंगोरे कवीच्या शब्दांतून मोकळे होत जातात. वेश्या, बारबाला, रखेली, कॉलगर्ल आणि त्यांना कळसूत्री बाहुल्यांप्रमाणे नाचवणारी 'मावशी'. इथल्या वास्तवातील या दोन स्वतंत्र बाबी. पण—

*कुणाला उभे करावे*
*दोषाच्या गॅसशेगडीवर*
*दोघीही बळी व्यवस्थेच्या*

असा विचार करायला ही कविता प्रवृत्त करते. बारा महिने तेरा काळ छळाच्या तंदुरीत भाजल्या जाणाऱ्या बाईची विविध रूपे कविता वाचताना उलगडत येतात आणि वाचकांचे मन स्तब्ध बनून जाते. स्त्रीविषयक असणारी जाणीव व्यक्त होताना कोणतीही 'पोझ' न घेता मांडण्याचे कौशल्य धम्मपाल रत्नाकरकडे आहे, हे त्याचे आणखी एक वेगळेपण.

धम्मपालाने उभी केलेली माणसांची दुनिया वंचित, शोषित, पीडित घटकांमधली आहे. हॉटेलमध्ये बघितलेले, अनुभवलेले चेहरे तो विलक्षण वेगळेपणाने उभे करतो. या संपूर्ण कवितासंग्रहात हे सारेच चेहरे विखुरल्या अवस्थेत भेटतात. पण बारकाईने त्याची नोंद घ्यायचे ठरवले तर हे मानवी चेहरे आणि या चेहऱ्यांपाठीमागे लपलेली त्यांची वेदना आपोआपच मुखर होत जाते. काही अपवाद वजा केले तर या चेहऱ्यांना नावेही नाहीत. दु:ख झेलत राहणारा भलामोठा सामान्य माणसांचा स्तर धम्मपालच्या कवितेची उभीआडवी वीण अधिकच गडद करणारा आहे. धम्मपालच्या अल्पाक्षररमणीय कवितेत हे चेहरे त्यांच्या स्वधर्मासह उमटत राहतात. वेटरला पैसे मिळतात पण इज्जत मिळत नाही, असे सांगणारा भैरू बारमन, इज्जत किस बाप का नाम है, असा प्रश्न विचारणारा मोती, पेग भरून थेंब थेंब वाचवणारा मित्र, अपार जगण्याची इच्छा असूनही - बरा न होणारा आजार सोसणारा वेटर, नवरा अल्पवयातच मेल्याने स्टोअरमध्ये तांदूळ निवडणारी बाई (मावशी), हॉटेलात येणारा भाजीवाला ही हॉटेलविश्वातून चितारलेली माणसे त्यांच्या आर्थिक स्तरासह जिवंत होतात. श्रमजीवींच्या या स्पर्शाने ही कविता उंचीवर पोचते.

डोंबारवाड्यातला रोहिदास, मटकावाला पिंट्या, टकलू चाळमालक, अतृप्त भैया अशी माणसेही अधूनमधून या कवितेत भेटतात. जखमी होणारा गेटमन, नंदीबैलवाला, पोटाची खळगी भरण्यासाठी काम करणारी बारबाला यांच्याविषयीची कणव धम्मपालच्या कवितेतून प्रकटते. त्याला भेटायला येणारा स्टुअर्ड जॉनही या माणसांपैकीच एक. अपघातात त्याची

दोन मुले दगावली आहेत आणि बायकोही कॅन्सरने मेली आहे. दुःखितांशी नाळ जोडणारे कविमन इथे व्यक्त होते. त्यांच्या दुःखाशी समरस होत ही शब्दचित्रे आकाराला आलेली दिसतात. दिवसा माणसे वाचणारे आणि रात्री पुस्तके वाचणारे त्याचे शाळकरी सहकारी हा आशावादी स्वरही या कवितेत उमटलेला आहे. यातली बहुतेक सारी माणसे व्याकूळ आयुष्य जगणारी आहेत. त्यांना भेटण्यात आनंद मानणारे मन या कवितेतून उलगडते. मुख्य म्हणजे हे सारे हॉटेलकडूनच त्याला शिकायला मिळाले आहे.

*हॉटेलातल्या प्रत्येक*
*माणसाकडून*
*शिकलोय मी*
*माणसाजवळ जाणं*
*माणसाचाच होणं*

एका अर्थाने ही सारीच बिनचेहऱ्याची माणसे. कष्टकरी वर्गातली. मुकाट दुःख गिळत, पचवत पुढे जाऊ पाहणारी. धम्मपालची ही कविता या बिनचेहऱ्याच्या माणसांना स्वतःत सामावून घेणारी. विस्कटलेपण, तुटलेपण, फाटलेपण, पोखरलेपण याचा जिताजागता अनुभव घेतलेली ही माणसे वंचितांचे विश्व उभे करतात आणि त्यातून सहसंवेदनेचा परिघ विस्तृत होत जातो.

'हॉटेल' जगणे, हॉटेलात जगणे, हॉटेलमय होणे या पातळीवर अनुभवलेले जगणे जिवंत करणारी ही कविता. साहजिकंच हॉटेलशी निगडित असणारी दुःखे आणि हॉटेलशी निगडित असणाऱ्या प्रतिमा यामुळे या कवितेला बदलते संदर्भ मिळतात. तो स्वतःला कधी 'ॲश ट्रे' संबोधतो, स्वतःच्या चेहऱ्याला 'हॉटेल चेहरा' म्हणतो, तिथली मावशी त्याला 'खळ्ळकन् फुटलेल्या कपबशीसारखी हसताना' दिसते, 'कॅश पेड झालेल्या बिलासारखा' तो खुर्चीच्या टोच्यात बसतो, सार्वजनिक आयुष्य त्याला 'सार्वजनिक संडास-मुतारीसारखं' वाटतं, त्याला तिची आठवण येते तीही 'हॉटेलात नित्य येणाऱ्या गिऱ्हाईकासारखी' असते. तिने भेटायला नकार दिल्याचे ऐकून 'हॉटेलचा चेहरा पडतो', आतल्या आगीने तापलेला तिचा चेहरा त्याला 'फ्रायपॅनसारखा' भासतो, तो तिची वाट पाहतो तीही 'हॉटेलात नित्य येणाऱ्या गवळ्याच्या घागरीतील शुभ्र पौष्टिक दुधासारखी'. हॉटेलपासून दुरावल्यावर त्याला 'हॉटेलही परस्त्रीसारखे' वाटते. हॉटेलातल्या वस्तूंना आणि खुद्द हॉटेललाही मानवी चेहरा देणारी ही कविता त्याच्या अस्सल जाणिवेचे सूचन करते. ही बदलती शब्दकळा धम्मपालच्या कवितेचे बलस्थान आहे. तो या कवितेचा गाभा आहे. कारण या शब्दकळेतून हॉटेलचे विश्व चैतन्यमय होते. हॉटेल जिवंत होते. हॉटेलला माणूसपण मिळते. पण हॉटेलच्या या रूपात कारुण्याचे घडविलेले दर्शनही प्रत्ययकारी आहे. इथले त्याने सोसलेले 'अपमान' अनेकपदरी आहेत. काळीज कापणारे, डोळे फोडणारे, जीव मारून टाकणारे, आत्महत्येला प्रवृत्त करणारे. अशा अपमानांना पचवीत 'बिनलज्जी' प्रवास त्याने केला आहे. मोलाचे कष्ट असूनही कष्टाला मोल नाही, माणूस म्हणून जगण्याचे संदर्भ सापडत नाहीत, हरेक कामगाराच्या डोळ्यात असहाय्यतेचे अश्रू आहेत, बऱ्या न होणाऱ्या आजाराने विळखा घातलेल्या कामगारांचे, अपार जगण्याची इच्छा असलेल्यांचे हरवलेपण त्याने इथेच शोधले आहे. म्हणूनच—

*भाडोत्री घरातील असुरक्षित पाखरं*
*माझ्या अंगाखांद्यावर खेळताहेत*
*नित्यनव्या भीतीच्या काड्यांनी*
*नित्यनवी घरटी बांधताहेत*

असा जगण्याचा भयावह शोध धम्मपाल घेत राहतो. नाकारले जाण्याचा, एकाकी व उपेक्षित जगण्याचा, वंचित दलिताचा अनुभव पराकोटीच्या तीव्रतेने तो व्यक्त होतो.

*माणसानं माणसाला नाकारायचं संपलंय*
*कुठं अजून,*
*ते तर अधिकाधिक झालंय जून*

असा नवा संदर्भ त्याच्या अनुभवातून प्रकट होत जातो.

धम्मपालच्या आयुष्याचे संदर्भच त्याची कविता अधिक ठळक करते. हॉटेलात आणि चळवळीत दोन्हीतही असणारा तो, भूतकाळाच्या दिवसांना आठवू पाहतो. नामांतराचे आंदोलन, बाबासाहेबांच्या पुतळ्याची विटंबना, लाँगमार्च, संचारबंदी, अटक, स्वतःच्या सुटकेसाठी धडपडणारे नेते, काम संपल्यावर हात वर करणारे नेते तर दुसऱ्या बाजूला भीमगीतात चिंब भिजलेले कार्यकर्ते या त्याच्या हिंदकळणाऱ्या आठवणी दलित जाणिवेचे प्रत्यंतर देणाऱ्या आहेत. या चळवळीचे व अटकेचे कळल्यानंतर पोटाचा आधार असणारे हॉटेलही सुटले, हा दाहक अनुभव तो मांडतो.

पण त्यात वेदना अधिक, आक्रमकता कमी असते. धम्मपालचा कवी म्हणून असणारा पिंडधर्म काहीसा वेगळा आहे. हॉटेलने त्याला घडविले आहे... 'हॉटेल ग्लोबल इंडिया'ची मांडणी करणाऱ्या दोन कवितांमधून येणारे संदर्भ त्याच्या विचारप्रक्रियेवर प्रकाश टाकतात. त्याची समृद्ध जात व्यक्त करतात. एका सामान्यातल्या सामान्य माणसाच्या प्रतिक्रिया मांडण्याचा त्याचा हा प्रयत्न आहे. ६ डिसेंबर महापरिनिर्वाणदिन आणि बाबरी मशीद उद्ध्वस्त, अतिरेकी, सैनिक, सैनिकांची शवपेटी, सत्तेसाठीचा आटापिटा, निवडणूक या सर्वांविषयी बोलताना तिरकस आणि उपरोधिक



संदर्भ आहेत. नंदीबैलाच्या प्रतिमेतून हा उपरोध अधिक तीव्रतर होत जातो. या सामाजिक अनुभवाला पुन्हा तो हॉटेलशी जोडतो. झोपडपट्टी उठवून बांधले गेलेले हॉटेल, त्यातले मेनूकार्ड नव्या काळाच्या संवेदना व्यक्त करणारे आहे. माणसे बदलली, विचार बदलले, हॉटेलचे रूपही बदलले. हॉटेलही ग्लोबल झालेले. हॉटेल नावाच्या देशाची प्रतिमा इथे खऱ्या अर्थाने विस्तारते. एका बाजूला हॉटेल कामगारांचे वंचित राहण्याचे दुःख दुसऱ्या बाजूला माणुसकीशून्य समाजाकडून शोषले जाणारे स्त्रीत्व, तिसऱ्या बाजूला चळवळीतले भलेबुरे अनुभव, चौथ्या बाजूला मनात उमलणाऱ्या 'तिच्या' प्रतिमा आणि आता तर आवडो न आवडो ग्लोबल होणे अपरिहार्य असे वास्तव—या साऱ्यांना धम्मपाल उमटवतो ते हॉटेलच्या पार्श्वभूमीवर. हॉटेल विस्तारत जाते. हॉटेलच देश होते. तरीही त्याच्या मनात एकात्मतेच्या कल्पना पक्क्या आहेत.

इथली विषमता, इथले जात-धर्म-पंथ, माणसाला शुद्धाशुद्धतेच्या कल्पना लावणारा देश एकमेकांपासून तुटत चाललेला. तो नव्याने जोडण्याची संकल्पना धम्मपालच्या मनात आकारत जाते.

*म्हणून माझा नवा संकल्प*
*हा देश फोडायचा*
*नव्याने जोडायचा*
*हॉटेलसारखा घडवायचा*

नव्याने बांधणी करणारी, नव्याची निर्मिती अपेक्षिणारी, नव्याचा शोध घेणारी धम्मपालची दृष्टी दलित

कवितेच्या बदलत्या वळणाचेही सूचन करणारी आहे. डॉ. आंबेडकरांच्या विचारांचा प्रभाव पचवून माणुसकीच्या मूल्याला प्राधान्य देणारी रचना हेही या कवितेचे वैशिष्ट्य मानावे लागेल.

धम्मपालच्या कवितेला आणखी एक वेगळा आयाम आहे. पण तो विखुरल्या अवस्थेत कवितांमधून प्रकटलेला आहे. त्याची ही तीन उदाहरणे—

१. *हे हॉटेलशीच्या बाप्पा*
*तो काय करतोय ते*
*त्याला पूर्ण कळतंय*
*त्याच्यावर प्रेम कर*
*- हॉटेल ब्लेस यू जॉन*

२. *जात न पूछो दोस्त की*
*पूछो उसका प्यार*

३. *काय करावे आता*
*कोणीकडे जावे।*
*हॉटेलात पर्तावे*
*कोण्या बळे।।*

जुन्या परंपरेतील सत्त्वशील गोष्टींची जपणूक करण्याची दिशा या शब्दांमधून प्रकटते. जीझस ख्राईस्टचा प्रेममूलक धर्म, कबीराचा समतेचा धर्म आणि तुकोबांची परवड झालेल्या आयुष्याची वेदना जुन्या शब्दकळेचा आधार घेत पण आधुनिक संदर्भात इथे प्रकटते. जुने सारेच टाकाऊ नसते. त्या मुळातील गोष्टींवर काजळीची पुटे चढलेली असतात. ती पुटे दूर सारून ती परंपरा नव्या रूपात, नव्या शब्दात ध्वनित करण्याची ताकद धम्मपाल रत्नाकरच्या कवितेत आढळते. जीझस, कबीर आणि तुकाराम हे नव्या विचारांचे निर्माते आहेत. त्या नवविचारांच्या निर्मिती परंपरेशीच नाते जोडणारा हा कवी. या सर्वांचा परिपाक आणखी एका वेगळ्या संदर्भात प्रकटतो. तीही बदलाची, परिवर्तनाचीच परंपरा आहे—

*मी फुलासारखं उधळून टाकतो माझं*
*आयुष्य*
*अशोकचक्रावर*
*तिरंग्यावर*
*अशोकाने स्वीकारलेल्या बुद्धावर*
*बुद्धाच्या महान शिष्यावर*
*शिष्याच्या शिष्यांवर*

अशोकाचा बुद्धधर्मस्वीकार आणि डॉ. आंबेडकरांचे धर्मांतर आणि बुद्ध धम्माचा त्यांनी केलेला स्वीकार याचा संदर्भ गडद करणारी ही कविता. पण वास्तवातले चित्र कवीला वेगळे दिसते. हा देश माणसांना आणि घटनेला पायदळी तुडविणारा आहे. मग त्याला 'माझा देश' कसे म्हणायचे? हाच प्रश्न डॉ. आंबेडकरांच्या कार्यामागे आणि धम्मस्वीकारामागेही उभा होता. मानवी मूल्यांवरची अढळ श्रद्धा, मानव कल्याणाचा धर्म आणि अंतिमत: सर्व जाती-धर्म-पंथांमध्ये निर्माण करावयाची समता याकडे धम्मपालची कविता निर्देश करते. या अर्थानेही दलित जाणिवेचा समर्थ आविष्कार या कवितेत घडतो. दलित कवितेच्या 'मानवता' या अंतिम मूल्याकडे विशेष निर्देश करण्याचे सामर्थ्य तिच्यात आहे. कवीला ओढ आहे नवनिर्माणाची—

*मी निर्माण करतोय*
*एक नवा देश*
*समतेचं शुभ्र वस्त्र पांघरलेला*
*माणसांना तारणारा*
*माणसांना वाट दाखवणारा*
*माणुसकी पिकवणारा.*

स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या चिरंतन मूल्यांचा जिताजागता अनुभव हॉटेलात घेतल्याने तोच खरा देश आहे, याकडे ही कविता लक्ष वेधते. हे आत्मभानाचे रूप प्रकटविणारी धम्मपालची कविता कवितेच्या प्रांतात एक नवा आयाम निर्माण करते. सहसंवेदनेची ही जाणीव नव्या वळणाचे सूचन करणारी आणि जुने संकेत, जुन्या प्रतिमांना मोडीत काढीत स्वत:चा अनोखा रस्ता धुंडाळणारी आहे. म्हणूनच हे वळण महत्त्वाचे आहे. पण ते नुसतेच महत्त्वाचे नाही तर बदलत्या कवितेचा चेहरामोहरा कसा राहील याचे एक मासलेवाईक उदाहरण आहे.

# वाटसरू

## नावाचे कम्यून

प्रवीण चव्हाण

३० जानेवारी १९९८ रोजी *वाटसरू*चा पहिला अंक साताऱ्यामधून निघाला. या अंकाचे संपादक होते, अभय कांता. हा पहिला अंक केवळ एक पानाचा होता. पहिले पाच अंक एक पानाचेच होते. अनियतकालिक म्हणून सुरू होऊन अतिशय नियमितपणे निघणारे नियतकालिक म्हणून *वाटसरू*ने एक वेगळाच इतिहास निर्माण केला आहे. *परिवर्तनाच्या वाटसरू*चे २००६ हे सुरू झाल्यापासूनचे नववे वर्ष. अतिशय नियमितपणा हे *वाटसरू* महाराष्ट्रभर मान्यता पावण्याचे महत्त्वाचे कारण आहे. एखादे नियतकालिक वर्षभर चालवणेही किती कठीण काम असते हे आपण जाणतोच. मुळात *वाटसरू*ची सुरुवात झाली ती साताऱ्यात. सुरुवातीला केवळ ६० वर्गणीदार होते. त्यांना हे अंक घरपोच मिळत. म्हणजे हे अंक छापून आणल्यावर अभय कांता स्वत:च सर्वांच्या घरी नेऊन देत. अभय कांता यांना, अशा प्रकारचं नियतकालिक असावे असे तरी मुळात का वाटले असावे? पुण्यातून *श्रमिक विचार* निघत असे. ते बंद पडल्यानंतर एक प्रकारची अस्वस्थता सर्वच चळवळीमध्ये पसरली. *श्रमिक विचार*सारखे काहीतरी लोकांशी संवाद करणारे माध्यम सुरू करावे या विचारातून हे नियतकालिक सुरू झाले. सुरुवातीचे नाव *परिवर्तनाच्या वाटेवरील वाटसरू* आणि आता रजिस्ट्रेशननंतर पाक्षिक *परिवर्तनाचा वाटसरू*. *समाज प्रबोधन पत्रिके*सारखे अतिशय दर्जेदार असे संवादाचे माध्यम परिवर्तनवादी चळवळीमध्ये होते, परंतु त्याच्या स्वरूपापलीकडे जाऊन सामान्यांशी संवाद साधेल असे माध्यम म्हणून *वाटसरू* सुरू झाले. साताऱ्यातील कॉलेज विद्यार्थी, विमा कामगार संघटनेतील कर्मचारी, टेलिफोन युनियनमधील कर्मचारी, चळवळीच्या परिघावर असणारे, परंतु चळवळीविषयी आस्था असणारे, 'मध्यमवर्गीय' जगणं स्वीकारून प्रामाणिकपणे सामाजिक चळवळींना मदत करण्याची इच्छा असणारे असे सर्व *वाटसरू*चे सुरुवातीचे वाचक होते. अवघड विषय सोप्या पद्धतीने मांडण्यावर *वाटसरू*चा कायम भर राहिला; आणि आजही ती *वाटसरू*ची महत्त्वाची बाजू आहे. पहिल्या अंकाच्या संपादकीयामधून हीच भूमिका व्यक्त झाली आहे. वाचनीयता टिकवून ठेवणे हे तेव्हाही महत्त्वाचे होते आणि आताही महत्त्वाचे आहे. अतिशय

> नवा अंक कशासाठी हा प्रश्न प्रत्येकच नवीन अंकाच्या वेळी स्वाभाविकपणेच उभा राहतो. विशेषत: आर्थिक पाठबळ नसताना तर अंक काढूच नये हे उत्तम असा सल्ला मीच आजपर्यंत देत आलो आहे. तेव्हा हा उद्योग कशासाठी? यासाठी हा अंक काढण्यामागची भूमिका काय हा प्रश्न महत्त्वाचा ठरतो. धंदा करणे हा अर्थातच उद्देश नाही. तर आपण जे चळवळीत काम करणारे कार्यकर्ते आहोत किंवा निदान तसे समजतो त्यांना आपण काय करतो आहोत, का करतो आहोत, हेच करणे आवश्यक आहे का या विविध प्रश्नांच्याबद्दल स्पष्टता येणे ही माफक अपेक्षा आहे. आजकालच्या कार्यकर्त्यांचा (माझ्यासह) वाचन, अभ्यास याबाबतीतील दृष्टिकोनाबद्दल न लिहिणेच बरे! थोडक्यात महत्त्वाचे व सोप्या पद्धतीने जर काही चळवळीसंबंधीचे वैचारिक लेखन येऊ शकले तर ह्या अंकाचा काही उपयोग होईल असे वाटते.
>
> \- संपादकीय मनोगत



अभय कांता




साध्या साध्या वाटणाऱ्या विषयांमध्ये लपून बसलेला परिवर्तनवादी आशय, समतेच्या चळवळींना पूरक असणारा आशय पुढे आणण्याचे महत्त्वाचे काम *वाटसरूने* केले आहे. छोट्या छोट्या वाटणाऱ्या, कमी महत्त्वाच्या वाटणाऱ्या परंतु सामाजिक चळवळींना पूरक असणाऱ्या बातम्या, माहिती, विश्लेषणाला *वाटसरूने* नेहमीच जागा दिली; त्यात कोणताही कमीपणा मानला नाही. उदाहरणार्थ, तिसऱ्या अंकातच संपादकांचे आवाहन आढळते. ''ह्या अनियतकालिकासंदर्भात आपल्या सर्व सूचनांचे स्वागत आहे. अंक बंद करावा अशी सूचना असली तरी ती करण्यास बिचकू नये.'' ही लवचीकता, सर्वांचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी आवश्यक असणारी कमालीची सहनशीलता, सर्वांना आपले वाटावे असे व्यासपीठ करण्याची संपादकांची धडपड यांसारख्या अनेक घटकांमुळे *वाटसरू* वाढले. संख्यात्मकरित्या आणि गुणात्मकरित्याही! आपल्या दृष्टिकोनाबरोबर इतरांचाही दृष्टिकोन असू शकतो याचे भान ठेवून सर्व प्रकारचे 'आवाज' (Voices) ऐकण्याची गरज ही चळवळींना, —विशेषत: १९९१-९२ नंतर जागतिकीकरण स्वीकारल्यानंतर, बाबरी मशीद पडल्यानंतर—विशेषत्वाने जाणवत होती. *वाटसरूच्या* निमित्ताने त्याला एक आकार आला.

सुरुवातीला *वाटसरूचा* अंक ही फक्त साताऱ्यापुरती घटना होती. हळूहळू वर्गणीदारांची संख्या साठवरून तीनशेपर्यंत गेली. अर्थात वर्गणीचे कोष्टक अभय कांता यांनी अतिशय नेमक्या पद्धतीने राबवले. सर्वांना परवडेल अशीच वर्गणी. आणि एका वेळी फक्त दोन अंकांची वर्गणी भरायची : म्हणजे दहा रुपये. कारण दर अंक वाटपावेळी वाचक भेटणारच होते. त्यामुळे सुरुवातीच्या वर्गणीदारांसाठी किमान वर्गणी पाच रुपये आणि कमाल तीस रुपये. याचा परिणाम असा व्हायचा की पुढच्या एका अंकासाठीचे पैसे कायम तयार असायचे; अंक तोट्यात जायचा नाही. अंक असा सुरू राहिला. अंक बाहेरून डीटीपी करण्याचा प्रश्न नव्हता. घरीच कम्प्युटर असल्याने सर्व मॅटर डीटीपी, लेआऊट करून मग अभय कांता अंक प्रिंटिंगसाठी नेत होते. (खरे तर सप्टेंबर ९७ मध्ये अभय कांतांकडे कम्प्युटर आला आणि जानेवारी ९८ मध्ये वाटसरूचा पहिला अंक निघाला.) सुरुवातीला ३०० वर्गणीदार होईपर्यंत साताऱ्याबद्दलच अर्थात जास्त लिहून येई. विषय विविध होते - साताऱ्यातील राजघराणे आणि राजकारण (यावरचा 'छाप काटा कशाला करता? नाणंच बदलून टाका' हा लेख गाजला), बुद्धिबळ स्पर्धा, चित्रपटावरील चर्चा, ब्रेख्तच्या कविता, 'पुरुषांनी बनवलेला डाळभात खाऊन करंज्यातील महिलांनी साजरा केला ८ मार्च' यांसारख्या विषयांबरोबरच आ. ह. साळुंखे-सदानंद मोरे यांच्यातील 'विद्रोही तुकाराम' वर झालेला वाद आणि त्यावरील विविध प्रतिक्रिया यांनाही *वाटसरूने* जागा दिली. साताऱ्यातील सामाजिक चळवळी तसेच विविध प्रकारच्या सामाजिक, सांस्कृतिक घडामोडींची प्रक्रिया याभोवती *वाटसरू* उभे राहत गेले. सर्व तीनशे वर्गणीदार साताऱ्यातील होते. त्यांना ही अंकसेवा घरपोच मिळत असे. त्यामुळे तीनशे जणांशी अभय कांता यांचा संवाद वाढला. त्यांच्या घरच्यांशी, कुटुंबाशीही संबंध येत राहिला. या सर्वांमधून *वाटसरूबद्दल* एक जिव्हाळा निर्माण झाला. *वाटसरू* म्हणजे एक प्रकारचे कम्यून झाले; अर्थात यात अभय कांता यांच्या व्यक्तिमत्त्वाचा मोठा भाग होताच. साताऱ्यातील लोक आजही वाटसरूबद्दल प्रेमाने बोलताना हेच



म्हणतात, 'आज *वाटसरू* महाराष्ट्रभर पसरलेले असले, कितीही व्यापक झालेले असले तरी *वाटसरू* साताऱ्याचा आहे, आमचा आहे. आम्हाला त्याच्याबद्दल कायम जिव्हाळा राहणारच.' 'सातारची परिवर्तनवादी चळवळ' हा १५ ऑगस्ट १९९८ चा विशेषांक एका अर्थाने महाराष्ट्रभरातील परिवर्तनवादी चळवळींविषयीचेच चिंतन होते. जागतिकीकरणानंतर निर्माण झालेली परिस्थिती, बाबरी-पतन, भूछत्रासारख्या वाढलेल्या एनजीओ, चळवळींमधील अस्ताव्यस्तता याचा विचार या निमित्ताने पुढे आला. पार्थ पोळके, नरेंद्र दाभोलकर, शिवाजी राऊत, किशोर बेडकिहाळ, दिनकर झिंब्रे यांच्या मुलाखती या विशेषांकातून प्रकाशित झाल्या. समाजवादी युवक दलाच्या कामापासून विविध संस्थात्मक कामापर्यंतच्या अनेक बाबींचा यामध्ये विचार आढळतो.



*वाटसरू* साताऱ्यातून पुण्यात २००० साली आले. साताऱ्यातील वाचकांना *वाटसरू* आता 'पुणे-मुंबई टाइप' होऊन जाईल असे वाटत होते. परंतु तसे न होता संपूर्ण महाराष्ट्रातील वाचकांना समोर ठेवून *वाटसरू*चे अंक निघत राहिले. अर्थात साताऱ्यात असतानाही छपाई लगेच होते म्हणून काही काळ अभय कांता पुण्यात अंकाची छपाई करून घेऊन त्याचे वाटप साताऱ्यात करीत होते. दिवाळी अंक-१९९९ अशाच प्रकारे पुण्यातून काढला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर अकादमीच्या वतीने घेतलेल्या साहित्यचर्चा व त्यातील शोधनिबंध *वाटसरू*मधून प्रकाशित झाले. 'लोकप्रिय मराठी साहित्य' या विषयावरील शोधनिबंध दिवाळी अंकात प्रकाशित झाले. आज हा अंक शिवाजी विद्यापीठ - मराठी विभागाने संदर्भवाचन साहित्य म्हणून अभ्यासक्रमाचा भाग करून घेतला आहे. या प्रकारचे शोधनिबंध जसे प्रकाशित केले तसे साध्या साध्या चर्चेतील साधे साधे विषय घेऊन अनेक नवीन विद्यार्थी, तरुण-तरुणींना लिहायला पाठबळ दिले, प्रोत्साहन दिले. किशोर बेडकिहाळ, प्रमोद कोपर्डे, भा. ल. भोळे, आ. ह. साळुंखे, वसंत आबाजी डहाके, सदानंद मोरे, सुहास पळशीकर, विद्युत भागवत, दीनानाथ मनोहर यांसारख्या ज्येष्ठांचे लेखन जसे प्रकाशित केले, तसेच अनेक नव्याने लिहिणाऱ्यांना (उदा. चंपत बोड्डेवार, पद्मपाणी सवई) अभिव्यक्तीसाठी जागा दिली. एका अर्थाने आज सराईतपणे लिहिणाऱ्यांना *वाटसरू*ने लिहिण्याची वाट मोकळी करून दिली.

सलग तीन वर्षे अंक सुरू राहिल्यावर वाचकांना *वाटसरू*बद्दल विश्वास वाटू लागला आणि त्यानंतर केवळ पुढच्या अंकापुरती वर्गणी गोळा न होता वार्षिक सभासद वर्गणी गोळा होऊ लागली. वर्षाचे पैसे एकदम आल्यामुळे काही वेळा अंकाचे आर्थिक गणित चुकू लागले. अंक तोट्यात जाऊ नये यासाठी सतत वर्गणीदार मिळवणे आणि आर्थिक गणित सतत सिद्ध करत राहणे यातून काही वेळा दमछाक होऊ लागली. अंक वाचकांना वेळेत पोहचला पाहिजे यासाठी सतत धडपड करावी लागली. पोस्टाचे रजिस्ट्रेशन मिळाल्यानंतर अंक महाराष्ट्रभर पोहचू लागला. अंक वेळेत डिलीव्हर झाला पाहिजे म्हणून कल्पना, मुक्ता, अच्युत, विनायक, आयेशाबी, ममी, अरुण गवळी अशी अभय कांतांची मित्रमंडळी कमालीची प्रयत्नशील

राहिली. २०००नंतर अंक महाराष्ट्रातील जवळ जवळ सर्व जिल्ह्यांमध्ये जाऊ लागला. हा प्रसार होण्यासाठी मसूरच्या बच्चुभाई शहांपासून 'शब्दालय'च्या सुमती लांडेंपर्यंत अनेकांनी स्वत:चा अंक समजून अतिशय जिव्हाळ्याने मदत केली. मुख्यत: जुन्या वर्गणीदारांची वर्गणी गोळा करणे, नवीन वर्गणीदार करून घेणे अशी कामे अनेक व्यक्तींनी केली. त्यात प्राध्यापक, विद्यार्थी, पत्रकार, व्यापारी, कार्यकर्ते, वकील अशा विविध स्तरांवरले प्रतिनिधी होते. सामाजिक चळवळींविषयी आस्था असणाऱ्यांना, परंतु आज चळवळीच्या परिघावर आलेल्यांना/असलेल्यांना *वाटसरू*ने वाचक केले. तसेच चळवळच परिघावर आली आहे, हेही लक्षात घेऊन कार्यकर्त्यांचा अस्वस्थपणा, निराशा, उदासीनता, परस्परातील हेवेदावे या सर्वांचा विचार करून *वाटसरू*ने आपले स्वरूप व्यापक सर्वसमावेशक ठेवले. काही जणांना *वाटसरू*चा हा दृष्टिकोन उदारमतवादी वाटला. काही जणांनी 'कोणत्याही




"आज परिवर्तनवादी चळवळीची नेमकी अवस्था कशी आहे, तिची स्थिती-गती नेमकी कशी आहे, परिस्थितीची कोणती आव्हाने चळवळीपुढे आहेत, त्यात कार्यरत असणारे विविध गट, व्यक्ती, संस्था, प्रवाह या आव्हानांना कसा प्रतिसाद देतात; थोडक्यात आज आपण 'चळवळ' कशाला म्हणतो हे जाणून घेण्याची गरज वाटू लागली आहे. आजच्या कठीण परिस्थितीत चळवळ टिकून राहण्यासाठीही बराच झगडा द्यावा लागत आहे. परिस्थितीशी आणि स्वत:शीही!"

— 'संपादकीय'मधून
वर्ष १, अंक ११

निश्चित विचारसरणीचा नसलेला *वाटसरू* असे त्यावर स्टॅम्पिंग केले. सर्वांना सामावून घेण्याच्या *वाटसरू*च्या तळमळीमुळे या प्रकारच्या टीकेला सामावून घेत, आपले स्वरूप सुरुवातीपासून 'सर्वसमावेशक' असेच ठेवले. आज काही अभ्यासक, कार्यकर्ते त्याला 'डाव्या चळवळींचे मुखपत्र' असेही संबोधतात. आजही, डाव्या चळवळीच्या अनेक प्रवाहांनी एकत्र येऊन दैनिक सुरू केले आणि त्यामुळे *वाटसरू*ची गरज उरली नाही तर *वाटसरू* बंद करायला काहीच हरकत नाही असे संपादक अभय कांता स्पष्टपणे सांगतात.

समकालीन वास्तवाला सामोरे जायला *वाटसरू*ने शिकविले. एकाच घटनेला अनेक बाजू असू शकतात आणि त्या समजावून घेतल्या तर एक वेगळेच 'वास्तव' तुम्हाला समजू शकते, याची जाणीव *वाटसरू*ने करून दिली. त्यामुळेही नवीन वाचक *वाटसरू*कडे वळले. मसूरच्या बच्चूभाई शहा यांच्या मते *वाटसरू*ने त्यांना जैन परंपरेतला 'सप्तभंगी न्याय'च शिकवला आहे. त्याच्या सर्वसमावेशक आणि व्यापक स्वरूपाला काही वेळा भोंगळ असेही संबोधले गेले. परंतु समतेच्या चळवळीवर निष्ठा ठेवणाऱ्यांना, डाव्या चळवळीतील सर्व प्रकारच्या विचारप्रवाहांना अभिव्यक्ती करता येईल असे व्यासपीठ म्हणजे *वाटसरू* हे त्याचे स्वरूप ह्या सर्व प्रकारच्या टीकेनंतरही वाचकांमध्ये टिकून राहिले. क्वचित प्रसंगी 'हा अंक आमच्या आचारविचारांशी न जुळणारा आहे त्यामुळे तो बंद करा, पाठवू नका, असे सांगणारेही भेटले. *वाटसरू*ने ह्या सर्वांचे म्हणणे ऐकले. इथे आपलेपणाने लेख छापून येतात, त्यावर वाद, चर्चा होतात. कविता, कथा, नाटक, कादंबरी यांसारख्या ललितप्रकारांपासून, वधू-वर जाहिराती, निरनिराळे वाद, रोहयोपर्यंतचे सर्व विषय इथे हाताळले जातात आणि त्यातला 'मेसेज' वाचकांपर्यंत



पोहचतो—'मेसेज'चा आग्रह न धरता—ही वाचकांच्या दृष्टीने महत्त्वाची बाब होती. मराठी साहित्य याकडेही चळवळीमध्ये पारंपरिकरित्या ज्या प्रकारे पाहिले जाते, तसा विचार न करता नव्याने साहित्य लेखन करणाऱ्यांना व्यासपीठ निर्माण झाले. सर्व प्रकारच्या विधायक टीकेचे *वाटसरू*ने स्वागत केले. वैचारिकता सोप्या, सर्वांना समजेल अशा भाषेत मांडण्याला कायमच प्राधान्य दिले. साहित्य, कला, समाजकारण, जमातवाद, हिंदू-मुस्लीम प्रश्न, अर्थकारण, समकालीन प्रश्न, आंतरराष्ट्रीय संबंध, राज्यसंस्था, नागरीसमाज, स्त्रीवाद, दलित चळवळ, अनुवादित साहित्य—विशेषत: उर्दूतील अनुवाद—पुस्तक परीक्षण अशा अनेक प्रकारांना *वाटसरू*ने प्रकाशित केले. *वाटसरू*मध्ये कोणालाही लिहिता येऊ शकते हा आत्मविश्वास नव्याने लिहिणाऱ्यांना *वाटसरू*ने दिला.

सतत प्रयोगशील राहणे, नवनवे प्रयोग करणे हेही *वाटसरू*च्या सातत्यपूर्ण अस्तित्वाचे महत्त्वाचे कारण आहे. अर्थात हे प्रयोग करण्यासाठी अभय कांता यांना संपादक मंडळ म्हणून राजन कुंभार, श्रीधर चैतन्य, कल्पना दीक्षित, प्रवीण चव्हाण, अजित साळुंखे यांची साताऱ्यात मदत झाली. पुण्यामध्ये आल्यावर दीनानाथ मनोहर, मुक्ता कुलकर्णी यांनी संपादकीय कामात मदत केली. अजूनही डीटीपी, लेआऊटचे काम स्वत: अभय कांता करतात. कोणत्याही प्रकारचे प्रयोग झाले तरी वाचकांना अंक वेळेत वाचायला देणे *वाटसरू*ला कायमच महत्त्वाचे वाटते. पुण्यात कार्यालय झाल्यावर अंकप्रसारासाठी, लोकांपर्यंत जाण्यासाठी निरनिराळ्या ठिकाणी—विशेषत: सातारा, पुणे, मुंबई येथे—*वाटसरू*ने वाचक मेळावे भरवले. वाचकांच्या प्रतिक्रिया जाणून घेतल्या. त्रुटी कमी करण्याचा प्रयत्न केला. आ. ह. साळुंखे-वसंत पळशीकर, साळुंखे-दाभोलकर यांसारखे वाद किंवा 'बुरख्यासह बुरख्याविना'साठी विद्युत भागवत, गीताली वि. म., रझिया पटेल, आयेशाबी, नसीम देशमुख यांचे लेखन, मुस्लीम मध्यमवर्गासंदर्भात राजेंद्र व्होरा, बशारत अहमद यांनी केलेले लेखन, भांडारकरांच्या निमित्ताने झालेले लेखन यांसारखे अनेक स्तरांवरचे लेखन, वाद वाचकांपर्यंत पोहचवले. वैचारिक वादांमुळे व्यक्तींविषयी कोणताही आकस, द्वेष वाचकांच्या मनात निर्माण होणार नाही याकडे *वाटसरू*ने आवर्जून लक्ष दिले. मग ते शिवाजी विद्यापीठातील धनागरे प्रकरण असो की साताऱ्यातील पवनचक्क्यांचा वाद असो किंवा 'भीमशक्ती-शिवशक्ती' एकत्रीकरणाची झालेली चर्चा असो, शिवधर्मावरील संवाद—विसंवाद असो, वादविवाद, चर्चा निकोप पद्धतीने पुढे जावेत हीच *वाटसरू*ची भूमिका राहिली. भांडारकर, मुंबई रेझिस्टन्स, वर्ल्ड सोशल फोरम असा कोणताही वाद असो, *वाटसरू*ने सर्वांच्या भूमिका आपल्या माध्यमातून चळवळीपुढे मांडल्या. त्यातून काही वेळा भूमिका मांडणाऱ्यांनाही आपल्या भूमिका तपासून घेण्याची गरज वाटू लागली. *वाटसरू*ची स्वत:ची अशी कोणतीच भूमिका नाही का असाही प्रश्न विचारला गेला. काही वेळा *वाटसरू*ने आपली भूमिका संपादकीयामधून मांडली. 'पर्यायी चळवळी'पुढे निरनिराळ्या प्रकारची 'वास्तवे' आणणे हे *वाटसरू*ने आपले ध्येय मानले.



जागतिकीकरणानंतर बदललेल्या परिस्थितीकडे पाहण्यासाठी आवश्यक दृष्टी देण्याचा प्रयत्न *वाटसरू*ने केला. त्याचबरोबर बाबरी मशीद पाडल्यानंतर, मुंबई दंगलीनंतर मुस्लिमांकडे बघण्याची दृष्टी बदलली. *वाटसरू*ने मुस्लीम प्रश्नाची पारंपरिक

पद्धतीने चर्चा कधीच केली नाही. मुस्लीम सत्यशोधक मंडळापेक्षा वेगळ्या पद्धतीने मुस्लिमांचा पुरोगामी विचार करता येतो हे *वाटसरूने* आपल्या निरनिराळ्या लेखांमधून दाखवून दिले. सुहास पळशीकरांनी मुस्लीम प्रश्नाची केलेली चर्चा, त्यावर फक्रुद्दीन बेन्नूर, बशारद अहमद, बशीर मुजावर, नसीम देशमुख यांचे लेखन, रझिया पटेलांचे फाळणीबद्दलचे लेखन यातून मुस्लीम प्रश्नाकडे वेगळ्या पद्धतीने सामाजिक चळवळींना पाहायला लावणे हे *वाटसरूने* दिलेले योगदान म्हणता येईल. गुजरात दंगलीनंतरही मुख्य मीडियामध्ये नसणाऱ्या बऱ्याच बातम्या *वाटसरूमधून* पुढे आल्या. यावेळी अनेक मुस्लिमांनी, *वाटसरूचा* आपणाला आधार वाटतो असे सांगितले. मुस्लीम प्रश्नाच्या संदर्भात *वाटसरूने* एक महत्त्वाची भूमिका (आकलन पुढे नेण्याच्या दृष्टीने) बजावली आहे. त्याचबरोबर निरनिराळ्या विचारप्रवाहांच्या लोकांशी जोडून घेण्याचा प्रयत्न *वाटसरूने* केला आहे. आगरकर प्रतिष्ठानने *वाटसरूला* महाराष्ट्रातील पत्रकारांना सभासद करून घेण्यासाठी २५० अंकांच्या निर्मितीचा एक वर्षाचा खर्च देऊ केला. त्यामधून *वाटसरूने* महाराष्ट्रातील पाचशे पत्रकारांसाठी दोन वर्ष विनामूल्य अंक दिला.

निरनिराळ्या कार्यक्रमांच्या ठिकाणी नवीन वर्गणीदार करणे, अंकांची विक्री करणे, स्टॉल लावणे अशा बाह्य गोष्टींपासून व्यवस्थापनापर्यंत, आर्थिक नियोजनापर्यंत अनेक घटकांकडे गेल्या दोन वर्षांत *वाटसरूने* लक्ष दिले आहे.

*... या संदर्भात महाराष्ट्रातील शेतीचे उदाहरण बोलके आहे. अपुरे सिंचन ही महाराष्ट्रातील शेतीच्या समस्यांपैकी एक कळीची समस्या. यावर मात करण्यासाठी सरकारने वेळोवेळी तज्ज्ञ लोकांचा समावेश असणारे आयोग स्थापन केले. या आयोगांनी महाराष्ट्राची भौगोलिक परिस्थिती, पर्जन्यमान, लोकसंख्येची गरज या गोष्टी लक्षात घेऊन पाण्याचे शास्त्रीय नियोजन करण्यासाठी अनेक उपयुक्त सूचना केल्या. यामध्ये पाण्याचे वाटप हा नेहमीच महत्त्वाचा मुद्दा राहिला. उपलब्ध पाण्याचे वाटप मोजून केल्यास राज्यातील ६० टक्के जमीन सिंचनाखाली येऊ शकेल, असे चितळे आयोगाने सुचविले होते. १९६२ साली स्थापन केलेल्या बर्वे आयोगाने तेव्हाच सिंचन प्रकल्पांच्या लाभक्षेत्रात पाण्याचे वाटप समन्यायी पद्धतीने करण्याची गरज मांडली होती. कोरडवाहू शेतकऱ्याला किमान सुरक्षितता देण्याच्या दृष्टीने कळीच्या असणाऱ्या या शिफारशींकडे शासनाने संपूर्ण दुर्लक्ष केले. आजही महाराष्ट्रातील फक्त १४.५ टक्के जमीन सिंचित आहे. जे उपाय करणे आपल्याला शक्य आहे ते करायचे नाहीत, वर्षानुवर्षे लाखो शेतकऱ्यांच्या हिताच्या विरोधी धोरणे राबवीत राहायचे आणि प्रश्नाने गंभीर स्वरूप धारण केले की त्याचा राजकीय फटका बसू नये म्हणून पॅकेजेस जाहीर करायची अशी शासनाची खेळी आहे.*

— संपादकीय

अंक दिसायला कसा असावा, त्याचे मुखपृष्ठ कसे असावे, एकूण अंकाची मांडणी कशी असावी याकडे दुर्लक्ष होता कामा नये. अंकामध्ये मोकळी जागासुद्धा वाचली जाते याचे भान ठेवून अंक काढला पाहिजे हे दिलीप भंडारे, मेहबूब शेख, संदेश भंडारे यांच्यासारख्या कलेची जाण आणि अभ्यास असणाऱ्या मंडळींनी लक्षात आणून दिले. विद्या कुलकर्णींच्या 'बिनमोलश्रमा'च्या छायाचित्र मालिकेतील एका फोटोचा वापर *वाटसरूच्या* अंकावर मुखपृष्ठ म्हणून झाला. आणि त्यानंतर निरनिराळे फोटो, त्यांतील सामाजिक, सांस्कृतिक संकेतांना घेऊन *वाटसरूच्या* मुखपृष्ठावर दिसू लागले. आजही अंक आकर्षकपणे काढणे म्हणजे कमर्शिअल होणे असे बऱ्याच जणांना वाटते. आकर्षक अंकाबरोबर तो तोट्यामध्ये न चालता सर्वत्र पोहचला पाहिजे. *ईपीडब्ल्यू* की *फ्रंटलाईन* - कोणत्या स्वरूपात *वाटसरूने* आपले मॉडेल स्वीकारावे यासारखी चर्चा संपादक मंडळामध्ये आणि हितचिंतकांमध्ये होत असते. कोणत्याही दिशेने गेले तरी योग्य व्यवस्थापन हवेच आहे. माधवी राहिरकरांनी हिशेब, पत्रव्यवहारापासून, तांत्रिक व्यवस्थापनापर्यंतच्या अनेक बाबींना गती दिली आहे. तसेच कोणतीही बाब वेळेत पूर्ण केली तर आर्थिक नियोजनही किफायतशीर होऊ शकते हे *वाटसरूला* त्यांनी दाखवले. *वाटसरूचे* सल्लागार-हितचिंतक संजीव चांदोरकर म्हणतात, "परिवर्तनाचा माल वाहून नेणाऱ्या ट्रककडे संपूर्ण दुर्लक्ष होते. ट्रकचे योग्य व्यवस्थापन असेल तर ट्रक आणि माल दोन्ही

दीर्घकाळ पुढे जात राहील; अन्यथा ट्रक लवकर बाद होईल.'' याच प्रकारे *वाटसरू*च्या जुन्या वर्गणीदारांची वर्गणी संपली की ताबडतोब मिळवली पाहिजे. हे काम वेगात पूर्ण केले तर पूर्णपणे यशस्वी होऊ शकते; तसेच नव्याने वर्गणीदारापर्यंत जाण्यासाठीही मग उत्साह येतो हे दिलीप चव्हाणांनी अहमदनगर जिल्ह्यात *वाटसरू*चे नेमके नियोजन करून दाखवून दिले आहे. आर्थिक आणि वेळेचे नियोजन लक्षात घेऊन, *वाटसरू*ने ईद आणि दीपावलीचे 'ई-दीपावली' अंक प्रभावीरित्या काढले आहेत. *वाटसरू*ने केलेल्या प्रयोगांमध्ये महत्त्वाचे सांगता येतील असे प्रयोग म्हणजे *स्त्रीवृत्त* या नियतकालिकाबरोबर संयुक्तरित्या काढलेले *वाटसरू-स्त्रीवृत्त*चे अंक. मंगला सामंत ह्या *स्त्री-वृत्त*च्या संपादक. असे काही अंक काढल्यानंतर *वाटसरू*मध्ये लता भिसे यांच्या संपादनाखाली 'साथीन' विभाग सुरू झाला. साथीनमधून 'स्त्रियांचे श्रम', 'बायांच्या आत्महत्या : काही संदर्भ', 'पुराणकथांतील स्त्री प्रतिमा', 'उर्मिला




पवारांची कथा' अशा काही विषयांवर लेखन आले. 'साथीन'चा हा प्रयोग काही काळ टिकला. त्यानंतर २५ डिसेंबर या भारतीय स्त्रीमुक्ती दिनादिवशी *वाटसरू*ने 'स्त्री चळवळीचे वर्गीय स्वरूप' समजावून घेणारा अंक काढला. विद्युत भागवतांच्या संपादनाखाली 'मिटलेली कवाडे खुलताना' हा दलित स्त्रीवाद स्पष्ट करणारा अंक ८ मार्चच्या निमित्ताने प्रकाशित केला. 'दलित स्त्रीला केंद्रस्थानी ठेवून स्त्री-प्रश्नाची नवीन मांडणी करता येईल आणि सर्व




माणसांच्या मुक्तीचा खरा संघर्ष उभा राहील' असा दृष्टिकोन असणारा हा अंक होता. त्याचबरोबर जागतिकीकरणाच्या संदर्भात स्त्री चळवळ समजावून घेणारा विशेषांकही प्रकाशित केला. जागतिकीकरणाच्या काळात लिंगभावाचा अवकाश का घटत गेला याची कारणमीमांसा करणारा हा अंक होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त काढलेल्या 'भीमशक्ती आणि शिवशक्ती'या विषयावरच्या अंकात




हिंदुत्व आणि दलितत्व यातील परस्परसंबंध तपासला गेला. हा अंकही महाराष्ट्रात लोकप्रिय झाला. गुजरातनंतरच्या आत्महत्यांसारखे विषय *वाटसरू*ने हाताळले. भांडारकरच्या निमित्तानेही *वाटसरू*चे अंक महाराष्ट्रभर वाद, चर्चा घडवून आणत होते.

शहरबानो यांच्या गजलांचा कार्यक्रम, *मन्वंतर* या दीनानाथ मनोहरांच्या कादंबरीचे प्रकाशन, *अभिसरण* या कादंबरीचे प्रकाशन, *आनंदओवरी* नाटकाचा प्रयोग आणि चर्चा, युनिक ॲकॅडमीबरोबर *भडास* कादंबरीवर परिसंवाद अशा स्वरूपातही *वाटसरू*ने आपले क्षितिज व्यापक केले.

*वाटसरू* सुरू झाल्यापासून म्हणजे सलग नऊ वर्षे कोणत्याही लेखकांनी मानधन घेतले नाही; किंबहुना लेखन करणाऱ्यांचा तसा विचारही नसतो. एका पानापासून पाच-सहा पानांपर्यंतचे लेख प्रकाशित होत राहिले. लेखनाचे विषय अर्थातच भिन्न भिन्न राहिले. कधी तत्कालीन तर कधी निरनिराळ्या सामाजिक शास्त्रांमधले विषय लेखांद्वारे पुढे आले. दिनकर झिंब्रे यांचे 'बेरकी

बायजा' आणि सुभाष थोरातांचे 'हजेरी' ही सदरे शैलीसाठी अतिशय लोकप्रिय झाली. विश्वास दांडेकरांचे 'इतिहासनामा' कॉलेज, विद्यापीठातल्या विद्यार्थ्यांकडून वाचले गेले. तालुका, जिल्हा पातळीवर 'वैद्यककोश' नियमित वाचला जातो. *वाटसरू*मधून प्रदीर्घ काळ दर्जेदार, विश्लेषणपर लेखन करणाऱ्या सुहास पळशीकरांचे 'अर्थ आणि अन्वय' हे सदरही अतिशय उत्सुकतेने वाचले गेले.

राजकीयप्रणालींचा वास्तवाचा अन्वय आणि अर्थ समजावून देणारे हे सदर सर्वच थरांमध्ये वाचले जात होते, आहे. याशिवाय रा. वि. भुस्कुटे, मेघना पेठे, चित्रा बेडेकर, राजीव कालेलकर, अजित साळुंखे, गीतांजली सुहास, देवदत्त दाभोळकर, कॉ. प्रभाकर महाबळेश्वरकर, म. अ. शेख, ओंकार पाटील, अन्वर राजन, राजन कुंभार अशा विविध क्षेत्रांतील व्यक्तींनी लेखन केले. गणेश विसपुते, डॉ. राजश्री देशपांडे यांनी सातत्याने कवितालेखन केले. वसंत पळशीकर, भीमराव बनसोड, प्रमोद कोपर्डे, फक्रुद्दीन बेन्नूर, विद्युत भागवत, शरद पाटील, गो. पु. देशपांडे यांनीही लेखन केले. या लेखकांचे वाचन करणारा असा एक खास वाचकवर्ग *वाटसरू*मधून तयार झाला. अतिशय निरनिराळ्या स्तरावरच्या वाचकांसाठी *वाटसरूने* काहीतरी देण्याचा प्रयत्न केला आहे. तरीसुद्धा, अर्थकारणावर (Economy) ज्याप्रमाणात लिखाण *वाटसरू*मधून व्हायला पाहिजे तितके होत नाही. ह्यासारख्या मर्यादा लक्षात घेऊनही असे म्हणता येते की, लोकांच्या संवेदनशीलतेला आकार देणे, जागे ठेवणे हे महत्त्वाचे काम *वाटसरूने* केले आहे. निरनिराळ्या प्रतिक्रियांचे *वाटसरूने* स्वागतच केले. अंकाविषयीचे लोकांना वाटणारे आपलेपण *वाटसरूने* अतिशय प्रयत्नपूर्वक जपले. चांगल्या, वाईट सर्व प्रतिक्रियांना स्थान दिले.

बऱ्याच वेळा आपण जे काम करतो त्यावरचा विश्वास उडू लागतो; खरेच अशा प्रकारची नियतकालिके चालवून चळवळींना फरक पडतो का? अशी पाक्षिके काढत बसल्यावर मग चळवळीचे मुख्य काम कधी करायचे?

*अमेरिकेशी केलेला अणुऊर्जा करार ही बाब या सरकारचं परराष्ट्र धोरणातलं यश म्हणून मिरवलं जात आहे. मात्र ही अणुऊर्जा घेत असताना, त्यासाठीचा खर्च, पर्यावरणीय धोके, त्याला उपलब्ध असलेले इतर पर्याय यांविषयी काहीही चर्चा न करता अतिशय गुप्ततेने तो निर्णय घेण्यात आला. या कराराला कोणत्याही कारणानं प्रश्न विचारणाऱ्याला 'देशद्रोही' ठरवण्यात येत होतं. मात्र हा करार केल्यावर आपण अमेरिकेच्या मांडलिक राष्ट्रासारखं वागणार नाही ही खबरदारी घ्यायला हवी. इराणशी असणारा गॅस पाईपलाईनचा प्रकल्पही ठामपणाने पुढे रेटायला हवा. नाहीतर आपल्या बहुध्रुवीय जग, सार्वभौमत्व, अलिप्ततावाद यांविषयीच्या गप्पांना तोंडाची वाफ दवडली याखेरीज फारसा अर्थ उरणार नाही!*

— संपादकीय

काही झाले तरी हे चळवळीच्या परिघावरचे काम आहे. याला कसे आणि किती महत्त्व द्यायचे? हा अग्रक्रमाचा भाग म्हणून किती काळ अजेंड्यावर ठेवायचा? असे अनेक न संपणारे प्रश्न *वाटसरू*च्या संपादकांना आणि त्यांच्याबरोबर कार्यरत असणाऱ्यांना पडत असणार. प्रश्न असा आहे की *वाटसरूने* खरेच काय दिले? विशेषत: १९९१-९२ नंतरची भारतातली परिस्थिती, जागतिकीकरणानंतरची डाव्या विचारांची पडझड भारतभर झाली. यातून स्वत:ला टिकवून ठेवणे हे एक आव्हान होऊन बसले. ज्या काळाशी आपण झटापट करत आहोत त्याच काळाचे अपत्य म्हणून *वाटसरू*कडे पाहता येते. स्वत:शी संवाद करण्याचे आणि इतरांशी संवाद साधण्याचे साधन म्हणून *वाटसरू*चे महत्त्व निर्विवाद आहे. आणि कोणत्याही अर्थाने तुम्ही कोणत्याही शेड्सच्या चळवळीचे भाग असा, तुमचा—खास तुमचा असा—विचारही तपासून घ्यायला, टिकवून ठेवायला *वाटसरूने* निश्चित मदत केली आहे; हेच त्याचे ऐतिहासिक योगदान म्हणता येईल. जागतिकीकरणाच्या पाशवी लाटांमध्ये हेलकावणारे विविध चळवळींमधील विविध जण-सर्व जणांचा एकमेकांकडे पाहण्याचा, स्मितहास्य करण्याचा, प्रसंगी रागावण्याचा, समजावून घेण्याचा समान दुवा म्हणजे *वाटसरू*! त्यामुळेच *वाटसरू* नावाचे हे कम्यून सुरू राहिले पाहिजे.

आपणा सर्वांचीच ती जबाबदारी आहे.

प्रदूषण - भोवतालचे आणि आतले

# मळभ

माधव वझे

"...हा म्युनिसिपल ट्रान्सपोर्टच्या ड्रायव्हर-कंडक्टरला झापतो. त्यांचे बॅज नंबर नोट करतो. सरकारी गाड्या, डंपर अडवतो. त्यांना सुनावतो. प्रायव्हेट गाड्यांच्या ड्रायव्हरशी हुज्जत घालतो. परवा एस.टी.च्या कंडक्टर-ड्रायव्हरबरोबर वाद घालत बसला. डिझेल रिक्षावाले तर सतत सापडतातच. ...सुरवातीला हा सिग्नलला आजुबाजूच्या लोकांना गाड्या बंद करा, अशी विनंती करायचा. नंतर याचा कॉन्फीडन्स वाढला; नंतर मग सिग्नलला गाडी आडवी लावून सगळ्यांना गाड्या बंद करायला सांगायला लागला. पुढे तर न ऐकणाऱ्या लोकांवर फोर्स करायला लागला. सिग्नलला भाषण ठोकतात महाराज. मला सुरवातीला कौतुकही वाटायचं, त्याच्याकडे धारिष्ट्य आहे. हा पांढरपेशा शिष्टाचार तोडून मनासारखं वागू शकतो..."

किरण यज्ञोपवीतच्या 'मळभ' या लघुनाट्यातली हर्षदा हे तिच्या मित्रमैत्रिणींना सांगत आहे. तिच्या नवऱ्याबद्दल. सत्याबद्दल. सत्यजित हे त्याचे खरे नाव.

त्याला तसेच एक कारण घडले आहे. अमेरिकेला जायला निघालेल्या विजय आणि शीला यांनी मित्रमैत्रिणींना त्या रात्री घरी जेवायला बोलावले आहे. सगळे तिशी-पस्तिशीतले. फ्लॅटला लागूनच असलेल्या टेरेसवर सगळी जमली आहेत. पार्टी जमून यायची तर दारू पाहिजेच. तर तीही आहे. मधेच केव्हातरी Sprite ची बाटली आणण्यासाठी सत्या आणि शाम जातात. परत येतात, तर सत्याचा डोळा काळा-निळा झाला आहे. शर्ट चुरगळला आहे आणि बटणे तुटलेली आहेत. शाम सांगतो की तो दुकानात Sprite घेण्यासाठी गेला असताना बाहेर एक डिझेल रिक्षा उभी होती. सत्याने रिक्षा-ड्रायव्हरला काहीतरी विचारले आणि त्यावरून बाचाबाची सुरु होऊन, सत्याने रिक्षा-ड्रायव्हरला एक सणकन् ठेवून दिली. सत्यालाही मार खावा लागला. हे सगळे कशासाठी? तर रिक्षा ड्रायव्हरकडे सत्याने पीयूसी मागितले म्हणून.

हर्षदाला हे काही नवीन नाही. ती तिथे असलेल्या सगळ्यांना सत्याच्या शौर्यकथा ऐकवते. कोणी जीपवाले सत्याचे हातपाय तोडायला निघाल्याची हकिगतही ती असहाय्यपणे सांगते. तिला सतत असुरक्षित वाटते आहे. ती हरवलेली वाटते.

सत्याच्या मित्रमंडळींना सत्याचे हे असले प्रताप काही पसंत पडलेले नाहीत. त्यांच्या लेखी सत्याचे हे उद्योग म्हणजे शुद्ध वेडेपणा आहे.

आधीच सत्याची बायको त्याच्या विरुद्ध; आणि आता मित्रही तिची बाजू घेऊन सत्याशी वाद घालताहेत.

लघुनाट्यामध्ये शेवटचे वाक्य आहे हर्षदाचे. ती म्हणते, "सत्यजित, गरज आहे ती फक्त कोडगं बनण्याची."

किरण यज्ञोपवीतच्या 'मळभ'मध्ये तसे घडत काही नाही. सत्याने रस्त्यातील त्या रिक्षावाल्याकडे पीयूसी मागितले आणि परिणामी सत्या जखमी होऊन त्या पार्टीमध्ये परतला, एवढीच काय ती घटना.

त्यानंतर तोंड फुटते ते वादाला. विजय आणि शीला अमेरिकेत जायला निघाले आहेत. विजयचे असे ठाम मत आहे की कोणत्याही प्रकारची पायाभूत रचना इथे केली जात नसल्यामुळे सगळे प्रश्न उद्भवताहेत. डेन्मार्कमधील कोणा तज्ज्ञाचे इथल्या गोंधळाबद्दल काय मत आहे हेही तो सांगून टाकतो. शीलाला तर वाटते की प्रत्येक ठिकाणी, जिथल्या तिथल्या काही मर्यादा असतातच; म्हणूनच आपण उगीच त्रास करून घेण्यात काही अर्थ नाही. आणि पायाभूत रचना नाही याबद्दल आपल्याला काही न्यूनगंड



**किरण यज्ञोपवीत**

**जन्म :** २७ ऑगस्ट १९६८

**एकांकिका / नाटक**

मित्रद्वय

मळभ

मनोमिलन

चल भाऊ अध्यात पुणे गेले खड्ड्यात

**अभिनय**

इस्किलार

एका शेवटाची सुरुवात

चरित्र

नकोरे बाबा

पहिलेपण

........................................................................



असायचे कारण नाही. इथे सामाजिक-राजकीय इच्छाशक्तीच नाही, इथल्या नेते मंडळींना दूरदृष्टी नाही, शिवाय एखादा माणूस एकट्याने काहीच करू शकत नाही, असेही विजयला वाटते. रमेश आणि मानसी यांचीही काही मते आहेत. मोटार उत्पादन करणाऱ्या एका कंपनीचा रमेश विभागीय व्यवस्थापक आहे आणि मानसी एका NGO मध्ये आहे. मानसीचा दृष्टिकोन सकारात्मक आहे. आपल्या देशामध्ये विकास होत आहे आणि तो विधायक आहे असे तिचे म्हणणे. प्याला अर्धा भरलेला आहे, हे तिला महत्त्वाचे वाटते. रमेशला मात्र पायाभूत रचनेचा विजयचा मुद्दा पटत नाही. प्रचंड लोकसंख्या, बेकारी, दारिद्र्य यामुळे पायाभूत रचना वगैरे शक्यच नाही असे सांगतानाच मोटार उद्योग देशाच्या आर्थिक विकासाच्या प्रक्रियेमध्ये महत्त्वाची भूमिका करीत असल्याचे त्याचे म्हणणे तो हिरिरीने मांडतो. देशाचे अर्थकारण बदलण्याची गरज असल्याचा सत्याचा मुद्दा त्याला अजिबात मान्य नाही. तसा प्रयत्न झालाच, तर उद्या प्रदूषणामुळे मरणार ते आज उपासमारीने मरतील असा इशाराही तो देतो. वाहने बाजारात येण्यापूर्वी कारखान्यात गुणवत्तेचे निकष लावून ती तपासली जातात असेही तो सत्याला ऐकवितो. या मित्रमंडळींमधील शान हा व्यावसायिक छायाचित्रकार आहे. तो अविवाहित आहे. तुंदिलतनु शाम, तसा चिंतातुर जंतू वगैरे मुळीच नाही. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सुधारली पाहिजे असे सिंगापूरचे उदाहरण देऊन विजय पटवू पाहतो, त्याला शामचे उत्तर आहे, मुंबईमधील लोकल्स. अख्खी मुंबई इकडची तिकडे होते ती लोकलमुळे हे तो जोरदारपणे सांगतो. वीज, छापखाना, गाड्या, सायकल, विमान, फोन, तार, टीव्ही, रेडियो हे सगळे जसे परदेशातून इकडे आले आहेत, तसा प्रदूषणाच्या प्रश्नही तिकडूनच इकडे आला आहे; तेव्हा तेच उत्तर पाठवतील अशी त्याची या प्रश्नावरची मल्लीनाथी.

सगळ्याच मित्रांनी या ना त्या सबबी पुढे करून सत्याला वेडा ठरविण्याचा प्रयत्न सुरू ठेवला असला, तरी तो आपला मुद्दा सोडत नाही. रोज दोनशे ते अडीचशे गाड्यांचे उत्पादन होते आणि त्या हिशेबाने वर्षामध्ये एक लाख गाड्या इथे निर्माण होतात. इथे पार्किंगला पुरेशी जागा नाही. गाड्या प्रचंड धूर ओकत राहिल्यामुळे, आपल्याकडे आता 'ऑक्सिजन बार'ची सुरुवात झाली आहे; श्वास घेण्यासाठी पैसे मोजावे लागणार आहेत आता... पाणी विकत घेणे म्हणजे लोकांना पंधरा वर्षांपूर्वी खुळचटपणा वाटला असता, आता लोक पाणी अगदी सहज विकत घेतात ना?... नद्यांची गटारे झाली आहेत. कारखान्यांनी सोडलेल्या सांडपाण्याची ती परिणती. लोक सदासर्वदा नाकाला रुमाल गुंडाळून फिरतात, ते काय हौस म्हणून? आणि कारखान्यांमध्ये बुद्धिमान शास्त्रज्ञ व विकास संशोधक असतील आणि गुणवत्तेचे निकष वाहन उत्पादनामध्ये लावले जात असतील



तर धडाधडा धूर ओकणारी डिझेल रिक्षा येतेच कशी रस्त्यावर? सरकारने कोणत्या कडक परीक्षांनंतर लोकोपयोगी वाहन म्हणून परवानगी दिली आहे अशा रिक्षांना? आणि रमेश जर विभागीय व्यवस्थापक म्हणून विकत असेल अशी वाहने शेतकऱ्यांमध्ये, आणि तो म्हणतो



त्याप्रमाणे त्याला काही चाड असेल या गंभीर प्रश्नाची, तर तो काय म्हणून सामील होतो आहे त्या उद्योगात? बंद करावे त्याने ते...

रिक्षावाल्याकडे पीयूसी दाखविण्याची मागणी करून सत्याने ओढवून घेतलेल्या संकटामुळे एरव्ही एकमेकांच्या थट्टा-मस्करीने सुरू झालेल्या त्या पार्टीमध्ये प्रदूषणाच्या गंभीर समस्येबद्दल तितकीच गंभीर चर्चा अकडोविकडीने होते. प्रदूषणाला कारण ठरणाऱ्या सामाजिक, आर्थिक, राजकीय कारणांनाही कधी स्थिरावत तर कधी ओझरता स्पर्श करीत ही चर्चा अखेरीला, पण तोपर्यंत कदाचित् टाळल्या गेलेल्या, नैतिक प्रश्नापाशी येते. आणि माणसांच्या आत आत असलेल्या प्रदूषणाकडे आपले लक्ष वेधते. धूर ओकणाऱ्या डिझेल रिक्षा ज्या कारखान्यामधून बाहेर पडतात, तिथे रमेशने का म्हणून राहावे, ह्या सत्याच्या प्रश्नाला रमेश उत्तर देतो, ते एकट्या रमेशचे उत्तर खासच नाही. जगण्याच्या चरकात पिळल्या जाणाऱ्यांना विचार परवडत नाही; हा या विश्वाचा मंत्र आहे, विका. आधी नोकरीसाठी स्वत:ला, मग बुद्धी गहाण ठेवा आणि उत्पादन विका. कळत नाही की काय करू? दुसरी नोकरी धरू? तिथे असंच नसणार कशावरून? पैसे? जगण्यासाठी लागतातच ना?... लढू का पळून जाऊ? जे लोक जगण्याचा विचार करीत नाहीत, ते प्रदूषणाचा काय करणार?....

किरण यज्ञोपवीतचे 'मळभ' हे लघुनाट्य पाहताना (आणि त्याचे वाचन करतानाही) सुरुवातीला वाटते, प्रदूषणाबद्दलचे ते एक 'समस्याप्रधान' नाट्य आहे आणि किरण त्या समस्येचा सर्वंकष मागोवा घेत आहे. नाट्यातली तिथली ती मित्रमंडळी आपापल्या अनुभवानुसार आणि कुवतीनुसार निरनिराळी कारणे देत राहतात आणि फुटबॉलप्रमाणे निरनिराळ्या दिशांना तो प्रश्न फिरवू पाहतात तेव्हा लक्षात येतात दोन गोष्टी. एक तर प्रदूषणाच्या प्रश्नाचा चौफेर वेध घेतला जात आहे आणि दुसरे म्हणजे आपापले अनुभव आणि आपापली मते मांडणाऱ्या त्यांच्यापैकी प्रत्येकाचे मत त्या त्या क्षणाला तरी आपल्याला योग्य वाटते आहे. आणि तसे वाटण्याचे कारणही आपल्याला कळते. किरणने त्यांना हाडामासाची स्वतंत्र माणसे म्हणून तिथे जगू दिले आहे. ती माणसे समाजामधील निरनिराळ्या वृत्तींची प्रतिनिधीही आहेत आणि तरीही त्यांना त्यांचे स्वत:चे स्वतंत्र असे व्यक्तिमत्त्वही आहे. समस्याप्रधान नाटकांमध्ये व्यक्तिरेखांचे व्यक्तिमत्त्व अनेकदा लोप पावते आणि नाटककाराच्या इच्छेनुसार त्यांना निरनिराळ्या विचारप्रवाहांचे ठोकळेबाज प्रतिनिधी असे रूप येते, हा सर्वसाधारण अनुभव. नाटककाराच्या हाती दोऱ्या असलेल्या त्या बाहुल्या म्हणूनच त्यांचे अस्तित्व राहते.

समस्याप्रधान नाटक अनेकदा केवळ

प्रचारकी ठरते तेही याच कारणामुळे. नाटककार आपले स्वत:चे वजन, नायकाच्या पारड्यामध्ये इतक्या उघडपणे आणि इतक्या मोठ्या प्रमाणात टाकतो की तो निर्माण करू पाहत असलेला संघर्ष अगदीच लुटुपुटीचा ठरतो. हे तर खरेच आहे की आपले मत कोणाच्या बाजूने टाकायचे, ते नाटककाराने ठरविलेले असते. पण आपण ते ठरविलेले नाही, असे नाटक त्याला करावे लागते. कौशल्य सारे रचनेत आहे अशा शब्दात केशवसुतांनी तेच सांगितले.

*''नटनाट्य तुम्ही केले याचसाठी।*
*कौतुके दृष्टी निववावी।।*
*नाहीतर काय कळलेचि आहे।*
*गाय आणि वाघ लाकडाची।।''*

असे तुकाराम म्हणतो, तेव्हा लुटुपुटीचाच संघर्ष, पण तो 'कौतुके दृष्टी निववावी' असा असावा, हेच तो लक्षात आणून देतो. किरण यज्ञोपवीतच्या 'मळभ'चे वैशिष्ट्य असे की त्याने कोणत्याच एका व्यक्तिरेखेची किंवा विचाराची बाजू घेतलेली नाही. कोण जिंकतो किंवा कोण हरतो, याला त्याच्या लेखी महत्त्व नाही असेच आपल्याला दिसते. 'समतोला'कडे त्याचे लक्ष राहते आणि समस्येमध्ये गुंतलेल्या मुद्द्यांची घुसळण घडू द्यावी, यामध्ये त्याला रस असलेला दिसतो.

किरण स्वत: नाट्यलेखक आहे, तसा तो अभिनेता, दिग्दर्शकही आहे. पुण्यामधील जागर, समन्वय या समांतर नाट्यसंस्थांच्या अनेक नाट्यप्रयोगांमध्ये तो भूमिका करीत आला आहे. महाविद्यालयामध्ये असताना, पथनाट्य चळवळीशीही त्याचा प्रत्यक्ष संबंध होता. 'मळभ'मध्ये तो त्याचा संदर्भ पारदर्शकपणे दिसतो. अशा अर्थाने की 'मळभ' त्याने आधी पाहिले आणि नंतर लिहिले असे म्हणावे, अशा प्रतीचे रंगमूल्य या लघुनाट्याला लाभले आहे. 'मळभ'ची एकूणच मांडणी त्याने अशी केली की त्या त्या क्षणाला व्यक्त होत जाणाऱ्या क्रिया-प्रतिक्रियांमधून अनुभव आकाराला येत येत तो हर्षदाच्या अखेरच्या वाक्यापाशी पूर्ण व्हावा. नाट्यखंडांचे आणि सर्वंकषतेचे एकाच वेळी त्याला योग्य भान आहे. 'मळभ'ला नाट्यात्म विधान प्राप्त झाले ते प्रामुख्याने त्यामुळे. व्यक्तिरेखांची चरित्रे, त्यांची व्यक्तिमत्त्वे, पार्टीमधील त्यांचे आगमन-निर्गमन, प्रगमनशील संवाद, नाट्यपूर्ण ताणांमधील चढउतार हे सगळे 'मळभ'मध्ये साक्षेपाने पण सहजपणे येते. त्यामुळेच तर नाट्यानुभव उमलत असल्याचे जाणवते. तो लादला जात आहे, घुसडला जात आहे अशी एकही जागा 'मळभ'मध्ये नाही.

समस्याप्रधान उत्कृष्ट लघुनाट्य म्हणून 'मळभ'ची संभावना होईल, तर ते योग्य नाही. नैतिक अधिष्ठानाचा मुद्दा नाटककार उपस्थित करतो, आणि एका समकालीन समस्येच्या संदर्भात, स्वत:च्या नाटकाला एक सार्वकालिकतेचे परिमाण मिळवून देतो. प्रदूषणाच्या संकल्पनेचे सामान्यत: दुर्लक्षित राहणारे किंवा टाळले जाणारे परिमाण आपल्या नजरेसमोर आणतो. 'वैदेही' नावाचे बिवलकरांचे एक नाटक आहे. त्यातील दोन ओळींची या क्षणाला आठवण होते– *''सुवर्णाच्या रथात बसून सत्य येथून पळाले आहे। प्रत्येकाच्या छातीवरती चाकोरीची खूण आहे।।''* विजय, शीला, रमेश-मानसी, शाम या सगळ्यांना प्रदूषणाच्या प्रश्नाचे गंभीर परिणाम कळत नाहीत असे थोडेच आहे? पण निरनिराळी कारणे पुढे करून, प्रदूषण गृहीतच धरण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. ते झोपलेले आहेत की झोपेचे सोंग घेतलेले? लोकांना भानावर आणावे, त्यांना परिस्थितीची जाणीव करून द्यावी, ही स्वत:ची जबाबदारी समजून ती डोळसपणाने स्वीकारणाऱ्या





सत्याची भूमिका कोणती आहे? पुढील पिढीला आपण कोणते संचित देतो हे कुटुंबातील कर्त्या पुरुषाने ओळखावे असे त्याचे उच्चरवाने सांगणे आहे. पण ऐकतो कोण?

म्हणून तर नाटककाराने त्या परिस्थितीत, सत्याला नाही, पण दिवसागणीक गणशत्रू ठरत जाणाऱ्या आपल्या नवऱ्याच्या जिवाबद्दलच जी कातर झाली आहे, त्या हर्षदाला भरत वाक्य दिले आहे. : 'गरज आहे ती फक्त कोडगं बनण्याची'.

सगळे रस्ते अखेर 'रोम'कडे जातात याचा ध्वन्यर्थ समोर ठेवून असे म्हणता येईल, की प्रत्येक नाटक अखेर 'धर्मा'च्या वाटेनेच जाते. आपला धर्म कोणता, असा प्रश्न ते उपस्थित करते.—आणि मूल्यात्म प्रश्नांना स्पर्श करणारे नाटक, समकालीनतेला ओलांडून जाते. 'मळभ' हे लघुनाट्य तसे एक आहे.

इब्सेनने १८८२ मध्ये An Enemy of the People लिहिले. संपूर्ण व्यवस्थेच्या विरोधाला तोंड देण्यासाठी उभा राहिलेला डॉक्टर, अखेर कुटुंबालाही नकोसा झाला. इतकेच नाही, तर कालांतराने खुद्द इब्सेनलाही वाटले, त्याचा डॉक्टर स्टॉकमन अप्रगल्भ व संतापी होता...

असेलही कदाचित. पण नाकर्त्या आईबापांच्या गुणी आणि क्षमता असणाऱ्या मुलांनी जबाबदारी अंगावर घ्यावी, त्याप्रमाणे इब्सेनच्या आधी व नंतरही अशी धडपडणारी मुले समाजात होती आणि आहेत. 'मळभ' अधिकाधिक गडद होत आहे, ते अधिकाधिक दाटून येत आहे हे खरे; पण हेही तितकेच खरे की धडपडणाऱ्या मुलांची संख्याही वाढते आहे. साने गुरुजी हे स्वत:च तसे एक होते.

साने गुरुजींचा संदर्भ इथे आलाच आहे, तर 'मळभ'बद्दल दोन प्रश्न पुढे येऊ पाहतात. सत्या महाविद्यालयात असतानाही डॅशिंग होता, ही माहिती रमेश पुरवितो आणि विजयची साक्ष काढतो. सिग्नल पडला असता, जे लोक गाड्या बंद करीत नाहीत, त्यांना गाड्या बंद करण्यासाठी सत्या फोर्स करतो हे हर्षदाच सांगते. तो हिंस्रपणाने स्वत:चा मुद्दा पटवू पाहतो याची आणखीही उदाहरणे येतात. सत्या अहिंसक मार्गाने जात राहता, तर नाट्य निर्माण झाले नसते आणि मित्रमंडळींना जसा मुद्दाच राहिला नसता, त्याप्रमाणे हर्षदाही व्याकूळ झाली नसती हेही खरे. तो हिंसेचा मार्ग, बळाचा मार्ग जवळ करू लागला व त्यामुळे 'नाट्य' निर्माण झाले हे खरे. पण परिवर्तनाच्या चळवळीच्या तत्त्वाला छेद दिल्यासारखेही ते झाले. कायदा हातात घेण्यासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे असे नाही, तर लोक कायदा हातातही घेऊ लागले आहेत व ते विशिष्ट संदर्भात समर्थनीयही आहे, असे किरण यज्ञोपवीत म्हणू शकतो. जयवंत दळवी यांच्या 'पुरुष'मध्ये बंडाने नाही का राजकीय नेत्याचा लिंगच्छेद केला? हिंसेला हिंसेने उत्तर देण्याचे प्रकार सुरू होतात आणि हिंसक मार्ग जवळ



करणाऱ्या चळवळीचे तेज तर लोपतेच पण ती चळवळही अल्पावधीत लोप पावू शकते.

दुसरा प्रश्न आहे, सत्याने सुरू केलेल्या उपक्रमाला जे निमित्त घडले त्याचा. हर्षदा-सत्या यांना एक मुलगा होता, अभी. त्याला दम्याचा विकार असण्याचा आणि दमा त्यांच्या घरी वंशपरंपरागत असण्याचाही ओझरता उल्लेख येतो. असा अभी एक दिवस तुंबलेल्या वाहतुकीमध्ये अडकला आणि गुंतागुंत वाढत जाऊन अखेर अभीचा मृत्यू झाला.

ज्याचे जळते त्याला कळते, या न्यायाने सत्याने प्रदूषणविरोधी चळवळ सुरू केली. हे सत्यापुरते ठीकच आहे. पण मग डॉक्टर स्टॉकमनचे तसे काय जळाले होते? त्याने अहिंसक मार्गाने, का म्हणून व्यवस्थेविरुद्ध लढत राहावे? आणि आजही जरा अवतीभोवती पाहिले तर सामान्य माणसे अहिंसक मार्गाने या ना त्या प्रश्नासाठी लढताहेत. लष्करच्या भाकऱ्या भाजण्याचाच तो प्रकार! पण तो ती माणसे का म्हणून करत असावीत?

अभी आणि त्याचा मृत्यू यामुळेही सत्याच्या संघर्षाला 'व्यक्तिविशिष्ट' असे रूप येते. खरे तर तसे ते येण्याचे काही कारण नव्हते. सत्या कुठेही हळवा झालेला या लघुनाट्यात दिसत नाही. त्याचे वागणे-बोलणे सांगते की हळवेपणा त्याला मान्यच नसावा. रमेशला वडिलांच्या आजारात पैसे उभे करावे लागले हे ऐकूनही सत्या त्या भावनिकतेला थारा देत नाही. किरण यज्ञोपवीतने सत्याला त्याच्या मनाविरुद्ध हळवा केला काय? आणि त्या हळवेपणाची परिणती अशा हिंसक चळवळीमध्ये झाली काय?

प्रश्न तसे महत्त्वाचे आहेत आणि नाहीतही. लेखनामधील एकसंधतेचा प्रश्न इथे आहे, त्याचबरोबर तात्त्विक भूमिकेच्या एकसंधतेचा—अंतर्गत विसंगतीचा प्रश्नही त्यामध्ये आहे—आणि परिवर्तनाच्या चळवळीमध्ये



त्याबद्दल जागे राहावे लागते हे तर आहेच!

तरीही, तरीही उच्चरवाने कौरव-पांडवांना आवाहन करणाऱ्या व्यासाप्रमाणे कंठशोष करणाऱ्या सत्याचे अस्तित्व आज आवश्यकच आहे. उद्याचा सत्या हिंसक नसेल अशी आशा करता येते, तसे प्रयत्नही आपल्याला करता येतील. पण सत्याचे म्हणणे सांगणारे कोणी ना कोणी तर असावेच लागेल!

Abu Ben Adam
May his tribe increase...

याही ओळींची या क्षणी आठवण होते.



अनेक दिशा शोधणारा दिग्दर्शक

# अतुल पेठे

मकरंद साठे

गेल्या आठवड्यात एका सकाळी सतीश काळसेकरांचा मला फोन आला. ते म्हणाले, 'एक काम आहे, मी 'महाराष्ट्र फाउण्डेशन'च्या वतीने बोलतोय.' आता काळसेकरांसारख्या मोठ्या व्यक्ती आणि महाराष्ट्र फाउण्डेशनसारख्या मोठ्या संस्था यांचा मला दर आठवड्याला जाऊच द्या, दर वर्षीही फोन यावा असे काही माझे कर्तृत्व नाही. त्यामुळे माझी उत्सुकता स्वाभाविकपणे ताणली गेली. आपणास काही महत्त्वाचे 'कळणार' हे क्षणात लक्षात आले आणि माझा अंदाज पुढच्या काही क्षणांतच खरा ठरला. महाराष्ट्र फाउंडेशन यंदाच्या वर्षापासून 'नाट्यगौरव' असा एक विशेष पुरस्कार सुरू करणार आहे, नाट्यक्षेत्रातील एकंदर महत्त्वाचे योगदान आणि त्यायोगे वा निमित्ताने एकंदरीने सामाजिक क्षेत्रातही ज्याने महत्त्वाचे योगदान केले आहे अशा व्यक्तीस हा पुरस्कार देण्यात येणार आहे आणि असा हा पुरस्कार पहिल्याच वर्षी, अतुल पेठे यांना देण्यात येणार आहे अशी आनंदाची बातमी त्यांनी मला दिली. त्याविषयी मी काही लिहावे असे 'काम'ही त्यांनी माझ्यावर सोपविले.

या कामाला मी आनंदाने होकार दिला. पण प्रत्यक्ष विचार करू लागल्यावर अडल्यासारखे झाले. अतुलची आणि माझी अनेक वर्षांची मैत्री आहे. (खरे तर लेख लिहीत असता वा भाषणात 'अमुक' वा 'तमुक' असा एकेरी उल्लेख करणे मला आवडत नाही. परंतु अतुलची आणि माझी इतक्या वर्षांची मैत्री आणि कामातला सहभाग आहे की आदराने श्री. अतुल पेठे असे म्हणावे असे त्याचे कर्तृत्व असले तरी ते भयानक औपचारिक होऊन, लिहिता हात अडतो, तेव्हा मी त्याचा उल्लेख एकेरीच केला तरी मला त्याच्या मोठेपणाचे भान आहे हे वाचकांनी कृपया ध्यानात ठेवावे अशा विनंती.) १९८६ साली मी त्याला पहिल्यांदा भेटलो. त्या वर्षी त्याचे 'क्षितिज' हे नाटक पाहिले आणि एक अतिशय तीव्र संवेदनक्षमतेने—इंटेन्सली काम करू पाहणारा युवक नाट्यक्षेत्रात येत आहे, त्याला उज्ज्वल भवितव्य आहे अशी खात्री इतर अनेकांप्रमाणेच माझीही पटली. पुढे त्याच वर्षी आम्ही दोघेही थिएटर ॲकेडमीने आयोजित केलेल्या नाट्यलेखन कार्यशाळेत एकत्र भाग घेतला. तिथे ओळख, मैत्री झाली. प्रत्यक्ष आयुष्यही तो त्याच संवेदनक्षमतेने जगू पाहतो याचे भान आले. १९८८-८९ साली माझे एक नाटक समर नखाते यांनी दिग्दर्शित केले, तेव्हा त्यात अतुलने एक महत्त्वाची भूमिका केली. तेव्हा त्याच्या काम करण्याच्या प्रक्रियेतली इंटेन्सिटीही मी पहिल्यांदा जवळून अनुभवली. तेव्हापासून आजतागायत म्हणजे जवळ जवळ १९ वर्षे आम्ही एकत्र काम करतो आहोत. अनेक नाटकांमधून, माहितीपत्रांतून, इतर सामाजिक व्यवहारातून आणि व्यक्तिगत मैत्रीतूनसुद्धा. इतके की 'साठे-पेठे' ही 'जोडगोळी' काहींच्या विनोदाचा विषय व्हावा. कधी निर्विष सरळ विनोदाचा, कधी विखारी विनोदाचा, तर कधी मत्सरातून उद्भवलेल्या विनोदाचा.

यातला मधला प्रकार मला कळत नाही. पहिला निर्विष विनोद आवडतो. आणि शेवटचा 'मत्सरी' विनोद कळू शकतो. कारण अतुल पेठे हा 'विशेष' माणूस आहे याचे भान मला आहे. गेल्या वीसेक वर्षांत अतुलने अनेक महत्त्वाच्या लेखकांची नाटके दिग्दर्शित केली. उदाहरणार्थ, गो. पु. देशपांडे, श्याम मनोहर, सदानंद मोरे, दि. बा. मोकाशी यांपासून ते सॅम्युअल बेकेटपर्यंत. अनेक महत्त्वाचे लेखक अतुलने आपले नाटक करावे अशी इच्छा बाळगून आहेत हे मला माहीत आहे. या पार्श्वभूमीवर अगदी त्याची



अतुल पेठे

अतुल पेठे

**जन्म :** १४ जुलै १९६४

**दिग्दर्शन**

शीतयुद्ध सदानंद
वेटिंग फॉर गोदो
प्रेमाची गोष्ट?
सूर्य पाहिलेला माणूस
उजळत्या दिशा
आनंदओवरी
चौक
गोळायुग

**अभिनय**

क्षितिज, घाशीराम कोतवाल, पडघम, सापत्नेकराचे मूल, ठोंब्या, गोळायुग या नाटकांमध्ये
आणि सापत्नेकराचे मूल, कथा दोन गणपतरावांची, यकीन मानो या चित्रपटांमध्ये

**लेखन**

चेस, पाऊस आता थांबलाय, यात्रा, मंथन तसेच इतर एकांकिका
क्षितिज, अवशेष, शीतयुद्ध सदानंद ही नाटके
आनंदीगावचा गम्मतराव, गाणे गुलमोहराचे ही बालनाटके

'प्रायोगिक' नाटके करण्याची ओढ आहे हे लक्षात घेतले तरी माझ्यासारख्या प्रायोगिक परिघावरच्या (मार्जिनलाइज्ड या अर्थाने) लेखकाच्या इतक्या नाटकांचे त्याने दिग्दर्शन करावे वा त्यात काम करावे हे कोणाच्याही डोळ्यावर येणे स्वाभाविक आहे. मलाही त्याचे कोडे उलगडलेले नाही. यशस्वितेचे अनेक रस्ते खुणावत असता मी स्वत:सुद्धा माझ्या स्वत:त इतका अडकून पडलो नसतो! पण जे आपल्याला भावते, त्यात पुढचामागचा फार विचार न करता झोकून द्यायचे, एवढेच नव्हे तर केवळ झोकून देण्याचा वेडाचार न करता ते लोकांपर्यंत पोचवण्यासाठी ते एकाअर्थी आणि एका मर्यादेत का होईना 'यशस्वी' करण्यासाठी, प्रयत्न करायचे. फक्त सुटेसुटे फुटकळ प्रयत्न करायचे असे नव्हे तर त्यासाठी काही यंत्रणा उभारण्याचा, सिस्टम्स् उभारण्याचा प्रयत्न करायचा, इतर सामाजिक घटकांशी आपल्याला भावलेली कलाकृती, विचार जोडत जायचे, हा अतुलचा सततचा प्रयत्न आणि त्यातली त्याची 'निपुणता' त्याला 'विशेष' बनवते. मघाशी म्हटल्याप्रमाणे माझ्यासारखा परिघावरचा लेखक—आणि मीच नव्हे तर इतरही काही त्या त्या वेळी नव्याने लिहिते झालेले लेखक निदान परिघाच्या आसपास का होईना, समाजाच्या नजरेत राहिले याचे श्रेय अतुलला देणे योग्य आहे. विशेषत: सांप्रत काळी—जेव्हा प्रायोगिक नाटकाचे ग्रुप डळमळू लागले आहेत, पैशांच्या अडचणी सतावत आहेत, प्रयोग मुळात कमी होत आहेत आणि जे होत आहेत त्याला प्रेक्षकांचा पाठिंबा कमी होत आहे. अशा वेळी—हे कर्तृत्व एकमेवाद्वितीय असे म्हटले पाहिजे. येथेच दोन मुद्दे स्पष्ट केले पाहिजेत. एकतर हे कर्तृत्व—लोकांपर्यंत पोचविण्याचे—हे 'कलाबाह्य' कर्तृत्व आहे असे मी मानत नाही. जे विषय, जी नाटके त्याला भावतात, नवी जीवनदृष्टी देऊ पाहतात त्यांनाच भिडण्याचा प्रयत्न करून तो हे करतो. आणि एरवीही कलेच्या, विशेषत: नाटकाच्या, अगदी कलात्मक प्रक्रियेतही 'प्रेक्षक' हा महत्त्वाचा घटक असतोच असतो. प्रायोगिक नाटकांमागे जो हेतू असतो तो केवळ मनोरंजनाचा नसतो, वित्तप्राप्तीचा वा लोकांच्या आवडीनिवडीप्रमाणे त्यांना खूष करून आहे ती सामाजिक बांधणी—बहुतेक वेळा नैतिकदृष्ट्या वा विचारप्रणालीदृष्ट्या अन्यायकारक बांधणी—कायम ठेवण्याचा नसतो, तर वेगळी जीवनदृष्टी देण्याचा, ही अन्याय्य बांधणी मोडण्याचा असतो. त्यामुळे अनेकदा तो लोकांच्या पचनी पडणे अवघड असते. पण म्हणून तो प्रेक्षकविरोधी असतो, स्वत:तच रमलेला समाजविरोधी असतो असे नव्हे. उलट प्रायोगिक नाटकाला आणि रंगकर्मीनाच खरे तर प्रेक्षकांशी उत्कटतेने काही संवाद साधायचा असतो. त्यामागे एखादी वस्तू विकण्याचा भाव नसतो. याअर्थी त्यांना प्रेक्षकांची जास्त खोलवरची 'आवश्यकता' असते. ती कलात्मक अर्थानेही एक गरज असते. हे लक्षात घेतले तर अतुल आज महाराष्ट्रातल्या निदान प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी केवळ स्वत:च्या प्रयत्नांनी उभारलेल्या सिस्टिम्सद्वारे असे नाटक नेऊ शकणारा एकमेव माणूस आहे, यामागचे महत्त्व लक्षात येईल. दुसरे म्हणजे आजमितीला वरवर पाहता प्रायोगिक रंगभूमीला—प्रेक्षकसंख्येच्या दृष्टिकोनातून—बरे दिवस आल्याचे काही लोकांना जाणवते. हे माझ्या मते खरे नाही. जी नाटके प्रेक्षक सहज जमवून आहेत ती एकतर फक्त पुण्या-मुंबईपुरती मर्यादित तरी आहेत किंवा मुळात 'प्रायोगिकच' नाहीत. म्हणजे



*अरुण कोलटकरांच्या कवितांचे वाचन*

वेगळी 'जीवनदृष्टी' घेऊन येणारी, वेगळी 'परिस्थितीभान' देण्याची क्षमता असणारी नाहीत. केवळ 'छोट्या' रंगमंचवर त्यांची सुरुवात झाली म्हणून त्यांना 'प्रायोगिक' म्हणणे हे स्वत:ची फसवणूक करणारे आहे. अशी नाटके यशस्वी झाली—त्यातली बहुतेक काही महिन्यात व्यावसायिक पद्धतीने सादर



केली जातात—की प्रायोगिक रंगभूमीला बरे दिवस झाले, अतिशय महत्त्वाचे नवे लेखक, दिग्दर्शक निर्माण झाले असे 'दृश्य' गेल्या काही वर्षात —कदाचित सद्हेतूने—निर्माण केले जात आहे. या भ्रामक चित्राचे, अकाली कौतुकाचे दुष्परिणाम त्या लेखक-दिग्दर्शक इत्यादींना स्वत:ला तर भोगावे लागतातच, पण प्रायोगिक, गंभीर, राजकीय-सामाजिकदृष्ट्या जागरूक अशा रंगभूमीलाही भोगावे लागत आहेत. अल्प काळातच अशा व्यक्ती काही करेनाशा तरी होतात वा निव्वळ मनोरंजनपर गोष्टी करू लागतात. कमी काळात वैफल्यग्रस्त होतात किंवा आपले मार्ग बदलतात. कौतुक करणारे नव्या व्यक्तींकडे त्याच सहजतेने वळतात. 'कौतुक करणारे' म्हणून त्यांचे नाव अजरामर होते. अशा परिस्थितीत अतुलसारख्या व्यक्तींचे महत्त्व अधिकच वाढते हे उघड आहे. गेल्या चार-पाच वर्षात — वर उल्लेखलेल्या कौतुक करून चढवून ठेवण्याच्या दृष्टीने नव्हे तर खरोखरच ज्यांच्यात बीजरूपात काही चांगल्या शक्यता जाणवतात असे काही तरुण सातत्याने काही करू पाहत आहेत असेही दृश्य आहे. अशा मंडळींसाठी अतुल पेठे हे एक चांगले रोल मॉडेल म्हणून आजही उभे आहे. व्यक्तिगत पातळीवरही आमच्याकडून भागीदारीतही अजून बरेच काही होईल अशी आशा आहे. तेव्हा व्यक्तिगत संबंधांबाबत बोलायचे झाले तरी ही वेळ योग्य नव्हेच.

लिहायचे मुद्दे असंख्य असले तरी काय लिहू हा प्रश्न त्यामुळे पडतो. खरे तर तरीही 'काय लिहू' हा प्रश्न नाहीये, 'सुसंगत मांडणी', 'सुसंगत रसग्रहण' कसे करू हा आहे. मुद्दे इतके आहेत की सोपा उपाय म्हणजे अशा सुसंगतीचा आग्रह सोडून सुटे सुटे मुद्दे मांडतो. सुसंगत पुढे कधी तरी. अतुल पेठेंच्या याही पुढच्या टप्प्यावर कधी जरी!

अतुलला हे बक्षीस—हे विशिष्ट बक्षीस देण्यामागे संयोजकांनी अथवा निवड समितीने नक्की कुठले निकष लावले ते मला अर्थातच ठाऊक नाही. परंतु 'असे बक्षीस द्यायचे आहे तर ते कुणाला द्यावे?' असे त्यांनी मला विचारले असते तर मीही अतुलचीच निवड केली असती. मी काय निकष लावले असते? कुठले मुद्दे महत्त्वाचे मानले असते? त्यापैकी काही मी आधीच मांडले. आता उरलेले मांडणे सयुक्तिक ठरेल.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे त्याची नाट्यक्षेत्रातली कामगिरी. दिग्दर्शक म्हणून अतुलची काही शक्तिस्थळे मला जाणवतात. विषयाला भिडण्याची त्याची एक पद्धत आहे. एक तर त्याच्या वैचारिक बैठकीशी, जाणिवांशी निदान काही अंशी जुळतील अशा कलाकृती तो निवडतो. स्वत:च्या आयुष्यातल्या अनुभवांशी त्या ताडून पाहत त्यांचा अर्थ लावण्याचा प्रयत्न करतो. माझ्या मते तर हे अनुभवाशी ताडून पहाणे इत्यादी कधी कधी जास्तच टोकाला जाते हेही नमूद केले पाहिजे. एखाद्या मध्यमवर्गीय शहरी माणसाच्या, सर्वसाधारणपणे सामान्य आयुष्य जगू पाहणाऱ्या—म्हणजे डॉस्टोव्हस्की किंवा व्हॅनगॉफ अथवा रोमन पोलान्स्की सारखे वाभरे आयुष्य न जगणाऱ्या वा दालीसारख्या निर्नायकी जीवनपद्धतीचे ग्लॅमर जाणीवपूर्वक नाकारणाऱ्या— माणसाच्या अनुभवविश्वाला मर्यादा असतात. मग या मर्यादा आपल्या जाणिवांना, निर्मितिक्षमतेला व सह— अनुभूती—क्षमतेला पडतात. पण हा आमच्या दोघांच्या पद्धतींमधल्या अनेक फरकांपैकी एक फरक. खूप काळ

एकमेकांबरोबर आदराने—निदान मला त्याच्याबद्दल आहे—काम करणाऱ्या माणसांच्या दृष्टिकोनातही अनेक महत्त्वाचे फरक असतातच. ते काही असले तरी स्वत:च्या जीवनाशी कलाकृतीच्या आशयाचे नाते तीव्रतेने जोडण्याचा सतत प्रयत्न करणे हे माझ्याही मते अत्यंत महत्त्वाचे आहे आणि दुर्दैवाने फार कमी मंडळी ते करताना दिसतात. एकदा तुम्ही हे केलेत आणि एका विस्तृत समाजाचा भाग आहोत याचे भान जागृत असले तर मग व्यक्तिगत, कौटुंबिक, सामाजिक अशा कृत्रिम विभागण्याच गळून पडतात. राजकीय, सामाजिक भान म्हणजे नक्की काय, ते असायलाच हवे का, असे प्रश्न किती गैरलागू असतात त्याची जाणीव होते. व्यक्तिगत, कौटुंबिक असे पूर्ण एखाद्या छोट्याशा कोशात राहणारे, 'सामाजिक-राजकीय' इत्यादी गोष्टींपासून वगळता येणारे असे काही नसतेच याची जाणीव होते. (किंबहुना मग हेही कळते की 'मी राजकीय नाही' असे म्हणणे हीही एक राजकीय भूमिकाच असते. अर्थात कृपया इथे एकंदर राजकारण आणि मतांचे पक्षीय राजकारण यात गफलत होऊ नये.) अशी जाणीव म्हणजे व्यापक जाणीव अतुलमध्ये खोलवर मुरलेली आहे. ती त्याच्या दिग्दर्शनातून, संहितांच्या निवडीतून अभिव्यक्त होते. आणि ती मला फार महत्त्वाची वाटते. त्याच्याशी त्याचे भावनिक नाते जुळते, हेही महत्त्वाचे. इथेही एक मतभिन्नता आमच्यात आहेच. मला कलानिर्मितीच्या प्रवासात थोडा त्रयस्थपणाही—बाहेरून पाहता येण्याची धारणा—महत्त्वाचा वाटतो. अतुल भावनिकदृष्ट्या काहीसा जास्त गुंततो.

परंतु कदाचित हा लेखक आणि दिग्दर्शकामधला फरकही असेल. भावनिक गुंतवणूक हवीच, हे तर खरेच. नाटक म्हणजे वैचारिक निबंध नसतो. आणि भावनिक गुंतवणुकीतूनच 'नाट्यमयता' पकडण्याची अतुलची हातोटी विलक्षण आहे. त्याने दिग्दर्शित केलेल्या नाटकांकडे पाहिले तर ही अगदी प्रकर्षाने जाणवणारी गोष्ट आहे.



'ठोंब्या' नाटकातील दृश्य

या गुंतवणुकीबरोबरच 'बाह्य वस्तू' — म्हणजे ज्याला 'एक्सटर्नलायझेशन' वगैरे काहीसे दिग्दर्शक—नट मंडळी म्हणतात असे मला वाटते. चूक भूल देवी-घेवी, मला त्यातले फारसे कळत नाही, याकडे अत्यंत बारकाईने त्याचे लक्ष असते. म्हणजे अमुक पात्राचे कपडे काय असतील, चष्मा, उभे राहण्याची पद्धत, केशरचना इत्यादी अनेक गोष्टी. तशी ही अत्यंत मूलभूत, प्रत्येक दिग्दर्शक नटाने अगदी पहिल्याप्रथम 'किमान' करावी अशी गोष्ट वाटते, पण तीही किती अवघड असते, किती कमी मंडळी त्याकडे अतुलइतक्या काटेकोरपणे लक्ष पुरवतात याचा आढावा घेतला तर याचे महत्त्व कळेल. नासिरुद्दिन शहा हे याबाबत तरी अतुलचा आदर्श असावेत असा माझा ग्रह आहे.

मी मघाशी उल्लेख केला त्या भावनिक गुंतवणुकीबद्दल अजून एक मुद्दा आहे, तो सांगायचा राहून गेला. ही भावनिक गुंतवणूक फक्त आशयाबद्दल नसते, तर संपूर्ण निर्मितिप्रक्रियेबद्दलच असते. संपूर्ण कार्यकालात, संपूर्ण प्रोसेसबद्दलच ती असते. लेखक म्हणून, कधी कधी दिग्दर्शक म्हणूनही मी अतुलच्या अनेक नाट्यप्रयोगांना, तालमींना हजर राहिलेलो आहे. कधी कधी काळजी वा भीतीही वाटावी इतक्या त्याच्या उत्कट तीव्र भावनिक गुंतवणुकीचा—इंटेन्सिटीचा—प्रत्यय प्रत्येक प्रयोगाच्या वेळी येतो. त्याच्या कुठल्याही नाटकाच्या कुठल्याही प्रयोगाच्या वेळी नट सुस्त असू शकत नाही. एक ताण असतो. पण हा ताण व्यक्तिगत नसतो. एका निर्मितिप्रक्रियेचा भाग असतो. त्यात

अत्यंत विचारपूर्वक 'ताण मर्यादित राहील', 'क्रियाशील' राहील अशी योजना केलेली असते. आणि प्रत्येक प्रयोगात एक किमान सफाई हे त्याचे फलित दरवेळी पहायला मिळते. 'किमान सफाई' हा शब्द मी अतुलबाबत वापरतो तेव्हा तो फार वरच्या 'स्टँडर्डचा' आहे हे मुळात कायम लक्षात ठेवणे आवश्यक आहे. त्यामुळे त्याची कुठलीही निर्मिती ही नटांसाठी जणू एक कार्यशाळाच असते. असे अनेक नट आज 'पेठे स्कूल'मधून तयार झालेले आहे. अशी भूमिका वा हा दृष्टिकोन असण्याचा एक अधिकच मोठा फायदा मला स्वत:ला वाटतो. तो असा की निदान प्रायोगिक नाटकाबद्दल दिग्दर्शकीय विचार वा नटांचा विचार, एवढेच कशाला लेखकाची विचारप्रक्रिया पहिल्या प्रयोगानंतर थांबू नये. त्यात विचारपूर्वक प्रगती करत रहाणे, बदल करत राहणे, प्रयोग करत राहणे आवश्यक असते. प्रत्येक प्रयोगाच्या वेळी, तालमीच्या वेळी अतुल ज्या उत्कटतेने काम करतो त्यातून हे साध्य होते. 'सूर्य पाहिलेला माणूस' या नाटकातील डॉ. लागूंचा अभिनय अनेकांना भावला. त्याबद्दलची माझ्या एक-दोन आठवणी याच्याशी संबंधित आहेत. अगदी रंगीत तालमीपर्यंत माझ्याकडून काही बदल अतुल लिहून घेत होता, वा मला सुचलेले प्रत्यक्षात नटांकडून करवून घेत होता. डॉ. लागूंकडे मी दुसऱ्या का तिसऱ्या प्रयोगानंतर एकदा सहज, प्रयोगाबद्दल, त्यांच्या अभिनयाबद्दल समाधान व्यक्त करणारे संभाषण केले तेव्हा डॉक्टर मला म्हणाले, 'अरे पन्नासाव्या, पंचाहत्तराव्या प्रयोगापर्यंत थांब. मग बघ मी किती खोलवर जातो ते!' हीच निर्मितीप्रक्रिया अतुलचीही आहे. 'ठोंब्या' या नाटकाच्या, आत्ता नक्की आठवत नाही पण, २५-२६ व्या प्रयोगातून त्याचा प्रत्यय आला. त्याची भावनिक गुंतवणूक प्रयोगातही मोठीच असते. किंबहुना १९८६ सालाच्या आसपास 'क्षितिज'मधला किंवा नंतर ८९साली 'सावतेकराचं मूल' या नाटकादरम्यानचा अतुल आठवून आम्ही आजही त्याची गमतीने टिंगल करतो, इतका तो त्या वेळी 'उत्कट' असायचा. प्रयोगादरम्यान उत्कटतेने भान हरपून स्वत:ला जखम होऊन, 'रक्तरंजित' अवस्थेत रंगमचांवर वावरणे इत्यादी अनेक गमतीच्या गोष्टी आठवतात. पण आज त्या उत्कटतेला एक बुद्धीचा अंकुश बसून, वरील गोष्टी साध्य करणारी एक व्यवस्था त्याने दिग्दर्शक व नट म्हणून तयार केली आहे हे अशा आठवणींपेक्षा जास्त महत्त्वाचे. आणि एवीतेवी अशा हजार आठवणी, अनेक्डोट्स आहेत. ते लिहिण्यात मला आज तरी किंचितही रस नाही. तेव्हा इतर महत्त्वाच्या मुद्द्यांकडे वळतो.

प्रायोगिक/गंभीर नाटक लोकांपर्यंत पोचावं यासाठी अतुलने आयोजनाचे आडाखे बांधले व त्याला एक संस्थात्मक स्वरूप दिले हा मुद्दा मी सुरुवातीलाच मांडला. त्यामागे जसे त्याचे तांत्रिक संघटनाकौशल्य आहे तसेच किंबहुना त्याहूनही महत्त्वाचा त्याचा लोकसंग्रह आहे. एकाच नाटकात—त्याही प्रायोगिक—डॉ. लागू आणि निळू फुले या दोन दिग्गज नटांना घेऊन त्याचे अनेक प्रयोग यशस्वी करून दाखवणे ही सोपी गोष्ट नाही. या दोघांनी केवळ त्यांच्या नेहमीच्या तडफेने कामच केले असे नव्हे तर ते एकाच वेळी अतुलच्या प्रेमातही पडले! हे कसे जमते ही माझ्यासारख्याला अनाकलनीय बाब आहे. गजानन परांजपेसारख्या अप्रतिम अभिनयक्षमता असणाऱ्या नटाला — पण एकंदरीने वर्षानुवर्षे उपेक्षित असणाऱ्या नटाला—अतुलने अत्यंत महत्त्वाच्या भूमिका दिल्या. ('ठोंब्या' या मी लिहिलेल्या व दिग्दर्शित केलेल्या नाटकापासून एका अर्थी या एकत्रित काम करण्याची सुरुवात झाली.) अनेक तरुण, शहरातले-गावातले-खेड्यातले, कार्यकर्ते, निरनिराळ्या व्यवसायातली, वयाची माणसे अतुलकडे एखाद्या लोहचुंबकाकडे लोखंडाने खेचले जावे तशी खेचली जातात. हे एका अर्थी 'राजकारणच' आहे. पण निर्मितीच्या उद्देशाने केलेले खरोखरच माणसात रमणाऱ्या एका व्यक्तीने केलेले राजकारण आहे. नाटक हा एकट्याचा खेळ नाही. त्यातली यशस्वी माणसे -


'शीतयुद्ध सदानंद' या नाटाकतील दृश्य

विशेषत: दिग्दर्शक—स्वत:च एक संस्था बनत असतात. माझ्यासारख्याला ज्यांचे दडपण येते, किंवा भीती वाटते अशा लागू, निळूभाऊसारख्यांपासून, गजानन परांजपेंसारख्या दडलेल्या मौल्यवान अभिनेत्यापासून, तरुण वर्गापर्यंत, सर्वांपर्यंत तो सहज जाऊन पोचतो. तसेच त्याने ज्यांची नाटके केली त्यातील अनेक लेखकही मोठे आणि म्हणून दडपण यावे असे, पण अतुलने ते पेलले खरे. कसे ते माझ्यासारख्याला न उमगण्याजोगे.

यावरून एक आठवण झाली. अतुलने गेल्या वीस वर्षांत अनेक लेखकांची नाटके केली. त्यात बेकेटच्या 'अॅब्सर्ड' रंगभूमीपासून ते गो. पु. देशपांडे, सदानंद मोरे यांसारख्या विचारवंतांच्या राजकीय नाटकांपर्यंत नाटके येतात. श्याम मनोहर हा तर वेगळाच विषय होईल. एलकुंचवारांचे नाटक करावे असे त्याच्या अनेक दिवस मनात आहे. भविष्यात लवकरच कधी ना कधी तो योग येईल अशी मला आशा आहे. प्रश्न असा पडतो की इतक्या विविध विचारधारांना, अभिव्यक्ती पद्धतींना तो कसा भिडू शकतो? एक वाचक म्हणून, वा प्रेक्षक म्हणून मीही आपल्या सगळ्यांप्रमाणे वैविध्यपूर्ण कलाकृतींना भिडू शकतो. नट हाही शेवटी नाटकातली एक व्यक्तिरेखा साकारत असतो. दिग्दर्शकाला मात्र लेखकाची जीवनदृष्टीच काही प्रमाणात आत्मसात करावी लागते. आणि केवळ निरनिराळ्या प्रकारची नाटके करून पहायची—एक हवेतली प्रायोगिकता म्हणून—अशी त्याची वैचारिक ठेवण आहे असे मला वाटत नाही. पूर्वी असे प्रयोग झाले आहेत. म्हणजे लेखकाने—यात मी चांगला/सच्चा लेखक गृहीत धरतो आहे—स्वत:ला जीवनातील असंगतीचे तीव्रतर दर्शन झाले तरच असंगतीचे नाटक लिहावे असे आपण मानतो. तरच ते चांगले होते. उदा. वेटिंग फॉर गोदो. ते केवळ आता 'हेही एक करून बघतो' म्हणून नसावे. चांगल्या लेखकाचे तसे नसते. तसेच दिग्दर्शकाचेही नसावे. म्हणजे त्याने एकच एक लेखक घेऊन बसावे असे नव्हे. त्याचा खरा अर्थ असा की कुठलेही नाटक त्याने स्वत:च्या 'जीवनदृष्टीतून' उलगडून दाखवावे, इंटरप्रीट करावे. परदेशात असे प्रयत्न होतात. एक नाटक अनेक दिग्दर्शक आपापल्या पद्धतीने, अगदी संहितेची पूर्णत: मोडतोड करून करतात. आपल्याकडे एकच नाटक वेगवेगळ्या प्रकारे इंटरप्रीट करावे, वेगळे अर्थ निरनिराळ्या दिग्दर्शकांना लागावेत असे फारसे दिसत नाही. एखादा पं. सत्यदेव दुबे यांचा अपवाद. बाकी 'बाबा वाक्यं प्रमाणम्' म्हणत लेखकाच्या मागे जातात. अगदी एखादा तरुण दिग्दर्शक तेंडुलकरांचे 'शांतता कोर्ट चालू आहे'सारखे अद्भुत नाटक परत 'जसेच्या तसे' बसवून दाखविण्यात आनंद मानतो, तेही अशा निर्मात्यासाठी—उदा. एखादी नाट्यशिक्षण संस्था—की जेथे प्रयोग करण्याची पूर्ण मुभा असते, किंबहुना तशी अपेक्षा असते, पैसे परत मिळविण्याची बंधने नसतात. अशी परिस्थिती आहे. अतुलने केलेल्या विविध संहितांत एक धागा आढळतो. त्यामुळे एकंदरीने 'चला हेही करून बघू' असे नसावे अशी अटकळ बांधता येते. पण एवढी लवचीकता मला काहीशी अचंबित करते. मग एखाद्या मोठ्या क्लासिकल, नाटकाचा वेगळा अर्थ त्याला लागतो असेही होते का? अतुलनेच पूर्वी एका लेखाद्वारे दिग्दर्शकांनी विविध प्रकारच्या संहिता हाताळताना निर्माण होणाऱ्या प्रश्नांबद्दल काही टिप्पणी केली होती. आता या टप्प्यावर त्याचे याबाबत काय विचार आहेत हे कळून घ्यायला सगळ्यांनाच आवडेल. एकंदरीने आपल्या आवाक्याचा विस्तार व्हावा हे चांगलेच, हे मला मान्य आहे. वाचक/



*'वेटिंग फॉर गोदो' या नाटकातील दृश्य*

प्रेक्षक म्हणून तर तो असावाच. प्रश्न स्वत: निर्मिती करण्याबाबत असतो. लेखक असे करताना दिसत नाहीत. फार तर त्यांच्या आयुष्यात दोन तीन टप्पे दाखवता येतील. 'कोणताही लेखक एकच गोष्ट परत परत सांगत असतो, वेगळ्या कोनातून, व्याप्तीतून, खोलीतून मांडत असतो' असेही म्हणतात. हे निदान काही प्रमाणात खरे असेल तर मग दिग्दर्शक—जो संहितेतील जीवनदृष्टी अंगीकृत करून गंभीरपणे निर्मिती करतो असा अतुलसारखा दिग्दर्शक— जेव्हा अनेक प्रकारच्या संहिता त्या त्या लेखकांना न्याय देण्याचा परंपरागत प्रयत्न करत हाताळतो तेव्हा निश्चित अनेक प्रश्न उद्‌भवत असतात. मला दिग्दर्शकांची ही ओढ समजू शकते. वाचक म्हणून मला अनेक प्रकारची नाटके आवडू शकतात, मी त्यांच्याशी सह-अनुभूत होऊ शकतो, असे असले आणि मी दिग्दर्शक असतो, तर ती सादर करण्याचा मोह होणारच. पण निर्मिती करत असता मी माझी जीवनदृष्टी किती वाकवू शकतो? आपल्याकडे दिग्दर्शक किती प्रमाणात स्वत:च्या जीवनदृष्टीतून—म्हणजे 'सहजपणे'— स्वतंत्र अर्थनिर्मिती करतात? असे प्रश्न मला पडतात. अतुलसारख्या संवेदनक्षम दिग्दर्शकाला ते पडले असणारच. त्याची उत्तरेही निदान त्याच्यापुरती त्याच्याकडे असणारच याची मला खात्री आहे. या विषयाचा ऊहापोह त्याने एकदा खोलात जाऊन केला तर तो लेख सर्वांनाच मोठा उद्‌बोधक ठरेल.



'वेटिंग फॉर गोदो' या नाटकातील दृश्य

मुद्दे तर अनेक आहेत. परंतु लेखाच्या व्याप्तीला काही मर्यादा असतातच. तेव्हा एक शेवटचा मुद्दा मांडतो. यासाठी अतुलची निवड मीही केली असती या विधानाला कारणीभूत असा हा महत्त्वाचा मुद्दा आहे. तो म्हणजे अतुलचे सामाजिक क्षेत्रातील कार्य आणि नाट्यक्षेत्रातील त्याच्या कार्याशी या कार्याचा असणारा एकसंधपणा. ते सर्वार्थाने 'शिवणरहित, (सीमलेस) आहे. आपण या समाजाचा हिस्सा आहोत, त्यातून माझ्या व्यक्तिमत्त्वाला अर्थ प्राप्त होतो ही जाणीव; नाटक किंवा निर्मिती ही काही रोजच्या जीवनापासून तुटलेली, केवळ मनोरंजन करणारी गोष्ट नाही तर ती माझ्या विचारसरणीशी, जीवनाशी निगडित असल्याने 'स्वभाव आणि परिस्थिती-भान' देणारी अशी महत्त्वाची गोष्ट आहे ही धारणा, एकंदरीने लोकसंग्रह करण्याकडे असणारा ओढा, निर्मिती आणि जीवन दोन्ही समरसतेने, उत्कटतेने आणि कप्पेबंद न करता जगणे अशा अनेक मुद्द्यांशी ते निगडित आहे. सामाजिक, राजकीय कार्यात रस असणे, त्यात निदान काही प्रमाणात प्रत्यक्ष



'वेटिंग फॉर गोदो' या नाटकातील दृश्य

भाग घेणे ही महाराष्ट्रात फार सर्रास होणारी गोष्ट नसली तरी अगदीच दुर्मीळ घटनाही नव्हे. इतर साहित्यप्रकार वा कलाप्रकार क्षणभर बाजूला ठेवून केवळ नाट्यकर्मींकडे पाहिले, तरी सामाजिक कार्यात वा राजकीय वैचारिक योगदानात सक्रिय भाग घेणारे म्हणून तेंडुलकर, गो. पु. देशपांडे, श्रीराम लागू, निळू फुले अशी अनेक नावे डोळ्यांसमोर येतात. तेव्हा ही परंपरा अतुलला लाभलेली आहे. त्यातही त्याचे एक वेगळेपण आहे असे मला वाटते. उदा. नाट्यमाध्यमाद्वारे निधिनिर्मिती करून तो निधी सार्वजनिक कार्यातील व्यक्तींना वा संस्थेला देणे. हे पूर्वापार काही मंडळी नेकीने करीत आली आहेत. परंतु बहुतेकदा यासाठी जी नाटके केली जातात ती तद्दन व्यावसायिक—कधी कधी तर ऑर्केस्ट्रा इत्यादी—अशा स्वरुपाची असत. अतुलने पहिल्यांदाच सामाजिक-राजकीय मांडणी करणाऱ्या विचारोन्मुख नाटकांच्या प्रयोगांतून हे साध्य करण्याचा प्रयोग केला. माझ्या माहितीप्रमाणे याची सुरुवात प्रथम 'सूर्य पाहिलेला माणूस'पासून झाली. अतुलच्या डोक्यात हे विचार त्याआधीपासूनच येत असावेत. नाट्यक्षेत्रातल्या मंडळींचा, नाट्यकर्मींचा सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांशी संबध जोडला जावा आणि तसाच उलट प्रवासही व्हावा असा त्यामागे विचार होता, आणि तो मला अत्यंत महत्त्वाचा वाटतो. नाटक, साहित्य, सिनेमा या विचारप्रवृत्त करणाऱ्या गोष्टी आहेत, सामाजिक-राजकीय भान निर्माण करणाऱ्या गोष्टी



*'वेटिंग फॉर गोदो' या नाटकातील दृश्य*

आहेत, त्याअर्थाने त्या जीवनावश्यक अशा अन्न, वस्त्र, निवारा या गोष्टींइतक्याच महत्त्वाच्या आहेत. कारण या जीवनावश्यक गोष्टी कोणाला किती प्रमाणात मिळाव्यात हे आज आपली राजकीय-सामाजिक व्यवस्थाच ठरवते. (आर्थिक पिळवणुकीपासून ते जाती, लैंगिक अशा सामाजिक उतरंडीपर्यंत) हा येथील समाजात तर जाऊच द्या, पण बहुतेक लेखक वा नाट्यकर्मींमधेही रुजलेला समज नाही. या पार्श्वभूमीवर अतुलचे हे कार्य अत्यंत महत्त्वाचे आहे असे मला वाटते. प्रत्यक्ष समाजकार्यातही—मग ते 'आरोग्य संवादा'सारखे सामाजिक काम असो वा विविध जनवादी संघटनांचे राजकीय—सामाजिक कार्य असो त्याचा प्रत्यक्ष सहभाग-आणि तिथेही नाटक हे माध्यम कसे उपयोजिता येईल याचा विचार हे मला अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण वाटते.

वैशिष्ट्ये तर खूप आहेत. पण आता आवरते घेतो. आपण ज्या व्यक्तीबरोबर वर्षानुवर्षे अत्यंत जवळून काम करतो, अशा व्यक्तीबद्दल एवढे कौतुकाचे लिहिणे अवघडच असते! खरे असले तरीही. 'अतिपरिचयात अवज्ञा' होतच असते. पण तरी लिहिले ते सर्व खरे लिहिले, जवळचा म्हणून नव्हे. किंबहुना मला माझ्या या मित्राच्या, सहकाऱ्याच्या अनेक गुणांबद्दल परत एकदा सजगता आली. नेहमीच्या व्यवहारात, एकत्र काम करत असता अनिवार्यपणे होणाऱ्या मतभिन्नतांमध्ये ही जाण कधी कधी हरवून जाते की काय असा प्रश्न पडतो. पण तेही खरे नव्हे. अन्यथा एवढी वर्षे एकत्र काम करून अजूनही करत रहावे असे वाटलेच नसते. पण ही परत झालेली आठवण हा माझा व्यक्तिगत फायदा. त्याच्यासारखा सहकारी अनेक वर्षे मिळावा हे मोठे भाग्य आहेच.

अतुलचे परत एकदा अभिनंदन. त्याच्या हातून असेच कार्य भविष्यातही घडत राहो अशी शुभेच्छा.

# कलावंत समीक्षक असतो : माणसाचा नि राष्ट्राचाही

**महाराष्ट्र फाउण्डेशनचा 'गौरव पुरस्कार' स्वीकारताना**
**बाबूराव बागूल यांनी केलेले भाषण**
**(७ जानेवारी २००६, मुंबई)**



बंधू-भगिनींनो,

महाराष्ट्र फाउण्डेशनचा 'गौरव पुरस्कार' देऊन आपण माझा गौरव केलात, याबद्दल मी आपले मनापासून आभार मानतो. एखाद्या व्यक्तीच्या जीवनशैलीच्या समग्र व्यवहाराचे मोजमाप करून असा पुरस्कार दिला जातो, याची जाणीवही मला आहे. या जाणिवेपोटी आनंद होणेही स्वाभाविक आहे. माझ्यावरील आपल्या प्रेमाने खरे तर मी भारावून गेलो आहे.

ज्या वास्तवाशी मला संघर्ष करावा लागला ते वास्तव आज तेवढ्या प्रमाणात राहिलेले नाही. एका गरीब, भाबड्या आणि वंचित कुटुंबात माझा जन्म झाला तेव्हा डॉ. आंबेडकर आणि कॉम्रेड डांगे यांच्या चळवळी महाराष्ट्रात वेगवान होत्या. कामगार, कष्टकरी यांचे सर्वच पातळ्यांवर शोषण करणाऱ्या गोष्टी माझ्या मनाला विषण्ण करीत होत्या. या निरीक्षणातून आणि जगण्यातून माझे लेखन घडले. दुसरीकडे जागतिक पातळीवर नवनवे बदल घडत होते. सत्तांतरे होत होती. भारतात इंग्रजांनी सुधारणेचे, औद्योगिकीकरणाचे वातावरण निर्माण केले होते. या पार्श्वभूमीवर माझी वाचक, लेखक आणि कार्यकर्ता म्हणून भूमिका आकार घेत होती. मराठी साहित्यातील नायक, नायिका, इतर पात्रे मला समाधान देत नसत. या साहित्यात परिवर्तनीय असे काहीच घडत नाही. आपण ते घडवावे, या जाणिवेने मी लिहिता झालो. कार्यकर्ताही झालो. महात्मा फुल्यांच्या प्रभावी विचारांनी मी झपाटलो होतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कृतिशील चळवळीने मला कार्यकर्ता बनविले.

भारतीय तत्त्वज्ञानाच्या परंपरेतील विविध विद्वानांचे, लेखकांचे साहित्य मी अधाशासारखे वाचून काढले. या प्रवासात स्वत:चा चेहरा समाजाच्या चेहऱ्याशी सांधू लागलो.

आज जग झपाट्याने बदलत आहे. ज्ञान-विज्ञान-तंत्रज्ञानाच्या कक्षा दिवसागणीक रुंदावत आहेत, तर दुसरीकडे महाशक्तीच्या विस्तार-हव्यासामुळे युद्धे होत आहेत. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात जगाला असंतोषाने ग्रासले आहे. या पार्श्वभूमीवर जागतिक साहित्यही बदलत आहे. आपला देश मात्र बहुअंशाने त्या बदलत्या गोष्टींपासून, का कोणास ठाऊक, बराच लांब आहे. याचे कारण येथील जात, वर्णव्यवस्था हे आहे. भारतीय समाजाची मानसिकता अजूनही जातीला, वर्णाला घट्ट बिलगून आहे. जातीय-सांप्रदायिक दंगे ही त्याची उदाहरणे होत. यामुळे भारतीय साहित्य अधिक क्रांतिप्रवण होऊ शकले नाही; पण बुद्धाच्या तत्त्वज्ञानामुळे सामाजिक समतेचा विचार अजूनही आपल्याकडे टिकून आहे, ही त्यातल्या त्यात समाधानाची बाब आहे, असे मानले पाहिजे. भारतीय साहित्य अधिक गतिमान करण्यात शोषित, सर्वहारा, वंचित, उपेक्षित समाजाचे फार मोठे योगदान आहे, ही बाब मान्य करावी लागते. या वर्गाचे नेतृत्व विसाव्या शतकात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याकडे येणेही स्वाभाविक आहे. त्यांच्या प्रेरणेतून दलित साहित्याची निर्मिती झाली. मी केवळ त्यांच्या प्रेरणांना गती देण्याचा प्रयत्न केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महानिर्वाणानंतर माझ्यासारख्या लेखक-कार्यकर्त्यांनी दलित साहित्याची चळवळ सुरू केली. या चळवळीत डॉ. म. ना. वानखेडे, रा. ग. जाधव यांच्यासारख्या प्रज्ञावान मंडळींचे योगदान महत्त्वाचे ठरते. आता आपण सर्वांनी दलित साहित्याचे आंबेडकरवादी साहित्य असे नामांतर केले आहे. धम्मचक्र प्रवर्तनाच्या पुढील सुवर्णमहोत्सवी काळात बाबासाहेबांना ही खरी आदरांजली ठरावी. त्यांच्या तसेच महात्मा फुले, गौतम बुद्ध यांच्या

विचारधनाची जपणूक करत नवे मन्वंतर घडवून आणण्याची संधी आपल्याला प्राप्त झाली आहे. दुःख, दैन्य, दास्य यांच्या निर्मितीची समाजव्यवस्था नष्ट करण्याचा निर्धार आपण केला पाहिजे. या प्रवासात जे जे सामील होतील त्यांचे स्वागतही केले पाहिजे. आजचे वास्तव बहुआयामी असे आहे. भारतीय समाज बदलू पाहत आहे. यातून नवे संस्कृतिसंघर्ष जन्म घेत आहेत. हिंदू धर्मातील जात वास्तवाला कंटाळून लहान लहान गट धम्मात प्रवेश करण्याची तयारी करीत आहेत. हा मोर्चा आंबेडकरी विचारांकडे त्यांनी वळविला आहे. या कार्यात नवे लेखक-कार्यकर्ते स्वत:ला झोकून देत आहेत. या त्यांच्या कृतीमुळे एक विशाल समाज एका धम्मविचाराला कवटाळीत आहे, हे निश्चितच क्रांतिकारी समजले पाहिजे. समाज-विकासासाठी हव्या असणाऱ्या आदर्शांचा स्वीकार होतो आहे, याचे मनापासून स्वागत केले पाहिजे.

याउलट प्रतिक्रियावादी शक्ती अधिक जोमाने कार्याला लागलेल्या दिसतात. हिंदूराष्ट्रनिर्मितीच्या भूमिकेचा प्रचार आणि प्रसार करणारी मंडळी आक्रमक होत आहेत. धर्माधिष्ठित समाजरचनेला जाती-वर्ण यांचा आधार मजबूत करण्याचा या मंडळींचा प्रयत्न आहे. या संघर्षाला सांस्कृतिक पातळीवर उत्तरे देण्याची जबाबदारी आपल्यावर येऊन पडली आहे. आपण लोकशाही-समाजवादी विचार जीवनपद्धती स्वीकारलेली आहेत. एकीकडे मूलतत्त्ववाद आणि दुसरीकडे लोकशाहीवादी मूल्यरचना यांच्या संघर्षात लेखक-कार्यकर्त्याने सजग राहणे गरजेचे आहे.

भारताचा इतिहास पराभवाचा आणि पारतंत्र्याचा इतिहास आहे. अनेक शतके भारत पारतंत्र्यात राहिला. या कारणाचा शोध घेतला, तर उत्तर एकच येते. जातिव्यवस्था असल्यामुळे भारताचा सतत पराभव झाला. लोकांना एकत्र येऊ न देण्याचे, बंधुभाव निर्माण न होऊ देण्याचे धोरण इथल्या व्यवस्थेने ठरवले होते. आपल्या सामाजिक व्यवस्थेच्या रचनेत सहा हजार जाती आणि हजार जमाती होत्या. त्यांना एकत्र येऊ दिले नाही. हिंदू धर्मामुळे या देशाची प्रगती किंवा ज्ञान-विज्ञानाचा विकास झाला नाही... तसेच क्रांत्याही होऊ शकल्या नाहीत. येथे जेव्हा-जेव्हा क्रांती आकारास आली, त्या-त्या वेळी ती मारली गेली. असे युरोप किंवा अमेरिकेत झाले नाही. त्यामुळे जगात इतरत्र क्रांत्या झाल्या. युरोपमध्ये प्रगती होऊन इतिहास घडला; पण तसे भारतात घडू शकले नाही.

जिथे बुद्धाचा धम्म आणि धम्माची संस्कृती होती तेच देश जगात प्रगतीचे अत्युच्च शिखर गाठू शकले, ही वास्तविकता आहे. उदाहरणार्थ, चीन, जपान, व्हिएतनाम, सिलोन, ब्रह्मदेश, कोरिया. या देशांतील तळागाळातल्या समाजाने राष्ट्र निर्माण केले आहे. चीन आणि जपान तर जगातील महासत्ता म्हणून उदयाला आलेले आहेत. भारतात हे का घडू शकले नाही? कारण भारतातच जन्मलेली ही धम्मसंस्कृती भारतातूनच हद्दपार करण्यात आली होती. इथल्या प्रस्थापित समाजव्यवस्थेने सर्वाधिक बंधने घातली ती समस्त स्त्री समाजावर. असे का? मला वाटते जातिव्यवस्था टिकवून ठेवण्याचे एक साधन म्हणून स्त्रीचा विचार झाला. स्त्री स्वतंत्र झाली, स्वत:चे निर्णय स्वत: घेऊ लागली, तर जातिसंकर होऊन ती जातिव्यवस्था नष्ट करील, या भीतीपोटीच इथल्या वर्णव्यवस्थेने स्त्रीला कायम पारतंत्र्यात ठेवलेले दिसते.

१९२७ साली महाडच्या चवदार तळ्याचा सत्याग्रह करून पाणी पिण्याच्या हक्कावर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्कामोर्तब केले. जगाच्या पाठीवर अशा प्रकारची कुठलीही क्रांती घडली नाही. आपल्या देशात हिंदू वर्णवर्चस्ववादी धर्म-संस्कृतीने माणसाला आणि मूळ निवासी समाजाला नेहमीच गौणत्व दिले आहे. ही अवस्था शतकानुशतके चालू होती. याच्या मुळाशी हिंदू संस्कृती कारणीभूत मानली जाते. हे दुःख डॉ. आंबेडकरांना प्रथम दिसले आणि त्यासाठी त्यांनी लढा पुकारला. हा लढा उभा राहिला आणि संपला असे झाले नाही, तर त्याचे रूपांतर इतिहासात झालेले आहे.

जगातील अनेक राष्ट्रांत ईश्वरशाहीविरुद्ध उठाव झालेले आहेत. भारतातही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९३० साली ईश्वरशाहीविरुद्ध मोठे बंड केले. नाशिक येथील काळाराम मंदिराच्या प्रवेशासंबंधीचे आंदोलन ईश्वरशाहीविरुद्ध पर्यायाने हिंदू संस्कृती, पुरोहितशाही, ब्राह्मणशाही यांविरुद्ध बंड होते. १९२७ आणि १९३० या त्यांच्या क्रांतिकारक चळवळीवर मराठी साहित्यात अजूनही चित्रण येत नाही. भारतीय साहित्यामध्ये अनेक कलावंत होऊन गेले. त्यांनी महाकाव्ये, महानाटके लिहिलेली आहेत; परंतु

एकाही प्रतिभावंताने देवदर्शनाला मनाई असलेल्या स्त्रीला नायिका केले नाही. तिला कथा, कादंबरी, नाटक, काव्य यामध्ये स्थान दिले नाही.
डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय राज्यघटनेमध्ये ही प्रथा मोडण्यासाठी कायदा केला आणि ते या विषयाचे नायक बनले. ही बाब भारतीय प्रतिभावंतांच्या अजूनही लक्षात आलेली नाही. स्त्रियांबद्दल अपार करुणा असलेल्या डॉ. आंबेडकरांनाही विद्यमान लेखकांना कथा, कादंबरीचा विषय करता आला नाही. त्यामुळे विचारधारा निर्माण झाली; परंतु महान कलाकृती मात्र निर्माण होऊ शकली नाही.

बाबासाहेबांनी हिंदू कोड बिल निर्माण केले आणि लोकसभेमध्ये मांडले; परंतु त्या परिस्थितीत हिंदू मानसिकतेने ते बिल मंजूर होऊ दिले नाही. परिणामी डॉ. आंबेडकरांनी आपल्या कायदामंत्रिपदाचा राजीनामा दिला. स्त्रियांच्या स्वातंत्र्यासंदर्भातील त्यांचा त्याग भारतातील समस्त स्त्रियांनी लक्षात घेऊन त्यांचे जाहीर ऋणी राहिले पाहिजे.

मित्रहो, १९६३साली माझे पहिले पुस्तक प्रकाशित झाले. वामन विष्णू भट माझे पहिले प्रकाशक होते. ते कम्युनिस्ट पक्षाचे सभासद होते. माझ्या पहिल्या पुस्तकाचे नाव *जेव्हा मी जात चोरली* असे होते. 'जात' हे भारतीय वास्तव आहे. जात हिंदू सामाजिकतेची वस्तुस्थिती आहे. हे सत्य असूनही भारतीय लेखकांनी जेवढ्या स्पष्टपणे मांडायला हवे होते तेवढे मांडले नाही. जात, जातिसंघर्ष, जातिद्वेष, जातिमत्सर जेवढा स्पष्टपणे मांडायला हवा होता, तेवढा मांडला नाही. जात रूढ असूनही, वास्तव असूनही हिंदू साहित्यामध्ये मोठ्या प्रमाणात तिचे चित्रण झालेले नाही. दोन जातींमधील संघर्षही चित्रित झालेला नाही. दोन जातींमधील स्त्री-पुरुषांचे प्रेमसंबंध, दोन जातींमधला द्वेष, मत्सर आणि भीषण संघर्ष अद्याप साहित्यात तीव्रपणे शब्दबद्ध झालेला नाही. जातिमत्सर, जातिद्वेष, जातिकलह, जातिसंघर्ष शब्दबद्ध करण्याचा मी प्रयत्न केलेला आहे. हे महान ज्ञान मला महाज्ञानी डॉ. आंबेडकरांकडून मिळालेले आहे. म्हणून माझ्या पहिल्या पुस्तकाचे नाव *जेव्हा मी जात चोरली* असे आहे. मी पहिला लेखक आहे, ज्याने जात हे वास्तव पाहिले आणि आपल्या कुवतीप्रमाणे साहित्यात मांडण्याचा प्रयत्न केला. या माझ्या प्रयत्नाला, माझ्या वैचारिक धाडसाला अजिबात प्रोत्साहन मिळाले नाही. कोणीही त्याचे कौतुक केले नाही. माझी कलात्मकता, माझे वाङ्मयकौशल्य याचे कौतुक झाले. माझ्या या पुस्तकाला राज्य पुरस्कार मिळाला; परंतु माझ्या वैचारिक, तात्त्विक, सैद्धान्तिक धाडसाचे मात्र कोणीही कौतुक केले नाही.

जात हे भारतीय वास्तव आहे. जातीमुळेच विधवा, बालविवाह आणि या विधवांचे जीवनचित्र करणारे वाङ्मय निर्माण झाले. मराठीत काहींनी तसा प्रामाणिक प्रयत्न केला. हिंदीत प्रेमचंद, बंगालीत शरच्चंद्र चटर्जी यांनी आपल्या साहित्यातून विधवांचे प्रश्न मांडण्याचा प्रयत्न केला.

स्त्रियांची सारीच दुःखे, स्त्रियांच्या वेदना, त्यांची दुरवस्था आदी जातसंस्थेने निर्माण केलेली आहे. जातीने भारतीय जीवनातील क्रांतिशीलता, गतिमानता आणि प्रगतिशीलता नाहीशी केलेली आहे. भारतीय समाज हजारो वर्षे गतिरोधात सापडलेला आहे. जातीमुळे हिंदू समाजातील क्रांत्या अपयशी ठरलेल्या आहेत. जात ही प्रगतीची विरोधक म्हणून पुढे आलेली आहे. जातीने व्यक्तीला आणि समाजाला कधीच पुढे नेलेले नाही. जातीने पुढे जाणाऱ्या इतर जातींनाही पुढे जाऊ दिले नाही. जात ही अशी प्रतिगामी, प्रगतीविरोधी, क्रांतीविरोधी कार्य करीत असते. तरीही ती टिकून आहे. याचे मुख्य कारण व्यक्तीच्या पाठीशी जात संख्याबळ उभी करते. हे संख्याबळ कधी कधी प्रगतीविरोधक असते; परंतु व्यक्तीचे रक्षण आणि विशेष करून जात नेहमीच स्त्रियांच्या विरोधी जाते. स्त्रियांना विरोध हे हिंदू संस्कृतीचे वैशिष्ट्य आहे.

माझ्या साहित्यातून मी जग आणि जीवन चालविणारी कर्तबगार स्त्री मांडलेली आहे. आजवर मनुप्रणीत साहित्यातून जो बहुजनवर्ग मांडला गेला नाही त्या वर्गातून आलेले अनेक नायक-नायिका मी प्रथमच अतिशय धाडसाने मांडण्याचा प्रयत्न केला आहे. उदाहरणार्थ, *अघोरी, मी जेव्हा जात चोरली होती, मरण स्वस्त होत आहे, सूड, कोंडी, अपूर्वा, आंबेडकर भारत, दलित साहित्य : आजचे क्रांतीविज्ञान, पावशा, वेदाआधी तू होता, सडवा* इत्यादी कथा, कादंबरी व कवितासंग्रह आदी माझ्या साहित्यातून हे आपणास निश्चितच पाहावयास मिळेल.

१४ ऑक्टोबरला नागपूरमध्ये डॉ. आंबेडकर यांनी बौद्ध धम्माची दीक्षा दिली आणि लाखो अनुयायी बौद्ध झाले. त्या घटनेला पन्नास वर्षे

होत आली आहेत. या घटनेचा अर्थ असा आहे; १९२७ ते १४ ऑक्टोबर १९५६ म्हणजे जवळ जवळ २९ वर्षे बाबासाहेबांनी लोकांना संघर्ष, आंदोलने, विचार आणि कार्यक्रम दिले आहेत. एकाच वेळेला १० ते १५ लाख लोक धम्म स्वीकारून एकत्र येतात ही साधी गोष्ट नाही. यासाठी बाबासाहेबांनी अनेक आंदोलने, अनेक सत्याग्रह, मोर्चे, सभा, बैठकी घेतल्या. लोकांना सतत चळवळीत ठेवले. आपण या सर्व गोष्टींची नोंद केली पाहिजे आणि ती करणे आवश्यक आहे. १९४४साली 'स्टेट अॅण्ड मायनॅरिटी' या निबंधामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जमिनीचे राष्ट्रीयीकरण, वित्तीय संस्थांचे राष्ट्रीयीकरण मागितले आणि चळवळीला, सरकारला एक राष्ट्रीय आर्थिक धोरण दिले आणि त्यातूनच पुढे दादासाहेब गायकवाडांनी भूमिहीनांचा लढा उभा केला आणि महात्मा गांधींच्या संघर्षापेक्षाही मोठा संघर्ष दादासाहेबांनी केला. लाखो लोक सत्याग्रहामध्ये सामील झाले आणि मनूने निर्माण केलेल्या दैन्य, दास्य आणि दुर्दैवावर मात केली. बाबासाहेबांचे अनुयायी बाबासाहेबांएवढे जनतेच्या सुख-दुःखाशी बांधलेले असते तर त्यांनी सतत जनतेच्या सुख-दुःखाचे प्रश्न उपस्थित केले असते. जमिनीच्या आर्थिक व्यवस्थेची डॉ. आंबेडकरांनी हवी ती पुनर्मांडणी केली असती, जातीय संघर्ष उभे केले असते, सामाजिक लढाया केल्या असत्या आणि त्या लढ्यामध्ये लक्षावधी लोक सहजासहजी सामील झाले असते. कारण मनूने दैन्य, दुःख, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक मांडणी केलेली होती. त्याविरुद्ध बाबासाहेबांना संघर्ष हवे होते. ते फक्त दादासाहेब गायकवाडांनी केले. बाकीच्या पुढाऱ्यांनी केलेच नाहीत. आमदारकीच्या, खासदारकीच्या चार जागांवरती हे तथाकथित पुढारी खूश झाले. बाबासाहेबांना हवा तो संघर्ष करण्याकरिता दलित तरुणांनी 'दलित पँथर'सारख्या संघटना उभ्या केल्या. त्याही संघटना बाबासाहेबांना अभिप्रेत असलेले लढे आणि प्रश्नांची सोडवणूक करू शकल्या नाहीत. त्यासाठी दादासाहेब गायकवाडांसारखे नेतृत्व पुढे यायला हवे होते, ते आले नाही. फक्त काही साहित्यिक जनतेशी बांधील राहिले. कमिटेड राहिले. त्यांनी तसे साहित्य निर्माण करणाऱ्या प्रयत्न केला परंतु त्यांच्याही लहानसहान इच्छा प्रस्थापित वर्गांनी पुऱ्या केल्यामुळे तेही प्रखर साहित्य निर्माण करू शकले नाहीत; म्हणजेच राजकीय नेते, कार्यकर्ते प्रश्नांची सोडवणूक करू शकले नाहीत. तसेच साहित्यिक, कवी, लेखकही करू शकले नाहीत.

स्वातंत्र्य मिळून पन्नास वर्षे झाली तरीही मनूने निर्माण केलेले दैन्य, दास्य आणि दारिद्र्याचे समूळ उच्चाटन झालेले नाही. तो प्रश्न स्वातंत्र्यानंतर अजूनही रेंगाळत पडलेला आहे. परंतु हा नकार कायमस्वरूपी नसेल. राजकीय कार्यकर्त्यांतून, लेखकांतून, कवी, कलावंतांतून कोणी ना कोणी मोठा येईल आणि जनतेचे मनोरथ पूर्ण करेल. जगामध्ये नेहमीच असे घडत आलेले आहे. या युगात नाही तर त्या युगात कोणीतरी लेखक पुढे येतो आणि जनतेच्या भावना व्यक्त करतो. तसे घडल्याशिवाय राहणार नाही. शेकडो वर्षांनंतर डॉ. आंबेडकर आले आणि त्यांनी क्रांतीच्या जोरावर इथली व्यवस्था बदलली. त्यानंतर अनेक लेखक, कवी पुढे आलेले आहेत. वामनदादा कर्डक जनतेच्या मनोभावना व्यक्त करणारे लोककवी म्हणून पुढे आले, तसेच अण्णा भाऊ साठे, शाहीर अमर शेख पुढे आले. तसाच एखादा मोठा कादंबरीकार पुढे येईल आणि दुसरा आंबेडकर होऊन जाईल याबद्दल मला शंका वाटत नाही. कारण जनता अमर असते. जनतेचे लढेही अमर असतात आणि ते कधी ना कधी उठून उभे राहतात आणि वास्तव समाजजीवन बदलण्याचा प्रयत्न करीत असतात. भारतात ते झाल्याशिवाय राहणार नाही, असा माझा विश्वास आहे.

मित्रहो, कलावंत हा केवळ कलावंत नसतो. तो माणसाचा, समाजाचा, धर्माचा, राष्ट्राचा समीक्षक असतो, सुधारक असतो. तसाच तो राष्ट्राचा नवनिर्माताही असतो. माझ्या साहित्याची प्रेरणा डॉ. बाबासाहेब आंबेडकर असल्याने ही माझी भूमिका अशी आहे. मला मिळालेला हा सन्मान बुद्ध, फुले, शाहू, आंबेडकरांच्या वैचारिक प्रेरणांनी निर्माण झालेल्या अनेक साहित्यिक, विचारवंत, परिवर्तनवादी कवी-कार्यकर्ते, कलावंतांचा प्रातिनिधिक सन्मान आहे, असे मी मानतो. या सर्व विचारांचा सन्मान आज होतो आहे याचा आनंद व्यक्त करून मी आपल्या सर्वांचे पुन्हा एकदा आभार मानतो आणि इथेच थांबतो.

जय भीम, जय बुद्ध, जय भारत.




केशव गोरे स्मारक ट्रस्ट

केशव ऊर्फ बंडू गोरे हे महाराष्ट्रातील समाजवादी चळवळीतील एक तेजस्वी व्यक्तिमत्त्व होते. भारतीय स्वातंत्र्य चळवळ, गोवा मुक्ती आंदोलन यातील त्यांच्या सहभागाबरोबरच मुंबईतील कामगार चळवळीतील त्यांचे योगदान मोलाचे आहे. मुंबई महापालिकेतील सफाई कामगार, तसेच असंघटित कष्टकऱ्यांना संघटित करण्यात केशव गोरे आघाडीवर होते. त्यांनी लिहिलेला 'आंतरराष्ट्रीय समाजवाद' हा ग्रंथ त्यांच्या व्यासंगाची झलक दाखवतो. १९५८ साली त्यांचे अल्पवयात निधन झाले. केशव गोरे यांच्या अकाली निधनानंतर त्यांचे चळवळीतील सहकारी व मित्र यांनी 'केशव गोरे स्मारक ट्रस्ट'ची स्थापना केली. ट्रस्टतर्फे समाजपरिवर्तनाच्या दृष्टिकोनातून प्रबोधनात्मक तसेच रचनात्मक आणि सेवाभावी कार्यक्रम राबवले जातात. ट्रस्टचे एक संदर्भ ग्रंथालय असून विविध सामाजिक शास्त्रांच्या संदर्भातील सुमारे ५,५०० ग्रंथ या ग्रंथालयात उपलब्ध आहेत. राजकीय, सामाजिक, अभ्यासू कार्यकर्ते व संशोधन करणारे विद्यार्थी यांना या सोयीचा लाभ मिळत आहे.

संशोधनाच्या कार्याला उपकारक व्हावे म्हणून ट्रस्ट एक डॉक्युमेंटेशन सेंटर चालवते. या केंद्रात सुमारे २०० विषयांवरील नियतकालिकांतील कात्रणे रीतसर जतन केली जातात. क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जन्मदिनाच्या अनुषंगाने व्याख्याने आयोजित केली जातात. ट्रस्टतर्फे महत्त्वाच्या सामाजिक विषयांवर पुस्तिका प्रकाशित करण्यात येतात. परिसंवाद, चर्चासत्रे, शिबिरे अशा विविध माध्यमांतून विचारमंथनाला चालना देणारे कार्यक्रम ट्रस्टतर्फे आयोजित करण्यात येतात.

मुंबईतील राहण्याच्या जागांच्या अपुरेपणामुळे विद्यार्थ्यांची होणारी गैरसोय लक्षात घेऊन ट्रस्टतर्फे अभ्यासिका चालविण्यात येते. आज ४०० विद्यार्थी या अभ्यासिकेचा लाभ घेत आहेत.

मुंबई महानगरपालिकेच्या उन्नत नगर, गोरेगाव (प.) येथील दोन प्राथमिक शाळा विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी ट्रस्टने दत्तक घेतल्या असून तीन डोंगरी (गोरेगाव) झोपडपट्टी विभागात व कल्याण केंद्राच्या इमारतीमध्ये बालवाड्या, २०० विद्यार्थी-विद्यार्थिनींकरता अभ्यासिका, क्षयरोग निवारण केंद्र, आरोग्य केंद्र, स्वयंरोजगार केंद्र असे उपक्रम ट्रस्ट चालवीत आहे. आरोग्य केंद्रामधील दंतविभागात दातावरील सर्व प्रकारच्या उपाययोजनांची व्यवस्था आहे. तसेच सर्व प्रमुख आजारांवर सल्ला देण्यासाठी विशेषज्ञ विशिष्ट दिवशी उपलब्ध असतात. ट्रस्टतर्फे डिसेंबर २००३पासून तीन डोंगरी भागात 'परिवार विकास कार्यक्रम' राबवला जात आहे. वस्तीतल्या समस्याग्रस्त कुटुंबांची निवड करणे, त्यांच्या समस्या समजून घेणे आणि त्यांना मार्गदर्शन करून या समस्या त्यांच्या त्यांनीच सोडवण्यास प्रेरित आणि प्रोत्साहित करणे असे या कामाचे स्वरूप आहे. सध्या एकूण १२१ कुटुंबांमध्ये हे काम चालू आहे.

ज्येष्ठ नागरिकांना ज्या शासकीय सवलती उपलब्ध होतात, त्याकरता त्यांना सक्षम अधिकाऱ्यांच्या सहीचे ओळखपत्र बहुधा आवश्यक असते. ते मिळवण्याकरता अशा ज्येष्ठ व्यक्तींना यातायात करावी लागते. त्यांची ही गरज लक्षात घेऊन ट्रस्टने २० रुपयांच्या नाममात्र शुल्कामध्ये अशी ओळखपत्रे मिळवून देण्याची व्यवस्था

२००४ पासून केली आहे. आजपर्यंत २७५० ज्येष्ठ नागरिकांनी याचा लाभ घेतला. तसेच, कायद्याचा योग्य सल्ला मिळणे हेही आता सामान्य माणसाच्या आवाक्यात राहीनासे होत असल्याने ट्रस्टने एक मोफत कायदा-सल्ला केंद्र याच वर्षी सुरू केले आहे. रोजगार मिळवण्याची क्षमता वाढविण्याच्या दृष्टीने श्रमिक विद्यापीठाच्या मदतीने इलेक्ट्रिशिअनचे, मेंदी नक्षीकामाचे प्रशिक्षण दिले जाते.

केशव गोरे स्मारक ट्रस्टने भाषेच्या दृष्टीने एक महत्त्वाचा उपक्रम जुलै २००५ पासून सुरू केला आहे. दिवंगत प्रा. सुहास गोळे यांच्या प्राध्यापक व विद्यार्थी मित्रांनी त्यांचे यथोचित स्मारक व्हावे, या उद्देशाने केशव गोरे स्मारक ट्रस्टचा एक उपक्रम म्हणून 'प्रा. सुहास गोळे भाषा शिक्षण केंद्र' चालू केले आहे. सुहास गोळे हे इंग्रजीचे सुप्रसिद्ध व्याख्याते होते. या केंद्राचे उद्‌घाटन डॉ. भालचंद्र नेमाडे यांनी केले. या केंद्रामार्फत प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांचे इंग्रजी व मराठी भाषेचे प्रशिक्षण, इंग्रजी संभाषण, प्रादेशिक भाषेत शिकलेल्या विद्यार्थ्यांना अकरावीत प्रवेश घेतल्यावर इंग्रजी भाषेच्या ज्या अनेक प्रकारच्या अडचणी येतात त्याकरता संभाषणात्मक इंग्रजीचा अभ्यासक्रम, जर्मन, जपानी, फ्रेंच, स्पॅनिश, रशियन यांसारख्या परकी भाषांचे शिक्षण असे उद्देश आहेत. त्यांपैकी केंद्राने शिक्षकांच्या मराठी-इंग्रजीच्या कार्यशाळा व जर्मन, जपानी, इंग्रजी संभाषण अभ्यासक्रम चालू केले आहेत.

गेल्या वर्षापासून केशव गोरे स्मारक ट्रस्टमध्ये 'रसिक चित्र मंडळ' या नावाने फिल्म सोसायटी सुरू करण्यात आली आहे. देश-विदेशातील विविध चित्रपट दाखवण्याबरोबरच चित्रपटाविषयी समज वाढवण्याचे उपक्रमही 'रसिक चित्र मंडळा'तर्फे घेतले जाणार आहेत.

वैद्यकीय चिकित्सा केंद्र, बालविकास केंद्र, बालवाड्या, प्रौढ साक्षरता वर्ग, दैनिके व नियतकालिके यांचे नि:शुल्क वाचनालय, व्यक्तिमत्त्व विकास प्रशिक्षण वर्ग, असे अनेक उपक्रम ट्रस्टतर्फे चालविले जातात. स्त्रियांसाठी कायदेशीर सल्ला देण्याचे व आवश्यक तेथे counselling करण्याचे 'स्वाधार' या संस्थेचे कार्य ट्रस्टच्या वास्तूतूनच केले जाते. 'महाराष्ट्र फाउण्डेशन'ने सुरू केलेल्या 'मराठी साहित्य पुरस्कार योजना', 'समाजकार्य पुरस्कार योजना' यांची कार्यवाही ट्रस्टकडून केली जाते. तसेच तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी कुटुंबीयांच्या पुढाकाराने सुरू झालेल्या अनुवाद-अनुदान योजनेची कार्यवाहीही ट्रस्टकडूनच केली जाते. या योजनेखाली तर्कतीर्थांच्या 'वैदिक संस्कृतीचा विकास' या ग्रंथाचा 'Development of Indian Culture : Vedas to Gandhi' हा एस.आर.नेने यांनी केलेला इंग्रजी अनुवाद तसेच त्यांच्या 'जडवाद' या पुस्तकाचा अरुंधती खंडकर यांनी केलेला 'Spiritual Materialism' हा इंग्रजी अनुवाद असे दोन अनुवाद प्रकाशित झाले आहेत. या योजनेचे स्वरूप २००४ पासून बदलले आहे.

वाई या गावातील सर्व शाळांमधून शालान्त परीक्षेत पहिल्या क्रमांकाने यशस्वी होणाऱ्या विद्यार्थ्याला व विद्यार्थिनीला शिक्षणाकरता येणारा पदवी/पदविकेपर्यंतचा फीचा खर्च करण्याकरता साहाय्य दिले जाते. अशा तऱ्हेने २००४ व २००५ या साली दोन विद्यार्थी व दोन विद्यार्थिनींना या योजनेतून साहाय्य करण्यात आले.

महाराष्ट्र फाउण्डेशनच्या साहाय्याने 'आगरकर विचार व्यासपीठ योजना' गेली पाच वर्षे केशव गोरे स्मारक ट्रस्टतर्फे कार्यान्वित झाली आहे. या योजनेखाली 'पुरोगामित्व म्हणजे काय?' (श्रुती तांबे), 'गुजरात : सत्य आणि फक्त सत्यच' (संपादक : अंजली मुळे, किरण मोघे, विद्या कुलकर्णी) या पुस्तिका प्रकाशित करण्यात आल्या. त्याचप्रमाणे या योजनेखाली सामाजिक परिवर्तनाला साहाय्यभूत होणारे परिसंवाद, कार्यशाळा, नियतकालिके वगैरेंसारख्या महाराष्ट्रातील उपक्रमांना आर्थिक साहाय्य दिले जाते.

ट्रस्टच्या १९६० साली बांधलेल्या वास्तूमध्ये व १९९९ साली गोरेगावातील तीन डोंगरी येथील झोपडपट्टीत बांधलेल्या वास्तूमध्ये ट्रस्टचे कार्य चालते.

❑

# महाराष्ट्र फाउण्डेशन

चैतन्याची फुलवा झाडे, द्या जगण्याला अर्थ नवा
अडले पडले उचला, ज्यांना आधाराचा हात हवा
— दिलीप वि. चित्रे

'महाराष्ट्र फाउण्डेशन' ही अमेरिकेतील मराठी माणसांची संस्था आहे. १९७८ साली या संस्थेची स्थापना झाली. समाजसेवेची भावना ही या संस्थेच्या स्थापनेमागील प्रेरणा आहे. समाजातील दुर्बल घटकांच्या समस्यांचे निवारण करून त्यांना स्वत:च्या पायावर उभे करण्याचा प्रयत्न ही संस्था गेली अठ्ठावीस वर्षे करीत आहे.

आदिवासींमध्ये शिक्षणप्रसार, अपंगांचे पुनर्वसन, गावातील आरोग्यसेवेची सुधारणा, शेतीतील उत्पादनवाढीचे प्रयोग यांसारखे समाजोपयोगी उपक्रम करणाऱ्या ध्येयवादी संस्थांना आर्थिक व श्रमदानाचे साहाय्य 'महाराष्ट्र फाउण्डेशन' या संस्थेद्वारे होत असते.

'महाराष्ट्र फाउण्डेशन'ने भारतातील सातशे पन्नासहून अधिक गरजू मुलांना आर्थिक साहाय्य केले आहे; सर्वांगीण विकासासाठी महाराष्ट्रातील बारा गावे दत्तक घेतली आहेत; जनकल्याण रक्तपेढीमार्फत महाड येथे 'एड्स चिकित्सा प्रयोगशाळा' स्थापन केली आहे. 'पूना ब्लाइंड मेन्स असोसिएशन'साठी एक रुग्णवाहिका घेऊन दिली आहे. महाराष्ट्रातील भूकंपग्रस्तांसाठी पाच लक्ष डॉलर्सचे, तर गुजरातमधील भूकंपग्रस्तांसाठी सव्वा लक्ष डॉलर्सचे साहाय्य केले आहे.

'महाराष्ट्र फाउण्डेशन'ने स्त्रियांचे सबलीकरण, शिक्षण, आरोग्य, पर्यावरण आदी क्षेत्रांत काम करणाऱ्या साठ स्वयंसेवी संस्थांना ६ लक्ष ८० हजार डॉलर्सच्या देणग्या दिल्या. याव्यतिरिक्त डिसेंबर २००४ मधील त्सुनामीची आपत्ती आणि जुलै २००५ मधला महाराष्ट्रातला पूर या दु:खद घटनांतील संकटग्रस्तांसाठी 'महाराष्ट्र फाउण्डेशन'ने तातडीने ७३ हजार डॉलर्सची रक्कम उभी केली.

'महाराष्ट्र फाउण्डेशन'ने 'भारत-वैद्य' (अनवाणी डॉक्टर) व 'मैत्रीण' हे दोन नवे प्रकल्पही गेल्या वर्षी हाती घेतले, तर 'समाज परिवर्तनासाठी माहिती तंत्रज्ञान' हा 'फाउण्डेशन'चा प्रकल्प आता दुसऱ्या टप्प्यात प्रवेश करत आहे. एक गाव - एक संगणक हा या प्रकल्पाचा पहिला टप्पा होता व त्याद्वारे आजपर्यंत ५९ खेड्यांना त्याचा लाभ मिळवून देण्यात आला आहे.

अशा रीतीने आजवर भारतातील चारशेहून अधिक संस्थांना ८७ लक्ष डॉलर्सहून अधिक रकमांच्या देणग्या दिल्या गेल्या आहेत. येत्या वर्षासाठी 'महाराष्ट्र फाउण्डेशन' पुढील प्रकल्प हाती घेत आहे : (१) मानवी अपव्यापाराचे नियंत्रण : भारतात या तऱ्हेच्या अपव्यापारातून दरवर्षी हजारो स्त्रिया वेश्याव्यवसायात आणल्या जात आहेत. त्यांतील ४०% प्रमाण १८ वर्षांखालील मुलींचे आहे. हा अपव्यापार थांबवण्यासाठी विविध उपायांचा अवलंब करणे व या व्यवसायातून बाहेर येणाऱ्या मुली/स्त्रियांचे पुनर्वसन करणे या हेतूने हा प्रकल्प योजला आहे. (२) बालिका-विवाह नियंत्रण : लातूरच्या 'ग्रामीण विकास लोकसंस्थे'च्या सहकार्याने १३ ते १६ वयोगटातील मुलींचा विवाह लावण्यास प्रतिबंध करणारा प्रकल्पही या वर्षी सुरू केला जात आहे. (३) निराधार महिला पुनर्वसन/ज्येष्ठ नागरिकांना काळजीवाहू सहकारी : या दुहेरी प्रकल्पातून निराधार परंतु सक्षम महिलांना एकाकी ज्येष्ठ नागरिकांसोबत राहून त्यांना साथ देणे व त्यांच्या आरोग्याची काळजी घेणे यासाठी प्रशिक्षण देण्यात येईल. पर्यायाने दोन्ही घटकांना त्याचा लाभ होईल.

विशेष अभिमानाची बाब म्हणजे या सर्व कामाची दखल घेऊन 'संयुक्त राष्ट्रसंघा'ने 'महाराष्ट्र फाउण्डेशन'ला Special Consultative Status हा विशेष दर्जा दिला आहे. यामुळे 'फाउण्डेशन'ला संयुक्त राष्ट्रसंघाने आयोजित केलेल्या स्वयंसेवी संघटनांच्या परिषदांना सल्लागार म्हणून उपस्थित राहता येणार आहे.

Invest in future
of those
with no future...
So they can reinvest

हे 'महाराष्ट्र फाउण्डेशन'चे घोषवाक्य आहे.

'महाराष्ट्र फाउण्डेशन'ला अभिप्रेत असणाऱ्या या समाज-परिवर्तनाचा वसा घेतलेल्या अनेक व्यक्ती व संस्था महाराष्ट्रात सतत कार्यरत आहेत. अशा संस्था व व्यक्ती यांच्या कार्याबद्दल वाटत असलेली कृतज्ञता अल्पांशाने का होईना, व्यक्त व्हावी या हेतूने श्री. सुनील देशमुख यांच्या पुढाकाराने १९९६ साली सुरू केलेली समाजकार्य पुरस्कार योजना या वर्षी दहाव्या वर्षात प्रवेश करत आहे.

समाजाच्या सांस्कृतिक विकासात व समाजाच्या घडणीत साहित्य व साहित्यिक यांचा मोठा वाटा असतो. मराठी साहित्यिक व साहित्य यांचे हे ऋण अल्पांशाने फेडावे, या भावनेने 'महाराष्ट्र फाउण्डेशन'ने १९९४ साली सुरू केलेली 'मराठी साहित्य पुरस्कार योजना' या वर्षी तेराव्या वर्षात पदार्पण करत आहे.

## महाराष्ट्र फाउण्डेशन
## मराठी साहित्य पुरस्कार योजना २००६
## निवड सल्लागार समिती

(भारत)



प्रा. चंद्रकांत केळकर
(अध्यक्ष)



सतीश काळसेकर
(निमंत्रक)



दत्ता भगत



अर्जुन डांगळे



नंदा खरे



राजन गवस



पुष्पा भावे



डॉ. रोहिणी तुकदेव



जयंत पवार

# महाराष्ट्र फाउण्डेशन
# मराठी साहित्य पुरस्कार योजना २००६
## निवड / सल्लागार समिती
(अमेरिका)



**सुनील देशमुख**



**दिलीप वि. चित्रे**
वास्तुविशारद, 'हिमगंध' हा कवितासंग्रह, 'ऐलतीरावर' व 'स्वर हे पश्चिमरंगी' या गीतांच्या दोन ध्वनिमुद्रिका. 'अलिबाबाची गुहा' हे दोन अंकी संगीतप्रधान नाटक. 'कुंपणापलीकडले शेत' या प्रातिनिधिक कथासंग्रहाचे जनक. 'कशासाठी कुणासाठी' या पुस्तकाचे संपादन व पुनर्लेखन



**राजन गडकरी**
'लीझार्ट' या वित्तसंस्थेतून अर्थविश्लेषक म्हणून निवृत्त. ललित व वैचारिक साहित्यात मनापासून रस



**रजनी शेंदुरे**
रा. शं. दातार नाट्य पुरस्काराच्या प्रवर्तक. या नाट्य पुरस्कारासाठी अमेरिकेतील निवड/सल्लागार समितीचेही काम पाहतात. शिवाय 'महाराष्ट्र फाउण्डेशन'च्या माध्यमातून ग्रामीण व शहरातील मागास भागातील गरजू विद्यार्थ्यांसाठी मदत कार्य



**विद्युल्लेखा अकलूजकर**
प्राध्यापिका, 'मेरा जूता है जपानी', आणि 'यथा काष्ठं च काष्ठं च', 'मेपलची पाने', 'कहाणी' अशी चार स्वतंत्र पुस्तके. आजीच्या सुपातील मोती *(गोमंतकीय म्हणींचा कथारूप परिचय)*, 'विदेशिनी' *(एकता त्रैमासिकातील बक्षिसपात्र कथांचा संग्रह)* ही संपादने. 'एकता' *(टोरांटो)* या त्रैमासिकाचे दीर्घकाळ सहसंपादन. 'शब्दवेध' हे 'साप्ताहिक सकाळ'मधील 'भाषावेध' सदराचे संकलन नुकतेच पुस्तकरूपाने प्रकाशित

# मराठी साहित्य पुरस्कार योजना २००६

'महाराष्ट्र फाउण्डेशन' ही अमेरिकेतील मराठी माणसांची संस्था आहे. १९७८ साली या संस्थेची स्थापना झाली. समाजसेवेची भावना ही या संस्थेच्या स्थापनेमागील प्रेरणा आहे. समाजातील दुर्बल घटकांच्या समस्यांचे निवारण करून त्यांना स्वत:च्या पायावर उभे करण्याचा प्रयत्न ही संस्था गेली अठ्ठावीस वर्षे करीत आहे.

श्री. सुनील देशमुख, कनेक्टिकट यू. एस. ए. ह्यांच्या एक कोटी रुपयांच्या उदार देणगीमधून प्रगतिशील मराठी साहित्याला प्रोत्साहन देणारी, मराठी साहित्य व साहित्यिक यांच्यासाठी प्रतिवर्षी सुमारे दहा लक्ष रुपयांचा विनियोग करण्याची एक योजना १९९४ साली कार्यान्वित करण्यात आली. भारताच्या वैचारिक नेतृत्वात मराठी विचारवंतांचा व साहित्यिकांचा सिंहाचा वाटा आहे. तेराव्या शतकातील संतसाहित्यापासून सुरू झालेली ही परंपरा आधुनिक काळात लोकहितवादी, महात्मा फुले, महर्षी शिंदे, न्यायमूर्ती रानडे, टिळक, आगरकर, राजवाडे, कर्वे, आंबेडकर यांसारख्या विचारवंतांनी टिकविली आहे. ही सामाजिक व प्रगतिशील वैचारिक परंपरा साहित्याच्या माध्यमातून अशीच पुढे चालू राहावी आणि तिची कृतज्ञतापूर्वक नोंद घ्यावी, हा या योजनेमागील हेतू आहे.

पहिली चार वर्षे या उपक्रमाचे आयोजन मुंबईतील 'अभिनव शिक्षण प्रसारक मंडळा'च्या 'अभिनव भाषाभ्यास केंद्रा'मार्फत करण्यात आले होते. आता या उपक्रमाचे आयोजन मुंबईतील 'केशव गोरे स्मारक ट्रस्ट'मार्फत करण्यात येते. या आधी प्रा. दिगंबर पाध्ये हे या आयोजनाचे सूत्रधार होते. तर २००४ सालापासून श्री. सतीश काळसेकर यांनी सूत्रे स्वीकारली आहेत. या उपक्रमातील 'गौरव पुरस्कार' व 'ग्रंथ पुरस्कार' यांसाठी महाराष्ट्रातील विचारवंत, समीक्षक व चोखंदळ वाचक यांच्याकडून त्यांच्या पसंतीची नावे प्रथम मागविली जातात. आलेल्या नावांमधून पुरस्कारासाठी योग्य नावांची शिफारस करण्याचे काम 'केशव गोरे स्मारक ट्रस्ट'ने येथे नियुक्त केलेल्या तज्ज्ञांच्या समितीकडून केले जाते. महाराष्ट्रातून केलेल्या शिफारशींचा विचार करण्यासाठी अमेरिकेतही एक समिती नेमण्यात आली आहे व ही समिती भारतातील 'निवड समिती'च्या शिफारशींच्या आधारे योग्य व्यक्ती, पुस्तके इत्यादींची पुरस्कारांसाठी निवड करते. एखाद्या वर्षात गौरव पुरस्कार/पारितोषिके वा अनुदाने यांच्यासाठी योग्य व्यक्ती वा पुस्तके नसल्यास त्या रकमेचा विनियोग भाषा, साहित्य व साहित्यिक यांसाठी कसा करावा हे त्या वेळी ठरविण्यात येते.

## १. महाराष्ट्र फाउण्डेशन गौरव पुरस्कार

मराठी ललित किंवा वैचारिक साहित्याच्या क्षेत्रांत आपल्या आयुष्यभराच्या कार्याने मोलाची भर घालणाऱ्या साहित्यिकाबद्दल कृतज्ञता व्यक्त करून त्याचा गौरव करण्यासाठी दोन लक्ष रुपये आणि मानचिन्ह असा एक गौरव पुरस्कार दिला जातो. दरवर्षी ललित किंवा वैचारिक यांपैकी एकाच विभागात पुरस्कार दिला जातो.

या गौरव पुरस्कारासाठी नावांचा विचार करताना खालील बाबी विचारात घेतल्या जातात.

**ललित साहित्यिकांच्या संदर्भात –**

- ज्यांच्या साहित्यातून मानवी स्वातंत्र्य, समता, न्याय यांच्या प्रस्थापनेसाठी सामाजिक परिवर्तनाची जाणीव व्यक्त झाली आहे.
- ज्यांच्या साहित्यातून मानवी जीवनाचे समर्थ दर्शन घडविले गेले आहे.
- ज्यांच्या साहित्यातून सार्वकालीन व सार्वत्रिक मूल्यांचा आविष्कार झाला आहे.

- ज्यांच्या साहित्यामुळे मराठी साहित्याच्या संचितात मोलाची भर पडली आहे व त्यामुळे ज्यांचे साहित्य मराठी साहित्याच्या इतिहासात महत्त्वाचे ठरले आहे.

अशा प्रतिभावंत साहित्यिकांचे कार्य या गौरव पुरस्कारासाठी विचारात घेतले जाते.

**वैचारिक साहित्यिकांच्या संदर्भात –**

- इतिहास, तत्त्वज्ञान, समाजशास्त्र, राजकारण, अर्थशास्त्र, विज्ञान, साहित्य-संशोधन व समीक्षा यांसारख्या वैचारिक क्षेत्रात ज्यांच्या मराठी लेखनामुळे त्या त्या विषयाच्या संदर्भात महत्त्वाची भर पडली आहे.
- त्या त्या क्षेत्रात ज्या साहित्यिकांनी नि:स्पृहवृत्तीने व निर्भयपणे तात्त्विक सत्याचा शोध घेतला आहे.
- ज्यांची जाणीव मानवी स्वातंत्र्य, समता व न्याय यांच्या प्रस्थापनेसाठी सामाजिक परिवर्तनाच्या प्रेरणेने उद्युक्त झाली आहे.
- मराठी समाजाच्या सांस्कृतिक विकासाच्या दृष्टीने ज्यांचे लेखन महत्त्वाचे ठरणारे आहे.

अशा विचारवंतांचे कार्य या गौरव पुरस्कारासाठी विचारात घेतले जाते.

## २. विशेष पुरस्कार

महाराष्ट्र फाउण्डेशन साहित्य पुरस्कार निवड समितीच्या असे निदर्शनास आले की काही साहित्यिकांचे वैशिष्ट्यपूर्ण व मोलाचे असे योगदान असूनही वेगवेगळ्या कारणांमुळे त्यांना पुरस्काराने गौरविण्याचे राहून जाते. यासाठी २००५ या वर्षापासून रु. ३०,००० व सन्मानचिन्ह अशा स्वरूपाच्या एका विशेष पुरस्काराची योजना करण्यात आली आहे. भारतातील निवड समिती या पुरस्कारासाठी साहित्यिकाच्या नावाची शिफारस करील.

## ३. ग्रंथांसाठी पुरस्कार

समकालीन मराठी साहित्याला प्रोत्साहन म्हणून तीन मराठी ग्रंथांना प्रत्येकी रु. २५,००० व सन्मानचिन्ह असे तीन 'महाराष्ट्र फाउण्डेशन ग्रंथ पुरस्कार' या वर्षी दिले जात आहेत. या पुरस्कारांसाठी अर्ज करावे लागत नाहीत. पुरस्कार दिल्या जाणाऱ्या वर्षालगतच्या मागील दोन वर्षांतील पुस्तकांचा या पुरस्कारांसाठी विचार केला जातो. या वर्षी जानेवारी २००४ ते डिसेंबर २००५ या दोन वर्षांतील पुस्तके विचारात घेण्यात आली. हे तीन पुरस्कार या वर्षी खालील गटांतील प्रत्येकी एका पुस्तकाला दिले गेले आहेत.

१. कविता

२. कादंबरी/कथा

३. वैचारिक/समीक्षा/संशोधन

एखाद्या साहित्यप्रकारात पुरस्कार-योग्य साहित्यकृती न आढळल्यास दुसऱ्या एखाद्या साहित्यप्रकारातील पुस्तकाची निवड समिती पुरस्कारासाठी शिफारस करू शकते.

पुरस्कारप्राप्त ग्रंथांच्या प्रती महाराष्ट्रातील निवडक ५० ग्रंथालयांना भेट म्हणून पाठविल्या जातात. समाजाच्या सर्व थरांत साहित्य-प्रसार करणे, हे या मागचे उद्दिष्ट आहे.

## ४. ललित वा वैचारिक नियतकालिक- अनियतकालिकांसाठी पुरस्कार

मराठी साहित्यक्षेत्रात नियतकालिकांची प्रभावी परंपरा आहे. विचारांची देवाणघेवाण व जाणिवांचा विकास या दृष्टीने आधुनिक जगात नियतकालिकांना विशेष महत्त्व आहे. परंतु आज मराठी नियतकालिकांच्या क्षेत्रात गंभीर नियतकालिकांची स्थिती समाधानकारक दिसत नाही. अशा प्रतिकूल परिस्थितीत नियतकालिकांचे सांस्कृतिक महत्त्व ध्यानात घेऊन ध्येयनिष्ठ वृत्तीने मराठी नियतकालिके चालविणाऱ्या व्यक्तींच्या कार्याची नोंद घेऊन त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी व अशा कार्याला प्रोत्साहन देण्यासाठी दरवर्षी एका नियतकालिकाला रुपये २५,००० व सन्मानचिन्ह या स्वरूपाचा पुरस्कार दिला जातो.

या पुरस्कारासाठी नियतकालिक/अनियतकालिकाचा विचार करताना खालील बाबी विचारात घेतल्या जातात—

- ललित व वैचारिक साहित्य-पुरस्कारासंदर्भात लेखकांकडून यापूर्वी नमूद केलेल्या अपेक्षांची पूर्ती जी नियतकालिके गंभीरपणे करीत असतील.
- जी शास्त्रीय दृष्टीने नि:स्पृहपणे सत्याचे प्रकटन करण्याचे कार्य करीत असतील.
- ज्या नियतकालिकांना त्यांच्या त्यांच्या क्षेत्रात काही विशेष महत्त्व प्राप्त झाले असेल किंवा त्यांच्या कार्यातून तसे आश्वासन मिळत असेल.
- ज्या नियतकालिकांद्वारे महाराष्ट्रातील विख्यात व नवोदित लेखकांच्या विचारांची देवाणघेवाण होत असेल व त्यामुळे सांस्कृतिकदृष्ट्या जी महत्त्वाची ठरणारी असतील.

- या शिवाय ज्या अनियतकालिकांमध्ये भूमिकेचे गांभीर्य व प्रकाशनाचे सातत्य असेल अशा अनियतकालिकांचा विचारदेखील या पुरस्कारासाठी करण्यात येईल.

'केशव गोरे स्मारक ट्रस्ट'ने नियुक्त केलेली निवड समिती या पुरस्काराची शिफारस करते.

**५. रा. शं. दातार नाट्य पुरस्कार**

नाटक या प्रकारासाठी २००३ सालापासून हा विशेष पुरस्कार महाराष्ट्र फाउण्डेशनतर्फे दिला जात आहे. या वर्षापासून हा पुरस्कार एखाद्या महत्त्वाच्या सामाजिक समस्येविषयी आशयसंपन्न नाट्यकृती सादर करण्यात मोलाचा वाटा असणाऱ्या नाट्यकर्मीसाठी देण्याची योजना आहे. हा पुरस्कार प्रामुख्याने रंगभूमीवरील उभरत्या, तरुण नाट्यकर्मीसाठी आहे. या पुरस्काराचे स्वरूप रु. २५,००० व सन्मानचिन्ह असे असून त्याची शिफारस करण्यासाठी 'केशव गोरे स्मारक ट्रस्ट'तर्फे वेगळी त्रिसदस्य समिती नियुक्त करण्यात आली आहे.

६. या वर्षी नाट्यक्षेत्रातील विशेष कामगिरीसाठी रु. ५०,००० व सन्मानचिन्ह असा पुरस्कार देण्यात आला आहे.



# सुनील देशमुख

सुनील देशमुख हे मूळचे सांगलीचे. १९६४ साली एस.एस.सी. परीक्षेत बोर्डात चौथ्या क्रमांकाने उत्तीर्ण झाल्यावर शिक्षणासाठी ते मुंबईत आले. १९७० साली मुंबई विद्यापीठाच्या केमिकल टेक्नॉलॉजी या विभागातून बी.केम. ही पदवी त्यांनी प्राप्त केली. पुढील शिक्षणासाठी ते अमेरिकेत गेले.

अमेरिकेमध्ये एम.एस. (केमिकल इंजिनिअरिंग), एम.बी.ए. या पदव्यांबरोबरच जे.डी. ही कायद्याची पदवीही त्यांनी मिळविली. अमेरिकेत वकिली करण्याचा परवानाही त्यांनी प्राप्त केला.

नंतर अमेरिकेतच कमॉडिटी ट्रेडर म्हणून वॉलस्ट्रीटवर त्यांनी अनेक वर्षे यशस्वी व्यवसाय केला.

आज गिरीश, निशा व सुशील या तीन मुलांसह ते व त्यांची पत्नी प्रतिभा (पूर्वाश्रमीच्या प्रतिभा टिळक) अमेरिकेत स्थायिक झाले आहेत.

व्यवसायात नेत्रदीपक यश मिळवणाऱ्या श्री. सुनील देशमुख यांना साहित्य व समाजसेवा यांविषयी विशेष आस्था आहे. व्यवसायातून स्वेच्छेने निवृत्त झाल्यापासून आठवड्यातील काही काळ ते सामाजिक कामासाठी आवर्जून देत असतात.

मराठी भाषा, समाज व संस्कृती यांबद्दल त्यांना प्रेम व कळकळ आहे. हे ऋण फेडण्याचा अल्पसा प्रयत्न म्हणून 'महाराष्ट्र फाउण्डेशन'ला एक कोटी रुपयांची देणगी देऊन १९९४ पासून 'महाराष्ट्र फाउण्डेशन मराठी साहित्य पुरस्कार योजना' त्यांनी सुरू केली. 'केशव गोरे स्मारक ट्रस्ट' आयोजित 'महाराष्ट्र फाउण्डेशन समाजकार्य पुरस्कार योजने'मागेही सुनील देशमुख यांचीच प्रेरणा आहे.

Sunil Deshmukh
Tele/Fax : 305-918-0755
email : sunild@aol.com

# महाराष्ट्र फाउण्डेशन
# मराठी साहित्य पुरस्कारांचे मानकरी

### गौरव पुरस्कार

नारायण सुर्वे १९९४
मेघ:शाम पुंडलिक रेगे १९९४
मालतीताई बेडेकर १९९५
य. दि. फडके १९९५
श्रीपाद नारायण पेंडसे १९९६
विष्णू भिकाजी कोलते १९९६
गो. वि. तथा विंदा करंदीकर १९९७
वसंत पळशीकर १९९७
विजय तेंडुलकर १९९८
रा. भा. पाटणकर १९९८
पु. ल. देशपांडे १९९९
रा. चिं. ढेरे २०००
भालचंद्र नेमाडे २००१
ग. प्र. प्रधान २००२
मारुती चितमपल्ली २००३
दिलीप पुरुषोत्तम चित्रे २००४
बाबूराव बागूल २००५
*रा. ग. जाधव* २००६

### विशेष पुरस्कार

भा. रा. भागवत / बालसाहित्य १९९६
उमा कुलकर्णी / भाषांतर १९९७
बाबूराव बागूल / दलित साहित्य १९९८
वसंत दावतर / मराठी भाषा,
संशोधन व समीक्षा १९९९
रा. वि. सोवनी / मराठीतून
विज्ञानप्रसार २०००
गंगाधर मोरजे / लोकसाहित्य २००१
दत्ता भगत / दलित साहित्य २००२
केशव मेश्राम / दलित साहित्य २००२
रा. रं. बोराडे / ग्रामीण साहित्य २००३
भास्कर चंदनशिव / ग्रामीण साहित्य २००३
मनोहर शहाणे २००५
*रत्नाकर मतकरी* २००६

### प्रकाशन संस्था

पॉप्युलर प्रकाशन, मुंबई १९९४
कॉण्टिनेण्टल प्रकाशन, पुणे १९९५
देशमुख आणि कंपनी, पुणे १९९६
मौज प्रकाशन गृह, मुंबई १९९७
साधना प्रकाशन, पुणे १९९८

### नियतकालिके / अनियतकालिके

नवभारत, वाई १९९४
आजचा सुधारक, नागपूर १९९४
मराठी संशोधन पत्रिका, मुंबई १९९४
समाज प्रबोधन पत्रिका, पुणे १९९५
भाषा आणि जीवन, पुणे १९९५
विचारशलाका, लातूर १९९५
अर्थसंवाद, कोल्हापूर १९९६
संशोधक, धुळे १९९६
पंचधारा, हैदराबाद १९९७
परिसर-वार्ता, पुणे १९९७
मराठी विज्ञान परिषद पत्रिका, मुंबई १९९८
पुरोगामी सत्यशोधक, पुणे १९९८
ताज (Thinkers' Academy Journal),
मुंबई १९९९
सृष्टिज्ञान, पुणे २०००
बायजा, पुणे २००१
शब्दवेध, बुलडाणा २००४
अभिधानंतर, मुंबई २००५
*परिवर्तनाचा वाटसरू* २००६

### ग्रंथ / ललित

ताम्रपट / रंगनाथ पठारे १९९४
दिवसेंदिवस / अनुराधा पाटील १९९४
भाऊ पाध्ये यांच्या श्रेष्ठ कथा /
भाऊ पाध्ये १९९४
उद्‌काचिया आर्ती / मिलिंद बोकील १९९५
वनवास / प्रकाश नारायण संत १९९६
एकूण कविता : दोन /
दिलीप पुरुषोत्तम चित्रे १९९६
युगान्त / महेश एलकुंचवार १९९७
कार्यरत / अनिल अवचट १९९८
शुभ्र काही जीवघेणे / अंबरीश मिश्र १९९८
अधांतर / जयंत पवार १९९९
कबीर / अनुवाद : मंगेश पाडगावकर १९९९
तणकट / राजन गवस २०००
आतंक / विलास सारंग २०००
कोरडी भिक्षा / श्रीनिवास कुलकर्णी २००१
तिची कहाणी / ना. धों. महानोर २००१
गल्ली बदललेला मोर्चा / राम दोतोंडे २००१
मन्वंतर / दीनानाथ मनोहर २००१
तिरिछ आणि इतर कथा /
अनु. जयप्रकाश सावंत २००१
उत्तरायण / रवींद्र शोभणे २००२
हिरोशिमाच्या कविता /
अनु : निरंजन उजगरे २००२
राहिले दूर घर माझे / शफाअत खान २००२
वकिल्या पारधी / लक्ष्मण गायकवाड २००३
जीवनायन / यशवंत मनोहर २००३
येरवडा विद्यापीठातील दिवस /
कुमार सप्तर्षी २००३
राहीच्या स्वप्नांचा उलगडा /
भारत सासणे २००३

आषाढमाती / श्रीकांत देशमुख २००४
खूप लोक आहेत / श्याम मनोहर २००४
पिढीजात / सतीश आळेकर २००४
भूमी / आशा बगे २००५
व्यवहाराचा काळा घोडा/
अजीम नवाज राही २००५
महर्षी विठ्ठल रामजी शिंदे :
जीवन व कार्य / गो. मा. पवार २००५
*निशाणी डावा अंगठा /*
*रमेश इंगळे-उत्रादकर २००६*
*हॉटेल माझा देश /*
*धम्मपाल रत्नाकर २००६*

**ग्रंथ / वैचारिक**

आस्तिक शिरोमणी चार्वाक /
आ. ह. साळुंखे १९९४
आधुनिक मराठी वाङ्मयाची
सांस्कृतिक पार्श्वभूमी /
गो. म. कुलकर्णी १९९५
हिंदू-मुस्लिम प्रश्न आणि
सावरकरांचा हिंदू राष्ट्रवाद /
रावसाहेब कसबे १९९५
समाजपरिवर्तनाच्या दिशा /
जनार्दन वाघमारे १९९६
जाळ्यातील चंद्र / म. वा. धोंड १९९६
नव वसाहतवाद आणि
आधुनिक भारत / गोपाळ राणे १९९७
तुकाराम दर्शन / सदानंद मोरे १९९७
नारायण मेघाजी लोखंडे /
मनोहर कदम १९९७
आंबेडकर / नलिनी पंडित १९९८
साहित्यविवेक /
म. द. हतकणंगलेकर १९९८
काश्मीर प्रश्न / ना. य. डोळे १९९९
दखनी भाषा : मऱ्हाटी संस्कृतीचा
एक आविष्कार / श्री. रं. कुलकर्णी १९९९
ताराबाई शिंदे लिखित स्त्री-पुरुष तुलना /
संपादक : विलास खोले १९९९
शोकात्म विश्वरूप दर्शन :
जीवन आणि साहित्य /
स. रा. गाडगीळ २०००
नवरात्र / अशोक चौसाळकर २०००
कर्मयोगी संन्यासी /
नरेंद्र चपळगावकर २०००
मार्क्सचा मानव विचार /
मुरलीधर पवार २००१
प्राचीन भारत : समाज
आणि संस्कृती / म. अ. मेहेंदळे २००२
वि. स. खांडेकर सचित्र चरित्रपट /
जया दडकर २००२
साहित्य प्रत्यय / भा. ल. भोळे २००३
तुकाराम : अंतर्बाह्य संघर्षाची
अनुभवरूपे / म. सु. पाटील २००५
*मराठी साहित्य :*
*इतिहास आणि संस्कृती /*
*वसंत आबाजी डहाके २००६*

**ग्रंथ / अ-पारंपरिक**

जिहाद / हुसेन जमादार १९९४
आक्रोश / भीमराव गस्ती १९९५
दशक्रिया / बाबा भांड १९९६
लॉरी बेकर / अतुल देऊळगावकर १९९७
विमुक्तायन / लक्ष्मण माने १९९८
दुष्काळ आवडे सर्वांना /
अनु. हेमंत कर्णिक २००४
आयदान / उर्मिला पवार २००४

**रा. शं. दातार नाट्य पुरस्कार**

ढोलताशे / चं. प्र. देशपांडे २००३
कळा या लागल्या जीवा /
किरण पोत्रेकर २००४
छोट्याश्या सुट्टीत / सचिन कुंडलकर २००५
*मळभ / किरण यज्ञोपवीत २००६*

**नाट्य क्षेत्रातील विशेष कामगिरीसाठी पुरस्कार**

*अतुल पेठे २००६*

८९०४६
SAM/2006
८८४२
३१।१२।२००६



## कप

हॉटेलात काम करतोय
तिला कळलं
थंड चहाच्या कपाखालून
बशी दूर व्हावी
तशी ती निघून गेली

मी कपासारखा एकटाच
अद्यापही टेबलवर पडून आहे

अनेकांच्या हातांचे
ओठांचे
स्पर्श घेत
स्पर्श देत
स्पर्श घेत
स्पर्श देत.

धम्मपाल रत्नाकर